**RNI No. MAHBIL /2009/35527**
**Reg. No. MH/MR/South-343/2014–16**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

**वर्ष ६, अंक ३०(२)]** **बुधवार, जून २५, २०१४/आषाढ ४, शके १९३६** **[पृष्ठ १५५, किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक ६२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

## (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४

**अधिसूचना**

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक मविनिआ/तांत्रिक/विमुप्र/विनियम/२०१४.---- विद्युत अधिनियम, २००३ (२००३चा ३६) च्या कलम १८१ च्या उप कलम (१) आणि उप कलम (२) सह कलम २ चे उप कलम (४७), कलम ३९ च्या उप कलम (२) च्या खंड (डी) चे उप-खंड (दोन), कलम ४० च्या खंड (सी)चे उप-खंड (दोन) आणि कलम (४२) च्या उप कलम (२), उप कलम (३) आणि उप कलम (४) नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, याद्वारे खालील विनियम करीत आहेः---

भाग-१

**प्रारंभिक**

**१. संक्षिप्त शीर्षक, अर्थनिश्चिती व प्रारंभ**

१.१ या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४" असे म्हणावे.

१.२ हे विनियम महाराष्ट्र राज्यातील वितरण परवानाधारकांच्या वितरण यंत्रणेत प्रवेशासाठी व वापरासाठी लागू राहतील व या विनियमांमध्ये ज्या प्रकरणी वितरण परवानाधारकाच्या जाळ्याचा वापर करण्यात येत नसेल परंतु परवानाधारकाच्या वितरण क्षेत्रातील मुक्त प्रवेश ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यात येत असेल अशा प्रकरणांचादेखील समावेश असेल.

१.३ हे विनियम **शासकीय राजपत्रातील** त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या**

२.१ संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर, या विनियमांमध्ये—

(ए) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(बी) **"अनुज्ञेय वीज खेचणी (ड्रॉअल) किंवा वाटप केलेली क्षमता"** म्हणजे ग्राहकाला, वितरण यंत्रणेवर ठरवून दिलेल्या ठिकाणांमध्ये विजेचे अंतःक्षेपण (इंजेक्शन) करण्यासाठी आणि वीज खेचण्यासाठी (ड्रॉअल), विजेचे हस्तांतरण करण्याकरिता परवानगी देण्यात आलेली मेगावॅटमधील क्षमता;

(सी) **"अर्जदार"** म्हणजे या विनियमांनुसार वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेत जोडणीयता मिळण्यासाठी आणि/किंवा मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठी ज्याने अर्ज केला आहे अशी व्यक्ती;

(डी) **"अधिकृत प्रतिनिधी"** म्हणजे वितरण परवानाधारक किंवा पुरवठादार, जसे असेल तसे, यांच्या सर्वसाधारण किंवा विशिष्ट प्राधिकाराखाली कार्ये करीत असलेले वितरण परवानाधारकाचे किंवा पुरवठादाराचे सर्व अधिकारी, कर्मचारी किंवा प्रतिनिधी;

(इ) **"संतुलन व हिशोबपूर्तीची संहिता (Balancing and Settlement Code)"** म्हणजे राज्य भार प्रेषण केंद्राने विकसित केलेली आणि आयोगाने मान्यता दिलेली अशी संहिता ज्यानुसार महाराष्ट्र राज्यातील ग्रिडचा वापर करणाऱ्यांच्या ऊर्जेच्या लेख्यांमध्ये (आवश्यक देवाण-घेवाण करून) संतुलन राखण्यात येईल व त्यांनी अनुसूचीनुसार द्यावयाची ऊर्जा व प्रत्यक्ष दिलेली ऊर्जा यातील फरकाचा हिशोब पूर्ण करण्यात येईल;

(एफ) **"द्विपक्षीय व्यवहार"** म्हणजे असा व्यवहार ज्यामध्ये, विनिर्दिष्टीत खरेदीदार आणि विनिर्दिष्टीत विक्रेता यांच्यात, थेट किंवा वीज व्यापार परवानाधारकाच्या किंवा पॉवर एक्स्चेंजमार्फत (ग्रिडमधील) विनिर्दिष्टीत ठिकाणापासून कोणत्याही कालावधित विजेच्या निश्चित किंवा बदलत्या (मेगावॅटमधील) परिमाणात, वीज खेचण्यासाठी ऊर्जेचा (मेगावॅटतासामध्ये) विनियम करण्यात येतो;

(जी ) **"अंशकालीन मुक्त प्रवेश ग्राहककाकरिता देयक मागणी"** म्हणजे मासिक देयक मागणी (बिलींग डिमांड) ही खालीलपेक्षा जास्त असेलः-

(अ) नोंदलेली प्रत्यक्ष कमाल मागणी वजा अंशकालीन मुक्त प्रवेश ग्राहकाने त्या महिन्यात ०६.०० ते २२.०० या वेळेत प्राप्त करुन घेतलेली मुक्त प्रवेश मागणी;

(ब) मागील अकरा (११) महिन्यात नोंदलेल्या करारांतर्गत उरलेल्या (रिटेंड) मागणीशी संबंधित उच्चतम देयक मागणीच्या ७५ टक्के;

(क) परवानाधारकाकडील करारांतर्गत उरलेल्या (रिटेंड) मागणीच्या ५० टक्के;

(एच) **"केंद्रीय आयोग"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ७६ मध्ये संबोधिलेला केंद्रीय विद्युत नियामक आयोग;

(आय) **"आयोग"** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(जे) **"अतिभार"** म्हणजे अशी परिस्थिती ज्यामध्ये वितरण क्षमतेकरिता मागणी ही उपलब्ध हस्तांतरण क्षमतेपेक्षा अधिक असते;

(के) **"जोडणी"** म्हणजे ग्राहकाची जागा वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेशी जोडणे ज्यामुळे अशी जागा आणि अशी वितरण यंत्रणा यांच्यामध्ये विजेचे हस्तांतरण करता येणे शक्य होईल;

(एल) **"वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठी करार"** म्हणजे वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेला जोडण्यासाठी व यंत्रणेचा वापर करण्यासाठी करण्यात आलेला करार आणि हे करार खालील प्रकारचे असतीलः—

या विनियमांना अनुसरुन आणि त्यातील अटी व शर्तींच्या अधीन राहून :—

(एक) वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात जागा असलेली व जिला सदर वितरण परवानाधारका व्यतिरिक्त अन्य परवानाधारकाकडून किंवा वीज निर्मिती कंपनीकडून वीज पुरवठ्याची गरज आहे अशी व्यक्ती आणि सदर वितरण परवानाधारक यांच्यात करण्यात आलेला करार;

(दोन) वर (१) मध्ये उल्लेखलेल्या व्यक्तीला, अशा वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा विजेच्या वहनासाठी वापर करून, विजेचा पुरवठा करण्यास इच्छुक असलेला वितरण परवानाधारक आणि निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक, जसे असेल तसे, यांच्यात झालेला करार;

(तीन) अशा वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात जागा असलेली व्यक्ती जिला वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (विद्युत बाजारपेठ) विनियम, २०१० अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या पॉवर एक्स्चेंजमधून, सभासदामार्फत किंवा स्वतः सभासद होऊन, वीज पुरवठ्याची गरज आहे अशी व्यक्ती आणि वितरण परवानाधारक यांच्यात झालेला करार;

(एम) **"जोडणीयता"-** स्व-वापरसाठीचा निर्मिती प्रकल्प, ग्राहक किंवा परवानाधारकासह निर्मिती केंद्राकरिता "जोडणीयता" म्हणजे वितरण यंत्रणेला जोडून घेण्याची स्थिती;

(एन) **"ग्राहक"** याचा अर्थ अधिनियमाप्रमाणेच राहील परंतु तो, महाराष्ट्र राज्यातील ज्या ग्राहकांना हे विनियम लागू होतील त्यांच्यापुरता, मर्यादित राहील;

(ओ) **"ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ४२ च्या उप-कलम (५) आणि त्याखाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विनियमांतील तरतुदीनुसार वितरण परवानाधारकाने गाऱ्हाण्यांच्या निवारणासाठी स्थापन केलेला मंच;

(पी) **"करारांतर्गत मागणी"** म्हणजे किलोवॅट (के-डब्लू) किंवा मेगावॅट (एमडब्ल्यु) किंवा अश्व-शक्ति (एचपी) किंवा किलोव्होल्ट ॲम्पीअर (केव्हीए) किंवा मेगाव्होल्ट ॲम्पीअर (एमव्हीए) मधील वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांच्यात परस्पर संमतीने मान्य झालेली विजेची मागणी जी--

(एक) वीज पुरवठ्याच्या करारात नोंदल्याप्रमाणे असेल; किंवा

(दोन) वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारात नोंदल्याप्रमाणे असेल; किंवा

(तीन) अन्य लेखी पत्रव्यवहारात मान्य केल्याप्रमाणे असेल :

परंतु असे की, मेगाव्होल्ट ॲम्पीअर/किलोव्होल्ट ॲम्पीअर पासून मेगावॅट/किलोवॅट युनिट मध्ये रूपांतर करण्याच्या प्रयोजनासाठी युनिटी पॉवर फॅक्टर विचारात घेण्यात येईल;

(क्यू) **"दिवस"** म्हणजे रात्री बारा (००.०० वाजता) वाजता सुरू होणारा आणि २४.०० वाजता संपणारा दिवस;

(आर) **"सविस्तर कार्यपद्धत"** म्हणजे येथील विनियम ८,९,१०,११,१२ आणि ३६ मध्ये उल्लेख केल्यानुसार वितरण परवानाधारकाने निर्गमित केलेली कार्यपद्धत;

(एस) **"विद्युत पुरवठा संहिता"** म्हणजे अधिनियमाच्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (यू), खंड (व्ही), खंड (डब्ल्यू), खंड (एक्स) आणि खंड (झेडपी) अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेले विनियम;

(टी) **"आय इ जी सी"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ७९ च्या उप-कलम (१) च्या खंड (एच) अंतर्गत केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केलेली आणि वेळोवेळी सुधारणा केलेली भारतीय विद्युत ग्रिड संहिता;

(यु) **"दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश"** म्हणजे बारा (१२) वर्षांपेक्षा जास्त परंतु पंचवीस (२५) वर्षांपेक्षा जास्त नसेल, अशा कालावधीकरिता वितरण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

(व्ही) **"कमाल मागणी"-** आयोगाने कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशात अन्यथा तरतूद केली नसल्यास, कोणत्याही कालावधीच्या संबंधात किलोवॅटस् किंवा किलोव्होल्ट-ॲम्पीअर्स मधील "कमाल मागणी" म्हणजे, त्या कालावधीतील कोणत्याही लागोपाठच्या पंधरा (१५) मिनिटांच्या गटामध्ये, सगळ्यात मोठ्या किलावॅट-तासांच्या किंवा किलोव्होल्ट्स ॲम्पीअर-तासांच्या संख्येमध्ये केलेल्या आणि घेतलेल्या वीज पुरवठ्याची दुप्पट;

(डब्ल्यु) **"मध्यम-कालीन मुक्त प्रवेश"** म्हणजे तीन (३) महिन्यांपेक्षा जास्त परंतु तीन (३) वर्षांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीकरिता वितरण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

(एक्स) **"महिना"** म्हणजे ग्रेगोरिअन कॅलेंडरप्रमाणे १ कॅलेंडर महिना;

(वाय) **"नोडल एजन्सी"** म्हणजे या विनियमांच्या विनियम ३ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली नोडल एजन्सी;

(झेड) **"मुक्त प्रवेश ग्राहक"** म्हणजे ज्याला या विनियमांतर्गत मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला आहे असा ग्राहक, परवानाधारक किंवा निर्मिती कंपनी किंवा व्यक्ती;

(एए) **" अंशकालीन मुक्त प्रवेश ग्राहक"** म्हणजे निर्मिती कंपनी किंवा निर्मिती कंपन्या किंवा अन्य परवानाधारक किंवा पॉवर एक्स्चेंजच्या मार्फत वीज घेण्यासाठी ज्याला या विनियमांतर्गत मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला आहे असा ग्राहक आणि त्याचवेळी जो त्याची विजेची गरज भागविण्यासाठी ( तो ज्याच्या वीज पुरवठ्याच्या क्षेत्रात राहतो अशा वितरण परवानाधारकाकडे) त्याची अंशतः विजेची मागणी राखून ठेवतो;

(बीबी) **" मंजूर भार "** म्हणजे वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांच्यामध्ये परस्पर संमतीने मान्य करण्यात आलेला किलोवॉट (केडब्ल्यु)/ अश्वशक्ती (एचपी) मधील विद्युत भार;

(सीसी) **"अल्प-कालीन मुक्त प्रवेश"** म्हणजे एका वेळेस (एक) १ महिन्यापेक्षा जास्त नसेलेल्या कालावधीकरिता वितरण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

(डीडी) **"राज्य भार प्रेषण केंद्र"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ३१ च्या उप-कलम (१) अंतर्गत महाराष्ट्रात स्थापन करण्यात आलेले राज्य भार प्रेषण केंद्र;

(इइ) **"राज्य ग्रिड संहिता"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ८६ च्या उप-कलम (१) च्या खंड (एच) अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेली व वेळोवेळी सुधारणा केलेली राज्य ग्रिड संहिता, जी हे विनियम सुरू झाल्याच्या दिनांका रोजी लागू होईल;

(एफएफ) **"राज्य पारेषण कंपनी (एसटीयू)"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ३९ च्या उप कलम (१) अंतर्गत महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेली शासकीय कंपनी;

(जीजी) **"विशेष एनर्जी मीटर"** म्हणजे केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या आणि वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत प्राधिकरण (मीटर बसविणे व चालविणे) विनियम २००६ नुसार बसविलेले मीटर;

(एचएच ) **"कृतीची मानके विनियम"** म्हणजे अधिनियमाच्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (झेडए) अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेले विनियम

(आयाय) **"पुरवठादार"** म्हणजे अन्य वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात स्थित असलेल्या ग्राहकाला किंवा व्यक्तीला अशा अन्य वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा वापर करून त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात, वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारानुसार किंवा ग्राहकाधिष्ठीत पारेषण वाहिन्या टाकून, विजेचा पुरवठा करणारी वीज निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक, जसे असेल तसे;

(जेजे) **"पुरवठा करार"** म्हणजे विद्युत अधिनियमाच्या कलम ४९ अंतर्गत अभिप्रेत असलेला करार;

(केके) **"वीज दराचे विनियम"** म्हणजे अधिनियमाच्या कलम १८१ च्या उप कलम (२) च्या खंड (झेडडी) सह कलम ६१ अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेले विनियम;

(एलएल) **"पारेषण मुक्त प्रवेश विनियम"** म्हणजे अधिनियमाच्या कलम २ च्या उप कलम (४७) सह कलम ३० आणि कलम ३२ च्या उप-कलम (३) अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेले आणि वेळोवेळी सुधारणा केलेले विनियम;

(एमएम) **"काल-गट"** म्हणजे रात्री ००.०० वाजता सुरू होणारा वेळेचा प्रत्येकी १५ मिनिटांचा गट ज्यामध्ये विशेष ऊर्जा मीटर्स विनिर्दीष्ट करण्यात आलेली विद्युत मापदंड आणि परिमाण यांची नोंद करतात.

२.२ (अ) या विनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द आणि उक्ती ज्यांची व्याख्या अधिनियमात किंवा आय इ जी सी किंवा राज्य ग्रिड संहिता किंवा विद्युत पुरवठा संहिता किंवा अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियम आणि अन्य विनियमांत करण्यात आलेली असेल तर अशा शब्द व उक्तींचा अर्थ, अधिनियमात किंवा आय इ जी सी किंवा राज्य ग्रिड संहिता किंवा विद्युत पुरवठा संहिता किंवा नियम आणि अन्य विनियमांमध्ये, जसे असेल तसे, देण्यात आलेल्या अर्थानुसार राहील.

(ब) या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दाचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

## ३. मुक्त प्रवेश मागण्यासाठी पात्रता व नोडल एजन्सी

३.१ या विनियमांतील तरतूदींच्या अधीन राहून, ज्या ग्राहकाची करारांतर्गत मागणी १ मेगावॉट आणि अधिक असेल आणि ज्याला मुक्त प्रवेशासाठी उपलब्ध करुन द्यावयाची वीज ही कोणत्याही वेळी १ मेगावॉट आणि अधिक असेल, असा ग्राहक, निर्मिती कंपनी किंवा स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्प किंवा वितरण परवानाधारकाव्यतिरिक्त अन्य परवानाधारक किंवा पॉवर एक्स्चेंजमधून, विजेचा पुरवठा मागण्यासाठी अशा वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेत मुक्त प्रवेश मागण्यासाठी पात्र असेल.

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहक, वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० अंतर्गत विहित करण्यात आलेल्या नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाची पूर्तता करण्यासाठी फक्त आवश्यक असलेल्या विजेची खरेदी बहुविध वीज निर्मिती कंपन्यांकडून करु शकेल.

परंतु असे की, मेगाव्होल्ट ॲम्पिअर/किलोव्होल्ट ॲम्पीअर पासून मेगावॅट/किलोवॅट युनिटमध्ये रुपांतर करण्यासाठी युनिटी पॉवर फॅक्टर विचारात घेण्यात येईल.

परंतु असे की, मुक्त प्रवेश मिळविण्यासाठी पात्र होण्याकरिता कोणत्याही वेळी उपलब्ध करुन द्यावयाची वीज कमीत कमी १ मेगावॉट किंवा अधिक असणे आवश्यक असल्याची जी अट विनियम ३.१ मध्ये नमूद करण्यात आली आहे ती अट, वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० अंर्तगत निश्चित करण्यात आलेल्या ‘अनिश्चित वीज’ निर्माण करणा-या नूतनशील ऊर्जा निर्मिती प्रकल्पाकडून वीज पुरवठा घेतल्यास त्याला ही अट लागू होणार नाही.

परंतु असेही की, अशा ग्राहक किंवा व्यक्तीची कमाल मागणी, ज्यावेळेला मुक्त प्रवेशासाठी पात्र झाली असेल त्या सुरूवातीच्या पातळीच्या (७०) टक्क्या इतकी किंवा त्यापेक्षा अधिक, त्याला मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आल्यानंतरच्या प्रत्येक आर्थिक वर्षात राहील. जर ग्राहक पुढील तीन लागोपाठच्या महिन्यात कमाल मागणी साध्य करु शकला नाही तर, वितरण परवानाधारकाला त्या आर्थिक वर्षातील वहन आकारांच्या दुप्पट, किंवा ज्या कालावधीकरीता अशी कमाल मागणी ग्राहकाला साध्य करता आली नसेल त्या कालावधीकरीता, दंड आकारण्याच्या हक्क राहील.

परंतु असेही की, अशा ग्राहक किंवा व्यक्तीने लागोपाठच्या तीन महिन्यात वरील तरतूदींची पूर्तता केली नाही तर, वितरण परवानाधारक करारांतर्गत मागणीचे फेरनिर्धारण आणि पुनर्स्थापित/कपात करण्याची प्रक्रिया सुरु करु शकेल.

स्पष्टीकरण- या विनियमांच्या प्रयोजनासाठी, जो ग्राहक विनियम ३.१ अंतर्गत मुक्त-प्रवेशासाठी अन्यथा पात्र असेल, आणि ज्याला पॉवर एक्स्चेंजमधून वीज प्राप्त करुन घेण्याची इच्छा असेल असा ग्राहक, केंद्रीय विद्युत नियामक आयोग (वीज बाजारपेठ) विनियम, २०१० नुसार कोणत्याही पॉवर एक्स्चेंजचा “सभासद” असणे किंवा त्याने पॉवर एक्स्चेंजच्या “सभासदा”मार्फत वीज प्राप्त करुन घेणे, आवश्यक राहील.

परंतु असे की, पॉवर एक्स्चेंज मार्फत वीज खरेदी ही डे-अहेड तत्त्वा ऐवजी एक आठवडा आधी किंवा अधिक दिवसांच्या संख्येच्या (डिनॉमिनेशन) तत्त्वावर अनुज्ञेय राहील.

परंतु असे की, छपरावरील सौर प्रकल्पांकरीता, आयोग सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेश किंवा विनियमांद्वारे वेगळया अटी व शर्ती विनिर्दिष्ट करु शकेल.

परंतु असे की, वितरण फ्रॅंचायसी क्षेत्रातील वैयक्तिक पात्र ग्राहक या विनियमांना अनुसरुन मुक्त प्रवेश अर्ज करु शकेल. मुक्त प्रवेशाची मागणी करणा-या वैयक्तिक पात्र ग्राहकांकडे या विनियमांनुसार मीटरींग आणि अन्य पायाभूत सुविधा असणे आवश्यक आहे. तथापि, वितरण फ्रॅंचायसी मुक्त प्रवेशाची मागणी करण्यासाठी पात्र नसेल.

परंतु असे की, वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० अंतर्गत ‘अनिश्चित विजे’ चा निर्माता म्हणून निश्चित केलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती प्रकल्पा व्यतीरिक्त अन्य निर्मिती केंद्रांकडून मुक्त प्रवेश घेणा-या वितरण परवानाधारकाच्या ग्राहकाने मुक्त प्रवेश मागण्यापूर्वी केलेल्या मूळ करारांतर्गत मागणी इतके मुक्त प्रवेशाचे परिमाण मर्यादित राहील.

### ३.२ नोडल एजन्सी

३.२.१ ग्राहक आणि किंवा वीज निर्मिती कंपनी ज्या वितरण परवानाधारकाला जोडलेले असतील तो वितरण परवानाधारक त्याच्या वितरण यंत्रणेमध्ये दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश, मध्यम -कालीन मुक्त प्रवेश आणि अल्प-कालीन मुक्त प्रवेशाकरिता जोडणी मंजूर करण्यासाठी, नोडल एजन्सी राहील. जर निर्मिती केंद्र आणि ग्राहक दोन्ही वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेला जोडलेले असतील तर, अशा प्रकरणी ग्राहक ज्या वितरण परवानाधारकाच्या जाळयाला जोडलेला असेल तो वितरण परवानाधारक नोडल एजन्सी राहील. जर ग्राहक किंवा निर्मिती केंद्र दोन्हीही वितरण परवानाधारकाच्या जाळयाला जोडलेले नसतील तर, नोडल एजन्सी ही वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणीला मंजूरी, राज्यांतर्गत पारेषणाखाली दिर्घ-कालीन मुक्त प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि संबंधित बाबी) विनियम, २००९, लागू असेल तर, त्याप्रमाणे राहील; अन्यथा ज्या वितरण परवानाधारकाच्या पुरवठयाच्या क्षेत्रात ग्राहक स्थित असेल तो वितरण परवानाधारक नोडल एजन्सी राहील.

## ४. वितरण मुक्त प्रवेशासाठी आलेल्या अर्जांची छाननी

४.१ **अर्जाचा नमुना, इ.:** या सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यामध्ये वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेमध्ये मुक्त प्रवेश मिळण्यासाठी अशा वितरण परवानाधारकाकडे अर्ज करण्यात येईल.

परंतु असे की, अर्जाच्या छाननीसाठी आवश्यक तपशील/कागदपत्रे आणि विनियम ९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शुल्कासह, असा अर्ज करण्यात येईल;

परंतु आणखी असे की, ग्राहकाने वितरण यंत्रणेमध्ये मुक्त प्रवेशासाठी करावयाच्या अर्जासोबत पाठवावयाची आवश्यक माहिती, कार्यपद्धत, अर्जाचे नमुने व शुल्क याबाबतची माहिती प्रत्येक वितरण परवानाधारक त्याच्या इंटरनेटवरील संकेत-स्थळावर, आयोगाच्या पूर्व-मान्यतेने, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून साठ (६०) दिवसांच्या आत किंवा परवाना मंजूर करण्यात आल्यापासून साठ (६०) दिवसांच्या आत, जे लागू असेल त्याप्रमाणे, उतरवून घेण्याच्या स्वरुपात प्रसिध्द करील.

परंतु आणखी असे की, जोपर्यंत अर्जासाठी नवीन नमुना निर्गमित आणि/किंवा वितरण परवानाधारकाच्या इंटरनेटवरील संकेत-स्थळावर प्रकाशित करण्यात येत नाही तोपर्यंत, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम,२००५ अंतर्गत निर्गमित करण्यात आलेला अर्जाचा नमुना पुढेही वापरात राहील आणि अर्जाचा विद्यमान नमुना व या विनियमामधील तरतुदींमध्ये कोणतीही विसंगती आढळल्यास तिचा उचित अर्थ, हे विनियम लागू करण्याच्या ऊद्देशाने घेण्यात येईल.

### ४.२ करारांर्तगत मागणीत कपात

४.२.१ जेव्हा विनियम ३.१ अंतर्गत पात्र असलेला ग्राहक, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा पॉवर एक्स्चेंजमधून वीज पुरवठा प्राप्त करुन घेण्यासाठी वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेत दिर्घ-कालीन किंवा मध्यम-कालीन किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी अर्ज करतो तेव्हा वितरण परवानाधारक, (ज्याच्या वितरण यंत्रणेत प्रवेश मागण्यात आलेला आहे) ज्या प्रमाणात विजेचे परिमाण मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून हस्तांतरित करावयाचे असेल त्या प्रमाणात, ग्राहकाची करारांतर्गत मागणी/मंजूर भार, कमी करील.

परंतु असे की, जेव्हा विनियम ३.१ अंतर्गत पात्र असलेला वितरण परवानाधारकाचा ग्राहक, वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० अंतर्गत "अनिश्चित वीज" निर्मिती करणारा म्हणून ठरविलेल्या नूतनशील ऊर्जा प्रकल्पामधून वीज पुरवठा प्राप्त करुन घेण्यासाठी वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेत दिर्घ-कालीन किंवा मध्यम-कालीन किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी अर्ज करेल तेव्हा वितरण परवानाधारक, अनिश्चित नूतनशील ऊर्जा निर्मात्याच्या स्थापित क्षमतेच्या (आयोगाने अगदी अलिकडील नूतनशील ऊर्जेच्या वीज दराच्या आदेशात मंजूर केलेल्या) क्षमता वापर घटकाच्या (सी यु एफ) प्रमाणात करारांतर्गत मागणी/मंजूर भार कमी करील. उदाहरणार्थ, पवन ऊर्जा निर्मात्याची स्थापित क्षमता १०० मेवॉ असेल आणि त्याचा मंजूर क्षमता वापर घटक (सी यु एफ) समजा २३ टक्के असेल तर करारांतर्गत माग़णीत करावयाची कपात ही २३ मेवॉ राहील आणि या २३ मेवॉ मधून, लागू असलेली पारेषण आणि वहन हानि, ग्राहकाकरिता करावयाच्या नक्त करारांतर्गत मागणीतील कपातीची परिगणना करण्य्साठी, कमी करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, जेव्हा विनियम ३.१ अंतर्गत पात्र असलेला ग्राहक, पॉवर एक्स्चेंजमधून वीज पुरवठा प्राप्त करुन घेण्यासाठी वितरण यंत्रणेत मुक्त प्रवेशासाठी अर्ज करतो तेव्हा असा ग्राहक, मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून प्राप्त करुन घ्यावयाच्या विजेचे परिमाण हे संपूर्ण दिवसभरात एकसारखेच राहील, याची खात्री करील आणि यास पुष्टी देण्यासाठी तो मुक्त प्रवेशाच्या अर्जासोबत त्यसाठी लेखी हमी सादर करील.

परंतु असे की, अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी, करारांतर्गत मागणीतील कपातीचा किमान कालावधी हा, मुक्त प्रवेश मंजूर केल्याच्या दिनांकापसून एक (१) महिना, मध्यम-कलीन मुक्त प्रवेशासाठी, करारांतर्गत मागणीतील कपातीचा किमान कालावधी हा, मुक्त प्रवेश मंजूर केल्याच्या दिनांकापसून तीन (३) महिने किंवा ग्राहकाने मागितलेला मुक्त प्रवेशाचा कालावधी, यापैकी जो जास्त असेल तो, आणि दीर्घ–कालीन मुक्त प्रवेशासाठी, करारांतर्गत मागणीतील कपातीचा किमान कालावधी हा, मुक्त प्रवेश मंजूर केल्याच्या दिनांकापसून तीन (३) वर्षे किंवा ग्राहकाने मागितलेला मुक्त प्रवेशाचा कालावधी, यापैकी जो जास्त असेल तो, राहील.

४.२.२ अंशकालीन मुक्त प्रवेशाच्या बाबतीत, वरील विनियम ४.२.१ नुसार जर करारांतर्गत मागणी/ मंजूर भारात कपात करण्यात आली तर, ग्राहकांकरीता अनुज्ञेय वीज खेचणी (ड्रॉअल)/ वाटप केलेली क्षमता ही ग्राहकाच्या मूळ करारांतर्गत मागणी इतकी किमान राहील आणि ग्राहकाची सुधारित करारांतर्गत मागणी (कपात केलेली) आणि अनुसूचीनुसार राखून ठेवलेली (हक्काची ) मागणी यांची बेरीज असेल.

स्पष्टीकरण- जर १० मेगावॅटची करारांतर्गत मागणी असलेल्या वितरण परवानाधारकाच्या ग्राहकाने ४ मेगावॅटच्या मुक्त प्रवेशासाठी पारंपरिक निर्मात्याकडे अर्ज केला तर, ग्राहकाची अनुसूचीनुसार विजेची खेचणी (ड्रॉअल) १० मेगावॅट पेक्षा जास्त नसेल.

| **तपशील** | | **मागणी (मेगावॅट)** |
|---|---|---|
| वितरण परवानाधारकाकडे केलेली मूळ करारांतर्गत मागणी | (अ) | १० |
| मुक्त प्रवेश परिमाण | (ब) | ४ |
| वितरण परवानाधारकाकडील सुधारित करारांतर्गत मागणी | क = (अ)-(ब) | ६ |

ग्राहकाची विरतण परवानाधारकाबरोबर करारांतर्गत मागणी ६ मेगावॅट इतकी राहील.

अ) अनुज्ञेय वीज खेचणी (ड्रॉअल) = किमान मूळ करारांतर्गत मागणी (१० मेगावॅट) आणि [मुक्त प्रवेशामुळे हक्कानुसार अनुसूचीप्रमाणे मिळणारा पुरवठा (४ मेगावॅट) ] + [वितरण परवानाधाराकाबरोबर केलेली सुधारीत करारांतर्गत मागणी (६ मेगावॅट)] यांची बेरीज, जी १० मेगावॅट इतक्या मर्यादेची राहील.

ब) मुक्त प्रवेशामुळे अनुसूचीनुसार हक्काने मिळणारा पुरवठा हा ४ मेगावॅटच्या सममूल्य भाराइतका राहील.

परंतु असे की, प्रत्यक्ष खेचलेली वीज आणि शेड्युलनुसार खेचावयाची वीज यांच्यामधील तफावत ही विनियम २६ मधील तरतुदींतर्गत असंतुलन म्हणून समजण्यात येईल.

४.२.३ **कामांची पुर्तताः** ग्राहकाने विनियम ४.२.१ अंतर्गत केलेल्या अर्जाच्या पूर्वी जर कोणत्याही वेळी त्याची करारांतर्गत मागणी/ मंजूर भार यात वाढ करण्यासाठी अर्ज केला असेल आणि असा अर्ज जर विद्युत वाहिन्या, रोहित्र, मीटरिंग व्यवस्था यांच्या विस्ताराशी/वाढीशी संबंधित किंवा नवीन उप-केंद्र सुरु करण्याशी संबंधित कामे पूर्ण न होऊ शकल्यामुळे अद्याप प्रलंबित असेल तर, वितरण परवानाधारक अशी कामे कृती मानकांच्या विनियमांमध्ये घालण्यात आलेल्या काल-मर्यादेत पूर्ण करेल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक अर्जदाराला अशी कामे पूर्ण होईपर्यंत, विद्यमान पातळीवर वीज पुरवठा चालू ठेवेल आणि त्यानंतर अर्जदाराला मुक्त प्रवेश देईल;

परंतु असे की, या विनियम ४.२.४ च्या अंतर्गत पार पाडलेल्या कामांसाठी अर्जदाराकडून आकार वसूल करण्याचा वितरण परवानाधारकाला, जर अशा आकारांची वसूली विनियम ५.७ मध्ये केलेल्या तरतुदीनुसार निर्मिती केंद्राकडून करण्यात येत नसेल तर, वेळोवेळी सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि

पुरवठयाच्या इतर अटी) विनियम, २००५ अंतर्गत, आयोगाने आकारांच्या वसूलीसाठी विनिर्दिष्ट केलेल्या तत्त्वांना अनुसरुन, वसूल करण्याचा हक्क असेल.

४.२.४ **मीटर मधील नोंदी घेणेः** वितरण परवानाधारकाच्या अधिकृत प्रतिनिधीद्वारे ग्राहकाच्या मीटरमधील अंतिम नोंदी घेण्याचे काम, जेव्हा या विनियमांना अनुसरुन वितरण यंत्रणेची जोडणी व वापर करार अंमलात येईल त्यावेळी, करण्यात येईल.

परंतु असे की, मीटरमधील अंतिम नोंदी घेण्याचे काम ग्राहक, आणि निर्मिती कंपनी, ग्राहक, परवानाधारक, ज्याच्याकडून ग्राहकाचा वीज पुरवठा घेण्याचा उद्देश आहे, यांच्या अधिकृत प्रतिनिधीच्या उपस्थितीत करण्यात येईल. तथापि, ग्राहक, आणि निर्मिती कंपनी, ग्राहक, परवानाधारक किंवा पॉवर एक्स्चेंजचा सदस्य, ज्याच्याकडून ग्राहकाचा वीज पुरवठा घेण्याचा उद्देश आहे, यांच्या अधिकृत प्रतिनिधीने जर अशा मीटरच्या अंतीम नोंदी घ्यावयाच्या कामात सहभागी होण्यास नकार दिला तर वितरण परवानाधारकाचा अधिकृत प्रतिनिधी लेखी नोटीस देऊन अंतीम नोंदी घेईल, ज्या ग्राहकावर बंधनकारक राहतील.

४.२.५ **अतिरिक्त अधिभारः** जेव्हा एखादा ग्राहक या विनियम ४.१ अंतर्गत मुक्त प्रवेशाची मागणी करेल तेव्हा, या विनियमांतील विनियम १८ नुसार, वितरण परवानाधारकाला वहन आकारांवर अतिरिक्त अधिभार वसूल करण्याचा हक्क असेल.

४.२.६ **देय रकमांचा हिशोब करणेः** या विनियमांत काहीही नमूद करण्यात आले असेल तरी, वितरण परवानाधारकाच्या पात्र ग्राहकांना मुक्त प्रवेश देण्याची तरतुद ही, वितरण परवानाधाराकाला सर्व देय रकमा अदा करण्याच्या अधीन राहून असेल.

परंतु असे की, ग्राहक जर मविनिआ (नूतनशील ऊर्जेच्या निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० अंतर्गत "अनिश्चित वीज निर्माता" म्हणून ठरविण्यात आलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती प्रकल्पापासून किंवा पॉवर एक्स्चेंजकडून वीज प्राप्त करुन घेण्यासाठी वितरण यंत्रणेमध्ये दीर्घ-कालीन किंवा मध्यम-कालीन किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी अर्ज करत असेल तर त्याने वितरण परवानाधारकाला देय असलेल्या सर्व रकमा त्याला मुक्त प्रवेशाच्या अर्जाच्या दिनांकापूर्वी अदा कराव्या लागतील.

परंतु आणखी असे की, विजेसाठी लावण्यात आलेला कोणताही आकार किंवा आकाराशिवाय अन्य कोणत्याही रकमेची मागणी वितरण परवानाधारकाकडून ग्राहकाकडे करण्यात आल्यावरुन, पात्र ग्राहक आणि वितरण परवानाधारक यांच्यामध्ये वाद उद्‌भवल्यास, विवाद्य रकमेइतकी रक्कम अधिनियमाच्या कलम ५६ नुसार वितरण परवानाधारकाकडे अनामत म्हणून जमा करण्यात आली तरच, अशा वादाचे निराकरण प्रलंबित असेपर्यंत ग्राहकाला मुक्त प्रवेशाची परवानगी देण्यात येईल.

परंतु असेही की, वादाचे निराकरण झाल्यानंतर अशा जमा करण्यात आलेल्या अनामत रकमेपैकी जितकी रक्कम ग्राहकाला परत करण्यात येईल त्या रकमेवर वितरण परवानाधारकाला भारतीय रिझर्व बँकेच्या बँक दराइतक्या दराने व्याज अदा करावे लागेल.

परंतु आणखी असेही की, अर्ज करण्याच्या वेळी व्यक्तीला नादार किंवा दिवाळखोर म्हणून घोषित करण्यात आल्यास अशी व्यक्ति मुक्त प्रवेश मिळण्यासाठी पात्र राहणार नाही.

परंतु असेही की, जेव्हा कोणतीही रक्कम ग्राहकाच्या दोन देयक चक्रांपेक्षा जास्त कालावधीत भरणा करण्यात आली नसेल तर, अशा ग्राहकाने वितरण परवानाधारकाकडे अधिनियमाच्या कलम ५६ नुसार अशा देय रकमेइतकी रक्कम अनामत ठेवली तरच अशा ग्राहकाला मुक्त प्रवेश देण्यात येईल.

४.३ अर्जदाराला मुक्त प्रवेश देण्यासाठी आवश्यक कामे पूर्ण करण्याकरीता अधिनियमाखाली किंवा सध्या अस्तित्त्वात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली वितरण परवानाधारकाला हव्या असलेल्या सर्व आवश्यक मंजुऱ्या आणि वैधानिक परवानग्या मिळवून देण्यासाठी सर्व व्यवस्था मुक्त प्रवेशाची मागणी करणारा अर्जदार करील.

४.४ विजेची जोडणी देण्यासाठी आवश्यक असणारे विद्युत संयंत्र किंवा उपकरण अर्जदाराच्या जागेत बसविण्यासाठी सुयोग्य जागा किंवा खोली भाडेपट्टयाच्या तत्त्वावर उपलब्ध करुन देण्यास, मुक्त प्रवेशाची मागणी करणाऱ्या अर्जदाराला वितरण परवानाधारक कळवू शकेल.

परंतु असे की, जेव्हा मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून हस्तांतरित करावयाच्या विजेचे परिमाण एक (१) मेगावॉट पेक्षा जास्त असेल, तेव्हाच ही तरतूद लागू असेल.

परंतु असे की, वर उल्लेखलेला भाडेपट्टा हा वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ ( विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम २००५ नुसार, असेल.

४.५ विनियम ४.४ मध्ये काहीही नमूद करण्यात आले असले तरी, जेथे अशा जागेची किंवा खोलीची व्यवस्था स्थानिक प्राधिकरणाच्या विकास नियंत्रण नियमांतर्गत किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही संबंधित प्राधिकरणाद्वारे करणे आवश्यक असेल तर, अशा भाडेपट्ट्याच्या अटी व शर्ती या अशा नियमांनुसार किंवा सदर प्राधिकरणाद्वारे निश्चित करण्यात येतील.

## भाग-बी विजेची जोडणीयता

### ५. जोडणीयता मंजूर करणे

५.१ या भागामधील तरतुदींनुसार जर ५ मेगावॅट पेक्षा कमी स्थापित क्षमता असलेले निर्मिती केंद्र वितरण यंत्रणेशी यापूर्वी जोडलेले नसेल तर, निर्मिती केंद्र वितरण यंत्रणेशी जोडणीयता मागण्याकरिता अर्ज करण्यासाठी पात्र असेल आणि या विनियमांतील तरतुदींनुसार जोडणीयतेसाठी अर्ज करील.

परंतु असे की, ५ मेगावॅट पेक्षा जास्त स्थापित क्षमता असलेल्या निर्मिती केंद्राला देखील वितरण यंत्रणेशी जोडणीयता, जर विनियम ५.५ नुसार अशी जोडणीयता देणे तांत्रिकदृष्ट्या शक्य असेल तरच , देता येईल.

५.२ वितरण यंत्रणेशी जोडणीयता मागणारी स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पांसह सर्व पात्र निर्मिती केंद्रे, वितरण परवानाधारकाने घालून द्यावयाच्या कार्यपद्धतीमध्ये विहित करण्यात आलेल्या नमुन्यात वीज जोडणीयतेसाठी वितरण परवानाधारककाकडे अर्ज करतील.

परंतु असे की, वितरण परवानाधारक अशी कार्यपद्धत घालून देईपर्यंत, मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठी पूर्वीची कार्यपध्दत लागू राहील.

५.३ जोडणीयतेसाठीच्या अर्जासोबत विना-परताव्याचे रुपये दोन (२) लाखांचे शुल्क भरण्यात येईल.

परंतु असे की, नूतनशील ऊर्जेवर आधारित निर्मिती प्रकल्पाने केलेल्या अर्जाच्या बाबतीत विना-परताव्याचे शुल्क रुपये एक (१) लाख राहील.

५.४ जोडणीयतेसाठीच्या अर्जामध्ये, निर्मिती केंद्राचे नियोजित भौगोलिक ठिकाण, अंतःक्षेपण करावयाच्या विजेचे मेगावॅटमधील परिमाण आणि आयोगाने मान्यता द्यावयाच्या कार्यपद्धतीमध्ये संबंधित वितरण परवानाधारककाकडून मागण्यात येईल अशा अन्य तपशीलाचाही समावेश असेल.

५.५ वितरण परवानाधारक, अर्ज प्राप्त झाल्यानंतर, राज्य पारेषण कंपनीशी आवश्कयतेनुसार विचार-विनिमय करुन आणि समन्वय साधून,अर्जाची छाननी करील आणि वेळोवळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत प्राधिकरण (ग्रिडला जोडणीयतेसाठीची तांत्रिक मानके) विनियम, २००७ आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरण (स्थनिक निर्मिती स्त्रोतांना जोडणीयतेसाठीची तांत्रिक मानके) विनियम, २०१३ मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार आवश्यक आंतर-जोडणी अभ्यास करील.

५.६ वितरण परवानाधारक, विजेची जोडणीयता मंजूर करताना, ज्या उप-केंद्रात, किंवा संचय केंद्रात किंवा स्वीच-यार्डमध्ये जोडणीयता द्यावयची आहे त्याचे नांव विनिर्दिष्ट करील.

५.७ वितरण परवानाधारक स्वीच-यार्ड आणि वितरण परवानाधारकाच्या उप-केंद्रातील अंतःक्षेणाच्या (इंजेक्शन) ठिकाणपर्यंतची आंतर-जोडणी सुविधा, यांच्या डिझाइनची ढोबळ वैशिष्ट्ये आणि ती पूर्ण करण्यासाठीची काल-मर्यादा निर्देशित करील. या सुविधा उभारण्याचा खर्च निर्मिती कंपनी करील. जर वितरण परवानाधारकाच्या उप-केंद्राची वाढ करावी लागणार असेल तर बे, वितरण परवानाधारकाच्या उप-केंद्रातील ब्रेकर आणि राज्य भार प्रेषण केंद्राची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्ष माहितीची आंतर-जोडणी करण्याकरिता लागणा-या उपकरणांवरील खर्च देखील निर्मिती केंद्र सहन करेल.

परंतु असे की, निर्मिती कंपनीने निर्माण केलेल्या मत्तांची मालकी निर्मिती कंपनीकडे राहील.

५.८ वेळोवळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत प्राधिकरण (ग्रिडला जोडणीयतेसाठीची तांत्रिक मानके) विनियम, २००७ आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरण (स्थनिक निर्मिती स्त्रोतांना जोडणीयतेसाठीची तांत्रिक मानके) विनियम, २०१३ मधील तरतुदींचे अर्जदार आणि वितरण परवानाधारक पालन करतील.

५.९ जेथे विजेची जोडणीयता मंजूर करण्यात येत असेल तेथील वितरण परवानाधारकाशी अर्जदार वीज जोडणी करार करील.

परंतु असे की, वितरण परवानाधारक या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून साठ (६०) दिवसांच्या आत एक नमुना करार त्याच्या संकेत-स्थळावर प्रदर्शित करील.

परंतु असे की, वितरण परवानाधारकाच्या भावी ग्राहकाच्या बाबतीत, वितरण यंत्रणेला द्यावयाच्या जोडणीयतेचे नियमन वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ ( विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी ) विनियम २००५ मधील कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

५.१० या विनियमातील तरतुदींनुसार अर्जदार दीर्घ-कालीन, मध्यम-कालीन किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश प्राप्त करुन घेत नाही तोपर्यंत, अर्जदाराला विजेची जोडणीयता मंजूर करण्यात आली तरी त्यामुळे त्याला ग्रिडशी/ विद्युत यंत्रणेशी विजेचा कोणताही आंतर-बदल करण्याचा हक्क नसेल.

५.११ कोणत्याही प्रकारचा मुक्त प्रवेश मिळण्यापूर्वी, राज्य भार प्रेक्षण केंद्र आणि वितरण परवानाधारक यांच्याकडून परवानगी घेतल्यानंतर, जे अशी परवानगी देताना ग्रिडची सुरक्षितता विचारात घेतील, स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पासह वीज निर्मिती केंद्राला, ज्याला वितरण यंत्रणेला जोडणीयता मंजूर करण्यात आली आहे, वीज वाणिज्यिक वापरासाठी देण्यापूर्वी ग्रिडमध्ये अनिश्चित विजेचे अंतःक्षेपण करुन पूर्ण भार चाचणी करण्यासह चाचणीचे काम हाती घेण्यास परवानगी देण्यात येईल.

परंतु असे की, राज्य भार प्रेषण केंद्र आणि वितरण परवानाधारक यांची पूर्व-परवानगी प्राप्त करुन घेतल्यानंतर, स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पासह निर्मिती केंद्राच्या संचाला, ज्याला ग्रिडला जोडणीयता मंजूर करण्यात आली आहे, त्याची पहिल्या सिन्क्रोनायझेशनच्या दिनांकापासून वाणिज्यिक कामकाजास सुरूवात करण्याच्या दिनांकापूर्वी, सहा महिन्यापेक्षा जास्त नसलेल्या कालावधीकरिता पूर्ण भार चाचणी करण्यासह चाचणीच्या काळात, ग्रिडमध्ये अनिश्चित विजेचे अंतःक्षेपण करण्यास परवानगी देण्यत येईल.

परंतु आणखी असे की, वीज निर्मिती कंपनीने अपवादात्मक परिस्थितीत सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण होण्याच्या आत किमान दोन महिने आधी केलेल्या अर्जाबाबत, आयोग, संचाने पूर्ण भार चाचणीसह करावयाची चाचणी आणि त्यानंतर करावयाचे अनिश्चित विजेचे अंतःक्षेपण यांचा कालावधी सहा महिन्यांपेक्षा जास्त वाढविण्यास परवानगी देऊ शकेल.

परंतु आणखी असे की, वीज निर्मिती केंद्राच्या संचामधून अनिश्चित विजेचे अंतःक्षेपण, संचाची चाचणी आणि संच सुरु करण्याच्या प्रयोजनासाठी होत असल्याचे सिध्द करण्याची जबाबदारी, वीज निर्मिती कंपनीवर राहील आणि वाणिज्यिक कामकाजास सुरूवात करण्यापूर्वी विजेचे अंतःक्षेपण करण्याच्या प्रत्येक वेळी राज्य भार प्रेषण केंद्र अशी माहिती मागेल. याकरिता, वीज निर्माता विशिष्ट चाचणी आणि संचाच्या कामास सुरूवात करण्याच्या कामाचा तपशील, त्याचा कालावधी आणि उद्देशित वीज अंतःक्षेपण इ. याबाबत राज्य भार प्रेषण केंद्राला पुरेशी माहिती देईल.

परंतु असे की, अ-पारंपरिक ऊर्जा स्त्रोत वगळता अन्य निर्मिती केंद्र किंवा त्याच्या संचाकडून मिळणा-या अशा अनिश्चित विजेच्या वाणिज्यिक हाताळणीचे नियमन वेळोवळी सुधारणा केलेल्या मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ ने करण्यात येईल. आयोगाने ज्या निर्मिती केंद्राचा वीज दर निश्चित केलेला नाही अशा अन्य निर्मिती केंद्राकडून, अशा चाचणीच्या परिणामस्वरुप, ग्रिडमध्ये करण्यात आलेला विजेच्या अंतःक्षेपणाकरिता, यंत्रणा सर्वोच्च किंमतीने (सिस्टिम मार्जिनल प्राइस-एस एम पी) किंवा राज्यात वेळोवेळी प्रचलित असलेल्या राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली निश्चित केलेल्या अन्य कोणत्याही राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दरातील हिशोबपूर्ती आकारांनी, किंवा निर्माता ज्या वितरण परवानाधारकाला जोडलेला असेल अशा वितरण परवानाधारकाच्या मागील वर्षाच्या वीज दराच्या आदेशात आयोगाने मान्यता दिलेल्या दीर्घ-कालीन वीज खरेदीच्या सरासरी अस्थिर खर्चाने, जे कमी असेल त्याप्रमाणे, आकारणी करण्यात येईल.

परंतु असे की, अनिश्चित विजेचे अंतःक्षेपण करण्यापूर्वी, स्व-वापरासाठीचा निर्मिती प्रकल्पासह निर्मिती केंद्र, वितरण परवानाधारकाबरोबर अनिश्चित विजेचा पुरवठा करण्यासाठी करार करील.

परंतु आणखी असे की, निर्मात्याने विजेच्या विक्रीसाठी कोणत्याही परवानाधारकाबरोबर करार केलेला नसेल तर ग्रिडमध्ये अंतःक्षेपण केलेल्या अशा अनिश्चित विजेकरिता आकार शुन्य करण्यात येतील आणि ही अनिश्चित वीज, निर्माता ज्या वितरण परवानाधारकाला जोडलेला असेल, त्याच्या खाती जमा करण्यात येईल.

५.१२ वितरण यंत्रणेला यापूर्वीच जोडलेल्या वीज निर्मात्याला किंवा ग्राहकाला, किंवा ज्यांना विद्यमान व्यवस्थेखाली यापूर्वीच जोडणीयता देण्यात आली आहे त्यांना त्याच क्षमतेच्या जोडणीयतेकरिता अर्ज करण्याची आवश्यकता नसेल. तथापि

स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पासह वीज निर्मात्याच्या क्षमतेत वाढ झाली तर किंवा स्व-वापरासाठीच्या उपयोगकर्त्यासह ग्राहकाच्या विजेच्या गरजेमध्ये वाढ झाली तर त्याला या विनियमांतर्गत जोडणीयतेच्या तरतुदींमध्ये फेरबदल करण्यासाठी नवीन अर्ज करावा लागेल.

परंतु असे की, विजेची जोडणीयता जरी यापूर्वीच स्थापित करण्यात आली असली तरी त्यामुळे वीज निर्माता जोपर्यंत दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश, मध्यम-कालीन मुक्त प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश, जसे असेल तसे, प्राप्त करुन घेत नाही तोपर्यंत त्याला ग्रिडशी विजेचा कोणताही आंतर-बदल करण्याचा हक्क नसेल.

५.१३ वितरण परवानाधारक अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीच्या आत जोडणीयता मंजूर करण्याबाबत आपला निर्णय कळवेल.

## भाग-सी मुक्त प्रवेशासाठी सर्वसाधारण तरतूदी

### ६. करार

६.१ या विनियामांनुसार मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आल्यानंतर वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीचा करार या सोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार असेल.

परंतु असे की, विनियम ३.१ नुसार पॉवर एक्स्चेजकडून वीज पुरवठा मिळण्यासाठी केलेल्या मुक्त प्रवेशाच्या अर्जाला देखील हा विनियम लागू राहील.

परंतु असे की, या विनियमांनुसार अशा ग्राहकाला/व्यक्तीला मुक्त प्रवेशाद्वारे विजेचा पुरवठा प्राप्त करुन घेणे शक्य व्हावे यासाठी, वितरण परवानाधारक, सदर वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठी कराराचा नमुना त्याच्या इंटरनेटवरील संकेत-स्थळावर, उतरवून घेण्याच्या स्वरुपात, असा ग्राहक/व्यक्ती मुक्त प्रवेशासाठी पात्र झाल्याच्या दिनांकापासून साठ (६०) दिवसांच्या आत किंवा परवाना मंजूर करण्यात आल्यानंतर साठ (६०) दिवसांच्या आत, जे नंतर असेल त्याप्रमाणे, प्रदर्शित करील.

६.२ वितरण परवानाधारक पात्र ग्राहकाला /व्यक्तीला वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठी करारावर सही करण्यापूर्वी कमीत कमी दोन (२) दिवसांची नोटीस देईल ज्यात —

(अ) अशा ग्राहकाला/व्यक्तीला मुक्त प्रवेश मंजूर करण्याकरिता या विनियम आणि अधिनियमाखालील सर्व कामे आणि सर्व आवश्यकता पूर्ण झाल्याची पुष्टी देणे;

(ब) लागू असल्यास, ग्राहकाच्या जागेतील मीटर मधील अंतिम नोंदी घेण्याचा दिनांक आणि वेळ; आणि

(क) लागू असल्यास, वीज पुरवठ्याचा करार समाप्त करण्याचा आणि वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठी करार सुरु करण्याचा दिनांक व वेळ; कळविण्यात येईल.

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहक त्याला मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आल्यापासून ३० दिवसांच्या आत, वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारावर सही करण्याची प्रक्रिया सुरु करील व असे न केल्यास वितरण परवानाधारक मुक्त प्रवेशाची परवानगी रद्द करु शकेल.

### ७. जागा व मालमत्तेमध्ये प्रवेश

७.१ वितरण परवानाधारकाच्या अधिकृत प्रतिनिधींशिवाय, किंवा अधिनियम आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियम आणि विनियमांखाली अधिकृत करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीशिवाय, कोणत्याही व्यक्तीला, कोणतेही विद्युत सयंत्र, विद्युत वाहिन्या किंवा मीटर चालवण्याचा, हाताळण्याचा किंवा काढून टाकण्याचा किंवा ग्राहकाच्या जागेतील वितरण परवानाधारकाच्या मालमत्तेवरील लावलेली मोहर, नावाच्या पाट्या आणि ओळख क्रमांक किंवा खुणा तोडण्याचा, काढून टाकण्याचा किंवा खोडून टाकण्याचा किंवा अन्य प्रकारे त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसेल.

परंतु असे की, असा अधिकृत प्रतिनिधी वरील पैकी कोणतीही कामे, ग्राहक किंवा त्याच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीशिवाय, करणार नाही;

परंतु आणखी असे की, ग्राहकाच्या जागेला अधिकृत प्रतिनिधीच्या भेटीची पूर्व-सूचना वितरण परवानाधारक देईल. तथापि कोणतीही व्यक्ती विजेचा अनधिकृत वापर करीत असल्याबाबत आणि/किंवा अशा जागेत अधिनियमाच्या भाग १४ मध्ये तरतूद केलेल्या स्वरुपाचा गुन्हा करीत असल्याबाबात, विश्वास ठेवण्यास कारण असल्यास, अशी पूर्व-सूचना दिली जाणार नाही.

७.२ जर विजेचा अनधिकृत वापर होत असल्याबाबत किंवा अधिनियमाच्या भाग १४ खाली गुन्हा होत असल्याबाबतच्या गृहितकावर जागेची तपासणी करण्यात येत असल्यास, अधिनियमाच्या कलम १२६ खाली राज्य सरकारने पदनिर्देशित केलेल्या किंवा अधिनियमाच्या कलम १३६ खाली राज्य सरकारने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने, जसे असेल तसे, जागेला दिलेल्या भेटीची नोंद वितरण परवानाधारकाने ठेवावयाच्या दैनिक रोजवहीमध्ये ठेवण्यात येईल ज्यामध्ये अशा अधिकाऱ्याचे नाव आणि ग्राहकाच्या जागेला द्यावयाच्या भेटीचा तपशील ठेवण्यात येईल.

परंतु असे की, जेथे शक्य असेल तेथे, अशा भेटीसाठी दोन स्वतंत्र साक्षीदार नेण्यात येतील आणि अशा अधिकाऱ्याने ग्राहकाच्या जागेला दिलेल्या भेटीच्या निर्ष्कषाबाबतच्या तयार केलेल्या अहवालावर त्याच्या शेऱ्यासह, असल्यास, अधिकाऱ्याने सही केलेली असेल आणि त्यावर ग्राहक आणि/किंवा त्याच्या प्रतिनिधीने आणि अशा साक्षीदारांनी सह्या केलेल्या असतील;

परंतु असेही की, ग्राहक किंवा त्याच्या प्रतिनिधीने अहवालावर सही करण्यास नकार दिल्यास त्याची नोंद सदर अहवालात करण्यात येईल;

परंतु असेही की, तपासणी अहवालाची एक प्रत ग्राहकाला देण्यात येईल. तथापि, ग्राहकाने नकार दिल्यास, तपासणी अहवालत त्याची नोंद घेण्यात येईल व तो जागेच्या आत किंवा बाहेर मोक्याच्या ठिकाणी चिकटविण्यात येईल व त्याचा एक फोटो काढून ठेवण्यात येईल. त्याशिवाय, तपासणी अहवालाची एक प्रत ग्राहकाला रजिस्टर्ड पोस्टाने त्याच दिवशी किंवा तपासणी झाल्याच्या पुढील कामाच्या दिवशी पाठविण्यात येईल.

## ८. मुक्त प्रवेशाची वर्गवारी

८.१ मुक्त प्रवेश ग्राहकांची वर्गवारी

पात्र ग्राहकांनी मुक्त प्रवेश मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाची कार्यपद्धत, अर्जसोबतचे शुल्क आणि अर्जाची छाननी करण्यासाठी कालमर्यादा, या बाबी खालील निकषांवर आधारित असतील-

८.१.१ आप-आपसात वीज खेचण्याची आणि वीज अंतःक्षेपण करण्याची ठिकाणे—

(अ) दोन्ही ठिकाणे त्याच वितरण यंत्रणेत

(ब) राज्याच्या अंतर्गत परंतु वेगवेगळ्या वितरण यंत्रणांमध्ये

(क) वेगवेगळ्या राज्यांमध्ये

८.१.२ मुक्त प्रवेशाचा कालावधी

(अ) <u>दीर्घ-कालीन प्रवेश</u>

ज्या व्यक्तींने १२ वर्षापेक्षा जास्त परंतु २५ वर्षापेक्षा जास्त नसलेल्या कालावधीकरिता वितरण यंत्रणेमध्ये प्रवेश घेतला आहे किंवा घेण्याचा उद्देश आहे अशी व्यक्ती दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता असेल;

परंतु असे की, वितरण यंत्रणेचे विद्यमान दीर्घ-कालीन लाभधारक हे त्या विशिष्ट यंत्रणेचे मानीव दीर्घ-कालीन उपयोगकर्ते असतील;

(ब) <u>मध्यम-कालीन मुक्त प्रवेश</u>

ज्या व्यक्तीने ३ महिन्यांपेक्षा जास्त परंतु ३ वर्षापेक्षा जास्त नसलेल्या कालावधींकरीता वितरण यंत्रणेमध्ये प्रवेश घेतला आहे किंवा घेण्याचा उद्देश आहे अशी व्यक्ती मध्यम-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता म्हणून मानण्यात येईल

(क) <u>अल्प-कालीन मुक्त प्रवेश</u>

ज्या व्यक्तींनी वितरण यंत्रणेमध्ये एक (१) महिन्यापेक्षा जास्त नसलेल्या कालावधींसाठी मुक्त प्रवेश घेतला आहे किंवा घेण्याचा उद्देश आहे अशी व्यक्ती अल्प-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता म्हणून मानण्यात येईल.

परंतु असे की, अल्प-कालीन आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता त्याची मुदत संपल्यानंतर मुक्त प्रवेश प्राप्त करुन घेण्यासाठी पात्र किंवा फेर-पात्र राहील.

## ९. मुक्त प्रवेशासाठी अर्ज करण्याची कार्यपद्धत

९.१ या विनियमानुसार, मुक्त प्रवेशासाठी सर्व अर्ज विहित नमुन्यात करण्यात येतील आणि ते नोडल एजन्सीला, आयोगाकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या शुल्क आणि अन्य आकारांसह, सादर करण्यात येतील.

परंतु असे की, विनियम ९.२ मध्ये उल्लेखलेली कालमर्यादा, सर्व बाजूंनी परिपूर्ण असलेला अर्ज सादर करण्याच्या दिनांकापासून लागू होईल.

९.२ नोडल एजन्सी, अर्जासोबत पाठवावयाचे दस्तावेज आणि अर्ज निकाली काढण्यासाठी कालमर्यादा, या बाबी खालील तक्यात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतीलः -

| वितरण मुक्त प्रवेश मागणारा ग्राहक | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **कालावधी** | **आप-आपसात वीज खेचण्याचे (ड्रॉअल) आणि अंतःक्षेपण (इंजेक्शन)करण्याचे ठिकाण** | **नोडल एजन्सी** | **अर्जासोबत जोडावयाचे दस्तावेज** | **अर्जाची छाननी करण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या-पासूनच्या दिवसात)** |
| १ | अल्प-कालीन मुक्त प्रवेश | **दोन्ही त्याच वितरण परवानाधारकाच्या अंतर्गत** | ज्याच्या वितरण यंत्रणेला ग्राहक जोडला आहे असा वितरण परवानाधारक | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा खरेदी-विक्री करार, अर्जदार वितरण परवानाधारकाचा ग्राहक असल्यास त्याच्या ताजा ग्राहक देयकाची प्रत | • अ.का.मु.प्र साठी पहिला अर्ज असल्यास दहा (१०) कामाच्या दिवसात<br>• त्यानंतरचा अ.का.मु.प्र अर्ज पाच (५) कामाच्या दिवसात |
| २ | | **दोन्ही राज्याच्या अंतर्गत परंतु वेगवेगळ्या वितरण परवानाधारकांच्या क्षेत्रात** | ज्याच्या वितरण यंत्रणेला ग्राहक जोडला आहे असा वितरण परवानाधारक | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा खरेदी-विक्री करार, अर्जदार वितरण परवानाधारकाचा ग्राहक असल्यास त्याच्या ताजा ग्राहक देयकाची प्रत | • अ.का.मु.प्र साठी पहिला अर्ज असल्यास दहा (१०) कामाच्या दिवसात<br>• त्यानंतरचा अ.का.मु.प्र अर्ज पाच (५) कामाच्या दिवसात |
| ३ | | **राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये वीज अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण राज्याच्या अंतर्गत** | ज्याच्या वितरण यंत्रणेला ग्राहक जोडला आहे असा वितरण परवानाधारक | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा खरेदी-विक्री करार, अर्जदार वितरण परवानाधारकाचा ग्राहक असल्यास त्याच्या ताजा ग्राहक देयकाची प्रत | • अ.का.मु.प्र साठी पहिला अर्ज असल्यास दहा (१०) कामाच्या दिवसात<br>• त्यानंतरचा अ.का.मु.प्र अर्ज पाच (५) कामाच्या दिवसात |
| ४ | | **वेगवेगळ्या राज्यांमध्ये** | जेथे ग्राहक स्थित असेल तेथील प्रादेशिक भार प्रेक्षण केंद्र | लागू असल्याप्रमाणे संबधित राज्य भार प्रेषण केंद्रे आणि वितरण परवानाधारकांकडून संमती, अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा खरेदी-विक्री | केंद्रीय आयोगाच्या विनियमांप्रमाणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | करार, अर्जदार वितरण परवानाधारकाचा ग्राहक असल्यास त्याच्या शेवटच्या ग्राहक देयकाची प्रत | |
| ५ | | **ग्राहकाने पॉवर एक्स्चेंजकडून वीज पुरवठा घेण्याचा पर्याय स्वीकारल्यास** | ज्याच्या वितरण यंत्रणेला ग्राहक जोडला आहे असा वितरण परवानाधारक | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, पॉवर एक्स्चेंजशी संबंधित दस्तावेज, अर्जदार वितरण परवानाधारकाचा ग्राहक असल्यास त्याच्या शेवटच्या ग्राहक देयकाची प्रत | • अ.का.मु.प्र साठी पहिला अर्ज असल्यास दहा (१०) कामाच्या दिवसात<br>• त्यानंतरचा अ.का.मु.प्र अर्ज पाच (५) कामाच्या दिवसात |
| ६ | मध्यम-कालीन मुक्त प्रवेश | **दोन्ही त्याच वितरण परवानाधारकाच्या अंतर्गत** | ज्याच्या वितरण यंत्रणेला ग्राहक जोडला आहे असा वितरण परवानाधारक | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रिडला जोडलेले नसेल तर, म.का.मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा | तीस (३०) दिवस |
| ७ | | **दोन्ही त्याच राज्याच्या अंतर्गत परंतू वेगवेगळ्या वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रात** | ज्याच्या वितरण यंत्रणेला ग्राहक जोडला आहे असा वितरण परवानाधारक | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रिडला जोडलेले नसेल तर, म.का.मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा, दुस-या वितरण परवानाधारकाची संमती | साठ (६०) दिवस |
| ८ | | **राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये वीज अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण राज्याच्या अंतर्गत** | ज्याच्या वितरण यंत्रणेला ग्राहक जोडला | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर | साठ (६०) दिवस |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आहे असा वितरण परवानाधारक | यापूर्वीच ग्रिडला जोडलेले नसेल तर, म.का.मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा | |
| ९ | | **वेगवेगळ्या राज्यांमध्ये** | केंद्रीय पारेषण कंपनी | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रिडला जोडलेले नसेल तर, म.का.मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा, लागू असल्याप्रमाणे संबंधित राज्य भार प्रेषण केंद्रे आणि वितरण परवानाधारकांकडून संमती | केंद्रीय आयोगाच्या विनियमांप्रमाणे |
| १० | दीर्घ-कालीन प्रवेश | **दोन्ही त्याच वितरण परवानाधारकाच्या अंतर्गत** | ज्याच्या वितरण यंत्रणेला ग्राहक जोडला आहे असा वितरण परवानाधारक | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रिडला जोडलेले नसेल तर, दी.का.मु.प्र. देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा | तीस (३०) दिवस |
| ११ | | **दोन्ही राज्याच्या अंतर्गत परंतू वेगवेगळ्या वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रात** | ज्याच्या वितरण यंत्रणेला ग्राहक जोडला आहे असा वितरण परवानाधारक | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रिडला जोडलेले नसेल तर, दी.का.मु.प्र. देण्याच्या | • वितरण यंत्रणेत वाढ करण्याची गरज नसल्यास एकशे वीस (१२०) दिवस<br>• वितरण यंत्रणेत वाढ करण्याची गरज असल्यास एकशे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा, संबंधित वितरण परवानाधारकांची संमती | ऐंशी (१८०) दिवस |
| १२ | | **राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये वीज अंत:क्षेपण करण्याचे ठिकाण राज्याच्या अंतर्गत** | ज्याच्या वितरण यंत्रणेला ग्राहक जोडला आहे असा वितरण परवानाधारक | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रिडला जोडलेले नसेल तर, दी.का.मु. प्र. देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा, संबंधित वितरण परवानाधारकाची संमती | • वितरण यंत्रणेत वाढ करण्याची गरज नसल्यास एकशे वीस (१२०) दिवस<br>• वितरण यंत्रणेत वाढ करण्याची गरज असल्यास एकशे ऐंशी (१८०) दिवस |
| १३ | | **वेगवेगळ्या राज्यांमध्ये** | केंद्रीय पारेषण कंपनी | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र जर यापूर्वीच ग्रिडला जोडलेले नसेल तर, दी.का.प्र. देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा, लागू असल्याप्रमाणे संबंधित राज्य भार प्रेषण केंद्रे आणि वितरण परवानाधारकांकडून संमती | केंद्रीय आयोगाच्या विनियमाप्रमाणे |

परंतु असे की, आयोगाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या आकारांच्या अनुसूचीनुसार शुल्क लागू राहील.

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहकाकडून जी दस्तावेज सादर करण्यात येतील त्यामध्ये, लागू असेल त्याप्रमाणे, मुक्त प्रवेश उपयोगकर्ता ज्या ठिकाणी स्थित असेल त्याच्या नोडल अधिका-यांचा तांत्रिक शक्यता अहवाल, तपशीलवार वैशिष्ट्यांसह एस इ एम आणि सी टी / पी टी च्या विद्युत मांडणीबाबतचे तपासणी विभागाचे प्रमाणपत्र, स्त्रोत निर्मात्याची मान्यता, जर वीज व्यापा-यांमार्फत वीज घेण्यात येणार असेल तर त्याच्या वीज व्यापार परवान्याची प्रत, पॉवर एक्स्चेंजकडून वीज घेण्यात येणार असेल तर पॉवर एक्स्चेंजचे पत्र, स्व-वापरासाठीच्या प्रकल्पाकडून वीज घेण्यात येणार असेल तर संस्थापन समयलेख (मेमोरेंडम ऑफ असोसिएशन) आणि भागधारणेबाबत आणि ऐपतदारी प्रमाणपत्र संबंधीचे सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र, हे दस्तावेजदेखील असतील.

परंतु असे की, स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पातून वीज घेण्यात येणार असेल तर, भागधारणेच्या प्रमाणात (शेअरहोल्डींग पॅटर्न्) काही बदल झाला तर विनियम ९.२ मध्ये उल्लेखलेल्या कालमर्यादेच्या प्रयोजनासाठी, तो नवीन अर्ज म्हणून हाताळण्यात येईल :

परंतु असे की, राज्यांतर्गत पारेषण मुक्त प्रवेश मागणारा वितरण परवानाधारकाचा ग्राहक पारेषण यंत्रणेशी जोडलेला असेल तर, संबंधित वितरण परवानाधारकाकरीता आयोगाने विनिर्दिष्ट केलेले प्रचालन आकार किंवा अन्य कोणतेही आकार ग्राहक, तो ज्या वितरण परवानाधारकाच्या परवानाक्षेत्रात स्थित असेल त्या वितरण परवानाधारकाला देय राहील :

परंतु असे की, विजेचे अंतःक्षेपण (इंजेक्शन) करण्याचे ठिकाण व वीज खेचण्याचे (ड्रॉअल) ठिकाण जर राज्यातील वेगवेगळ्या वितरण परवानाधारकांच्या क्षेत्रात असेल तर, ग्राहकाला या विनियमांतील विनियम ९.२ चे पालन करण्यासाठी दोन्ही वितरण परवानाधारकांच्या मान्यता घ्याव्या लागतीलः

परंतु असे की, दोन्ही वितरण परवानाधारकांच्या प्राप्त झालेल्या मान्यता ग्राहकाकडून राज्य भार प्रेषण केंद्राला सादर करण्यात येतील.

## १०. दीर्घकालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धत

### १०.१ आंतर-राज्य पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यास

खालील विनियम १०.२ मध्ये काहीही नमूद केले असले तरी, आंतरराज्य दीर्घकालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धत वेळोवेळी अंमलात असलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणी मंजूर करणे, आंतर-राज्य पारेषणामध्ये दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश आणि मध्यमकालीन मुक्त प्रवेश आणि संबंधित बाबी) विनियम, २००९ प्रमाणे असेलः

परंतु असे की, वितरण यंत्रणेशी जोडलेल्या ग्राहकाला आंतरराज्य दीर्घकालीन मुक्त प्रवेश हवा असेल तर राज्य भार प्रेक्षण केंद्र त्यांची संमती प्रादेशिक भार प्रेषण केंद्राला कळविण्यापूर्वी, केंद्रीय आयोगाच्या विनियमांमध्ये आवश्यक असल्याप्रमाणे, येथील विनियम १३ नुसार ग्राहकाला संबंधित वितरण परवानाधाारकाची संमती सादर करण्यास कळवील.

### १०.२ <u>वितरण यंत्रणेच्या अंतर्गत</u>

येथे वर नमूद केलेल्या विनियम १०.१ मधील तरतुदींना अधीन राहून, ग्रिडमध्ये विजेच्या अंतःक्षेपणाचे ठिकाण आणि वीज खेचण्याचे ठिकाण त्याच वितरण यंत्रणेमध्ये असतील तेव्हा दीर्घकालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धत ही येथे पुढील उप-खंड (ए) ते (एल ) मधील तरतुदींना अनुसरुन असेल -

(ए) दीर्घ-कालीन प्रवेश मंजूर करण्यासाठीच्या अर्जात जेथून वीज प्राप्त करून घ्यावयाची असेल अशा कंपनीचे नाव किंवा कंपन्यांची नावे, प्राप्त करून घ्यावयाच्या विजेचे मेगावॅट मधील परिमाण आणि वितरण परवानाधारकाने सविस्तर कार्यपद्धतीमध्ये नमूद केलेला इतर तपशील, यांचा समावेश असेल. दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशासाठी करावयाचा नमुना अर्ज, जोडपत्र- ४ मध्ये देण्यात आला आहे.

जेथे मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठी वितरण यंत्रणेत वाढ करण्याची आवश्यकता असेल आणि ज्या व्यक्तीला विजेचा पुरवठा करावयाचा आहे त्या व्यक्तीला पुरवठा करावयाच्या विजेचे परिमाण किंवा कोणत्या स्रोतातून वीज पुरवठा घ्यावयाचा आहे, ते निश्चित करण्यात आलेले नसेल तर, वितरण यंत्रणेचा वापर करून विजेचे जितके परिमाण आंतरबदल करावयाचे ठरविले असेल, ते अर्जदार निर्देशित करीलः

परंतु आणखी असे की, वितरण यंत्रणेत वाढ करण्याची आवश्यकता असल्यास, त्यासाठी येणारा खर्च, जरी विजेचा पुरवठा करण्याचे परिमाण किंवा खरेदीचे स्रोत निश्चित करण्यात आले नसले तरी, जेथे अशा आकारांची वसुली विनियम ५.७ मधील तरतुदींनुसार निर्मिती केंद्राकडून करण्यात येत नसेल तेथे, या विनियमांनुसार अर्जदाराला करावा लागेलः

परंतु असेही की, अशी वाढ करणे सुलभ व्हावे यासाठी, वीज पुरवठ्याचा अचूक स्रोत किंवा वीज जोडणी घेण्याचे ठिकाण, जसे असेल तसे, निश्चित करावे लागेल आणि त्यानुसार ते वितरण परवानाधारकाला, दीर्घ-कालीन प्रवेश प्राप्त करून घेण्याच्या उद्देशित दिनांकाच्या कमीत कमी दोन (२) वर्षे आधी किंवा वितरण परवानाधारकाने वितरण यंत्रणेच्या वाढीकरिता अंदाजित केलेला कालावधी, यापैकी जो कमी असेल त्यानुसार, कळविणे आवश्यक आहेः

परंतु आणखी असे की, अर्जदाराच्या ठिकाणात कोणताही महत्त्वाचा बदल झाला असल्यास किंवा वितरण यंत्रणेचा वापर करुन आंतरबदल करावयाच्या विजेच्या परिमाणात १० टक्यापेक्षा जास्त बदल झाला असल्यास, एक नवीन अर्ज करण्यात येईल आणि सदर अर्जाचा विचार या विनियमांनुसार करण्यात येईल.

(बी) वितरण परवानाधारकाला सर्व बाजूंनी विचार करून वितरण यंत्रणेचे नियोजन करणे शक्य व्हावे यासाठी, वितरण यंत्रणेचा वापर करून विजेचे आंतरबदल करावयाचे परिमाण आणि विविध विद्युत कंपन्या किंवा प्रदेशांकडे किंवा त्यांच्यापासून पारेषण करावयाच्या विजेचे निर्धारण, यांचा आधार, अर्जदार सादर करील.

(सी) पारेषित करावयाच्या एकूण विजेच्या प्रति मेगावॅट रुपये १०,००० (रुपये दहा हजार) प्रमाणे बँक हमी अर्जासोबत जोडण्यात येईल. सदर बँक हमी ही वितरण परवानाधारकाच्या नावे असेल आणि ती सविस्तर कार्यपद्धतीमध्ये घालून देण्यात आलेल्या रितीनुसार असेलः

परंतु असे की, नूतनशील ऊर्जेवर आधारित व्यवहाराकरिता बँक हमी ही पारेषित करावयाच्या एकूण विजेच्या प्रति मेगावॅट रुपये ५,००० (रुपये पाच हजार) राहील.

(डी) जर वितरण यंत्रणेमध्ये वाढ करण्याची गरज असेल तर, वरील नियम १०.२ (सी) मधील तरतुदीप्रमाणे देण्यात आलेली बँक हमी दीर्घकालीन मुक्त प्रवेश करार होईपर्यंत आणि जर वितरण यंत्रणेमध्ये वाढ करण्याची गरज नसेल तर, दीर्घकालीन मुक्त प्रवेश सुरू होईपर्यंत, वैध व अस्तित्वात राहील.

(इ) अर्जदाराने जर अर्ज मागे घेतला तर किंवा वितरण यंत्रणेत वाढ करण्याची गरज नसेल तेव्हा दीर्घकालीन प्रवेशाचे हक्क अस्तित्वात येण्यापूर्वी, सोडून देण्यात आले तर वितरण परवानाधारकाकडून बँक हमीचे रोखीकरण करण्यात येईल.

(एफ) जेव्हा वितरण यंत्रणेत वाढ करण्याची गरज असेल तेव्हा बांधकाम चालू असताना, सविस्तर कार्यपद्धतीमधील तरतुदींनुसार, अर्जदाराकडून वितरण परवानाधारकाला जी बँक हमी सादर करावयाची गरज असते ती त्याला सादर करण्यात आल्यानंतर, उपरोक्त बँक हमी मुक्त (डिस्चार्जड) होईल.

(जी) वितरण परवानाधारक, अर्ज प्राप्त झाल्यानंतर, वितरण यंत्रणेचा वापर करु शकणाऱ्या अन्य संस्थांशी विचार-विनिमय करून आणि त्यांच्याशी समन्वय साधून, अर्जाची छाननी करील आणि येथे वरील विनियम ९.२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत दीर्घकालीन प्रवेश मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात येईल याची खात्री करण्यासाठी आवश्यक यंत्रणा अभ्यास शक्य तितक्या त्वरेने पूर्ण करीलः

परंतु असे की, वितरण परवानाधारकाला विचारविनिमयाच्या किंवा समन्वयाच्या प्रक्रियेमध्ये कोणतीही अडचण आली तर तो आयोगाकडे योग्य निर्देश मागण्यासाठी येऊ शकेल.

(एच) वरील यंत्रणा अभ्यासाच्या आधारे, दीर्घकालीन प्रवेश देण्यासाठी कोणती वितरण यंत्रणा आवश्यक असेल ते वितरण परवानाधारक विनिर्दिष्ट करील; जर विद्यमान वितरण यंत्रणेमध्ये वाढ करावयाची गरज असेल तर अर्जदाराला तसे कळविण्यात येईल.

(आय) वितरण परवानाधारक, दीर्घकालीन मुक्त प्रवेश मंजूर करताना, ज्या दिनांकापासून दीर्घकालीन मुक्त प्रवेश मंजूर करण्यात येईल तो दिनांक आणि अंदाजित वहन आकार, अर्जदाराला कळवील.

(जे) वितरण परवानाधारकाने जर दीर्घकालीन मुक्त प्रवेश मंजूर केला तर, सविस्तर पद्धतीमध्ये करण्यात येतील अशा तरतुदींनुसार, अर्जदार दीर्घकालीन मुक्त प्रवेशासाठी वितरण परवानाधारकाबरोबर वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठी करार करील. दीर्घकालीन प्रवेशासाठीच्या करारात दीर्घकालीन मुक्त प्रवेशाची सुरूवात झाल्याचा दिनांक, ग्रिडमध्ये विजेचे अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण आणि ग्रिडमधून वीज खेचण्याचे ठिकाण आणि ग्राहकाधिष्ठित वितरण वाहिन्यांचा, गरज असल्यास, तपशील समाविष्ट असेल. वितरण यंत्रणेमध्ये वाढ करण्याची गरज असल्यास, दीर्घकालीन मुक्त प्रवेश करारामध्ये, अर्जदार आणि वितरण परवानाधारकांच्या सुविधांच्या बांधकामासाठी कालमर्यादा, अर्जदाराने आवश्यक असलेली द्यावयाची बँकेची हमी आणि सविस्तर कार्यपद्धतीनुसार अन्य तपशील, यांचा समावेश असेल.

(के) दीर्घकालीन प्रवेश मंजूर केल्यानंतर वितरण परवानाधारक, राज्य भार प्रेषण केंद्राला तसे ताबडतोब कळवेल ज्यामुळे केंद्राला याचा विचार, या कराराखाली वीज पुरवठ्याचे कालपरिमाण निर्धारण (शेड्यूलिंग) करण्यासाठी आलेल्या मागण्यांची छाननी करताना, करणे शक्य होईल.

(एल) दीर्घकालीन मुक्त प्रवेशाची मुदत संपल्यानंतर, ग्राहकाने मुदत संपण्याच्या किमान सहा महिने आधी वितरण परवानाधारकाला लेखी विनंती करून त्यात किती कालावधीसाठी वाढ करून हवी असेल ते नमूद केल्यास त्याप्रमाणे मुदत वाढ देण्यात येईलः

परंतु असे की, वर विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत ग्राहकाकडून कोणतीही विनंती न आल्यास, सदर दीर्घकालीन मुक्त प्रवेश, तो सुरूवातीला ज्या दिनांकापर्यंत मंजूर करण्यात आला असेल त्या दिनांकास समाप्त होईल.

**११ मध्यमकालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धती**

**११.१ आंतरराज्य पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यास**

खालील विनियम ११.२ मध्ये पुढे काहीही नमूद केले असले तरी, आंतर-राज्य मध्यम-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धत वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणीयता मंजूर करणे, आंतरराज्य पारेषणामध्ये दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि संबंधित बाबी) विनियम, २००९ प्रमाणे असेलः

परंतु असे की, वितरण यंत्रणेशी जोडलेल्या ग्राहकाला आंतर-राज्य दीर्घ- कालीन प्रवेश हवा असेल तर राज्य भार प्रेक्षण केंद्र, त्यांची संमती प्रादेशिक भार प्रेषण केंद्राला कळविण्यापूर्वी, केंद्रीय आयोगाच्या विनियमांमध्ये आवश्यक असल्याप्रमाणे, येथील विनियम १३ नुसार ग्राहकाला संबंधित वितरण परवानाधारकाची संमती सादर करण्यास कळवील.

**११.२ वितरण यंत्रणेच्या अंतर्गत**

येथे वर नमूद केलेल्या विनियम ११.१ मधील तरतुदींना अधीन राहून, जेव्हा वीज अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण आणि वीज खेचण्याचे ठिकाण त्याच वितरण यंत्रणे अंतर्गत असतील तर मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धती ही येथे पुढील उप-खंड (ए) ते (एफ) मधील तरतूदींना अनुसरुन असेल -

(ए) मध्यम-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठीच्या अर्जात, सविस्तर कार्यपद्धतीमध्ये नमूद करण्यात येईल तो तपशील आणि, विशेष करून, ग्रिडमध्ये वीज अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण, ग्रिडमधून वीज खेचण्याचे ठिकाण, विजेच्या जितक्या परिमाणाकरिता मध्यम-कालीन मुक्त प्रवेश मागण्यात आला आहे ते विजेचे परिमाण, यांचा समावेश असेल. मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी करावयाचा नमुना अर्ज परिशिष्ट-४ मध्ये देण्यात आला आहे.

(बी) मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाला सुरूवात झाल्याची तारीख ही ज्या महिन्यात अर्ज करण्यात आला असेल त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेपासून ५ महिन्यांच्या आतील आणि १ वर्षानंतरची नसेल.

**टीपः** उदाहरणार्थ, १ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या मुक्त प्रवेशाच्या मंजूरीसाठीचा अर्ज मागील वर्षातील जुलै महिन्याच्या ३१ तारखेपर्यंत स्वीकारण्यात येईल. त्याचप्रमाणे, मुक्त प्रवेश मंजूरीसाठीचा अर्ज मागील वर्षातील जुलै महिन्याच्या ३१ तारखेला सादर करण्यात आला असल्यास तो पुढील वर्षाच्या १ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या कालावधीकरिता नसेल.

(सी) वितरण परवानाधारक, अर्ज प्राप्त झाल्यानंतर, अर्जाची छाननी करील आणि येथे वरील विनियम ९.२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या काल-मर्यादेत मध्यम-कालीन मुक्त प्रवेश मंजूर किंवा नामंजूर करण्याचा निर्णय घेण्यात येईल याची खात्री करण्यासाठी विनियम १३.१ (एक) आणि (दोन) मध्ये उल्लेखलेल्या बाबींसंबंधी आवश्यक यंत्रणा अभ्यास शक्य तितक्या त्वरेने पूर्ण करील.

(डी) विनियम ९.२ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या गरजांची पूर्तता झाली आहे याची खात्री झाल्यानंतर, वितरण परवानाधारक अर्जात मागणी केलेल्या कालावधीकरीता मध्यम-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करील;

परंतु असे की, वितरण परवानाधारक अर्जदाराने मागितलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीकरीता मध्यम-कालीन मुक्त प्रवेश, त्यासंबंधीची कामे लेखी नोंद करून, मंजूर करू शकेल.

परंतु आणखी असे की, अर्जदार, वितरण परवानाधारकाबरोबर, सविस्तर कार्यपद्धतीमध्ये करण्यात येतील अशा तरतूदींना अनुसरून, वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारावर सही करील. वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारात, मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाची सुरूवात व समाप्तीचा दिनांक, ग्रिडमध्ये वीज अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण आणि ग्रिडमधून वीज खेचण्याचे ठिकाण, वितरण यंत्रणेचा तपशील, अर्जदाराने आवश्यक असलेली द्यावयाची बँक हमी आणि सविस्तर कार्यपद्धतीत नमूद केलेला अन्य तपशील, असेल.

(इ) मध्यम-कालीन मुक्त प्रवेश मंजूर केल्यानंतर वितरण परवानाधारक, राज्य भार प्रेषण केंद्राला तसे ताबडतोब कळवील ज्यामुळे केंद्राला याचा विचार, या विनियमाखाली काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) करण्यासाठी आलेल्या मागण्यांची छाननी करताना, करणे शक्य होईल.

(एफ) मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, मध्यम-कालीन ग्राहकाला मुदतीचे नूतनीकरण करण्यासाठी सर्वाधिक पसंती मिळण्याचा हक्क नसेल.

## १२ अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धत

### १२.१ अर्जदार वितरण यंत्रणेला जोडलेला तेव्हा आंतर राज्य पारेषण यंत्रणेचा समावेश असताना वीज पुरवठा

खालील विनियम १२.२ मध्ये पुढे काहीही नमूद केले असले तरी, आंतर-राज्य अल्प-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धत ही वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (आंतर-राज्य पारेषणात मुक्त प्रवेश) विनियम, २००८ प्रमाणे असेल;

परंतु असे की, वितरण यंत्रणेशी जोडलेल्या ग्राहकाला आंतर-राज्य अल्प-कालीन प्रवेश हवा असेल तर राज्य भार प्रेषण केंद्र, केंद्रीय आयोगाच्या विनियमांमध्ये आवश्यक असल्याप्रमाणे, त्यांची संमती प्रादेशिक भार प्रेषण केंद्राला कळविण्यापूर्वी, येथील विनियम १३ नुसार ग्राहकाला संबंधित वितरण परवानाधारकाची संमती सादर करण्यास कळवील.

परंतु आणखी असे की, ग्राहकाकडून कोणत्याही येणे रकमा प्रलंबित नसल्यास, वितरण परवानाधारक त्याची संमती देईल.

### १२.२ <u>वितरण यंत्रणमार्फत वीज पुरवठा</u>

येथे खाली विनिर्दिष्ट केलेली कार्य-पद्धत अल्प-कालीन मुक्त प्रवेशाला, जर ग्रिडमध्ये विजेचे अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण (इंजेक्शन) आणि ग्रिडमधून वीज खेचण्याचे ठिकाण (ड्रॉवल) त्याच वितरण यंत्रणेमध्ये असेल तर, लागू राहील.

### १२.२.१ आगाऊ मुक्त-प्रवेश

(एक) वितरण परवानाधारकाकडे अल्प-कालीन मुक्त प्रवेश चवथ्या महिन्या पर्यंत मिळण्यासाठी अर्ज सादर करता येईल; असे करताना ज्या महिन्यात अर्ज करण्यात येत असेल तो महिना पहिला महिना म्हणून विचारात घेण्यात येईल.

(दोन) प्रत्येक महिन्यासाठी आणि महिन्यातील प्रत्येक व्यवहारासाठी वेगळा अर्ज करण्यात येईल.

(तीन) वितरण परवानाधारकाकडे जोडपत्र-३ (नमुना अल्प-कालीन-१)मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करण्यात येईल. या नमुन्यात पुढील तपशील म्हणजेच आवश्यक असलेली क्षमता, नियोजित वीज निर्मिती किंवा करारबद्ध केलेली विजेची खरेदी, ग्रिडमध्ये विजेचे अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण, ग्रिडमधून वीज खेचण्याचे ठिकाण, मुक्त-प्रवेश घेण्याचा कालावधी, सर्वोच्च विद्युत भार, सरासरी विद्युत भार आणि वितरण परवानाधारकाला आवश्यक वाटणाऱ्या अन्य अतिरिक्त माहितीचा समावेश असेल. अर्जासोबत अर्जासाठीचे ना-परतावा शुल्क रोखीने किंवा वितरण परवानाधारकाने अधिसूचित केलेल्या अधिकाऱ्याच्या नावे काढलेल्या धनादेशाने किंवा डिमांड ड्राफ्टने पाठविण्यात येईल.

(चार) मुक्त प्रवेश मंजुरीसाठीचा अर्ज “““अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी आगाऊ अर्ज’’ असे पाकिटावर लिहून मागील महिन्याच्या १०व्या दिवसापर्यंत कोणत्याही महिन्यात सादर करता येईल.

उदा., जुलै महिन्यात सुरू होणाऱ्या मुक्त प्रवेशासाठीचा अर्ज जून महिन्याच्या १०व्या दिवसापर्यंत स्वीकारण्यात येईल.

(पाच) वितरण परवानाधारक अर्जदाराला “““पोच-पावती’’ देताना त्यावर अर्ज प्राप्त झाल्याचा वेळ आणि दिनांक नमूद करेल.

(सहा) व्यवहार कोणत्या प्रकारचा आहे त्यावर आधारित, वितरण परवानाधारक अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जावर, खालील नमूद केलेल्या रितीने निर्णय घेईल.

(सात) वरील उप-उप-खंड (चार) खाली प्राप्त झालेले सर्व अर्ज एकत्रितपणे विचारात घेण्यात येतील आणि त्यांच्यावर या विनियमांच्या विनियम-१५ खाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वाटपाच्या प्राधान्य निकषांप्रमाणे प्रक्रिया करण्यात येईल.

(आठ) वितरण परवानाधारक सदर व्यवहाराची तपासणी करताना वितरण जाळ्यावरील अतिभार (कंजेस्शन) विचारात घेईल;

(नऊ) वितरण परवानाधारक मुक्त प्रवेश मंजूर झाला असल्यास तसे किंवा अन्यथा, जोडपत्र-३ मध्ये विहित करण्यात आलेल्या नमुन्यामध्ये (नमूना-अल्प-कालीन-२) ग्राहकाला रकमा भरण्याच्या वेळापत्रकासह उशीरात उशीरा मागील महिन्याच्या १९व्या दिवसापर्यंत कळवील.

(दहा) उप-उप-खंड (नऊ) खाली मुक्त प्रवेश नाकारण्यात आला असल्यास त्याची विशिष्ट कारणे वितरण परवानाधारक देईल.

परंतु असे की, अर्जदाराला त्याची बाजू मंडण्याची संधी दिल्याखेरीज कोणताही अर्ज नाकारण्यात येणार नाही.

**१२.२.२ डे-अहेड मुक्त प्रवेश**

वितरण परवानाधारकाच्या यंत्रणेमध्ये, पूर्णतः किंवा अंशतः क्षमता स्पष्टपणे परत करण्यात आली असेल किंवा जी मागील तीन दिवसात वापरण्यात आली नसेल, अशी शिल्लक क्षमता उपलब्ध असल्यास, डे-अहेड व्यवहारांना परवानगी देण्यात येईल;

(एक) डे-अहेड मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठीचा अर्ज डे-अहेड व्यवहाराचे काल व परिमाण निश्चित करण्याच्या (शेड्युलिंग) दिनांकाच्या दोन (२) दिवसांच्या आत परंतु शेड्युलिंग्च्या दिवसाच्या लगतच्या आधीच्या दिवशी १०.०० वाजेपर्यंत वितरण परवानाधारकाकडून स्वीकारण्यात येईल.

उदा., जुलै महिन्याच्या २५व्या दिवशीच्या डे-अहेड व्यवहारासाठी अर्ज त्या महिन्याच्या २३व्या दिवशी किंवा २४व्या दिवशी १०.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येईल.

(दोन) वरील विनियम १२.२.१ च्या उप-उप-खंड ९ मधील तरतूदीप्रमाणे, वितरण परवानाधारक यंत्रणेवरील अतिभाराचा (कंजेस्शन) तपास करील व नंतर त्याच जोडपत्र-३ मधील नमून्यात (नमूना अल्प-कालीन-२) मंजुरी दिली असल्यास तसे अथवा अन्यथा कळवील. अल्प-कालीन मुक्त प्रवेशाकरिता अर्जाच्या अन्य सर्व तरतूदी लागू राहतील.

**१२.२.३ बोलीसाठीची कार्यपद्धती**

(एक) ग्राहकाने पुढील महिन्याकरिता आगाऊ मुक्त प्रवेशासाठी मागणी केलेली क्षमता, जर उपलब्ध क्षमतेपेक्षा जास्त असेल किंवा राज्य भार प्रेषण केंद्राला संबंधित व्यवहारामध्ये सहभागी असलेल्या पारेषण आणि वितरण यंत्रणेच्या कोणत्याही भागावर अतिभार येण्याची शक्यता वाटल्यास, क्षमतेचे वाटप इलेक्ट्रॉनिक बोली कार्यपद्धतीद्वारे करण्यात येईल.

(दोन) यंत्रणेवरील अपेक्षित अतिभारासंबंधी राज्य भार प्रेषण केंद्राने घेतलेला निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहील.

(तीन) राज्य भार प्रेषण केंद्र जोडपत्र-३ मधील (नमूना अल्प-कालीन-३) तरतुदींनुसार, अति-भाराबाबतची माहिती आणि किमान किंमतीचा निर्देश करून बोली प्रकियेसाठी आमंत्रण पाठविण्याचा निर्णय अर्जदारांना जोडपत्र-३ मधील नमुन्यात (नमूना अल्प-कालीन-३) कळवील.

(चार) राज्य भार प्रेषण केंद्र बोलीबाबतची माहिती त्यांच्या संकेत स्थळावर देखील प्रदर्शित करील.

(पाच) आयोगाच्या संबंधित आदेशाच्या आधारे निश्चित करण्यत आलेली पारेषण आणि वहन आकारांची किमान किंमत जोडपत्र-३ (नमूना अल्प-कालीन-३) मध्ये निर्देशित करण्यात येईल.

(सहा) जोडपत्र-३ मधील (नमूना अल्प-कालीन-३) नमुन्यात बोलीसाठीच्या आमंत्रणात निर्देशित केलेल्या “““बोली बंद व्हावयाच्या वेळेपर्यंत””“ जोडपत्र-३ मध्ये देण्यात आलेल्या (नमूना अल्प-कालीन-४) नमुन्यामधील बोली, स्वीकारण्यात येईल. बोली एकदा सादर केल्यानंतर, त्यात फेरबदल/सुधारणा करता येणार नाहीत.

(सात) एखाद्या ग्राहकाने जर बोली प्रक्रियेत भाग घेतला नाही तर त्याचा अर्ज मागे घेण्यात आला आहे असे मानण्यात येईल व त्यावर पुढील प्रक्रिया करण्यात येणार नाही.

(आठ) राज्य भार प्रेषण केंद्राकडून बोली सादर करण्यासाठीची वेळ/तारीख वाढविण्यासाठी करण्यात आलेली कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

(नऊ) ज्या परिमाणात (डिनॉमिनेशन) किमान किंमत निश्चित करण्यात आली असेल त्याच परिमाणात, बोलीदार त्यांची किंमत (पूर्णांकात) नमूद करील.

(दहा) नमूद करण्यात आलेली किंमत उतरत्या क्रमाने मांडण्यात येईल आणि उपलब्ध क्षमतेचे वाटप, उपलब्ध क्षमता संपेपर्यंत, अशा उतरत्या क्रमाने करण्यात येईल.

(अकरा)दोन किंवा अधिक ग्राहकांनी एकच किंमत नमूद केली असल्यास, वरील उप-उप-खंड (दहा) खाली कोणत्याही टप्प्यावर उरलेल्या उपलब्ध क्षमतेचे वाटप अशा ग्राहकांनी मागणी केलेल्या क्षमतेच्या यथा प्रमाणात करण्यात येईल.

(बारा) ज्या ग्राहकांना पूर्ण क्षमतेचे वाटप करण्यात आले आहे ते, बोलीमध्ये मिळालेली उच्चतम किंमत अदा करतील.

(तेरा) ज्या ग्राहकांना कमी क्षमतेचे वाटप करण्यात आले आहे ते, बोलीमध्ये त्यांनी नमूद केलेली किंमत अदा करतील.

(चौदा) ज्या बोली कोणत्याही प्रकारे अपूर्ण, अस्पष्ट किंवा बोलीच्या कार्यपद्धतीस अनुसरुन नसल्याचे आढळून येतील त्या बोली राज्य भार प्रेषण केंद्राकडून नाकारण्यात येतील.

(पंधरा) यशस्वी बोलीदार, ज्याला क्षमतांचे वाटप करण्यात आले आहे, या खंडाच्या उप-उप खंड (बारा) किंवा (तेरा) खाली बोली प्रक्रियेतून निश्चित करण्यात आलेले पारेषण आकार, वहान आकार, जसे असेल तसे, अदा करील.

१२.२.४ अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकाची राखीव क्षमता इतरांना हस्तांतरीत करता येणार नाही.

१२.२.५ राज्य भार प्रेषण केंद्राकडून राखीव क्षमता परत, कपात किंवा रद्द करण्यात आल्यामूळे, उपलब्ध झालेली क्षमता, या विनियमांना अनुसरुन, अन्य कोणत्याही अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकाकरिता राखीव ठेवता येईल.

परंतु असे की, कोणत्याही ग्राहकाने परत, कपात किंवा रद्द केल्यामुळे, जर सदर वितरण वाहिनीवर सातत्याने अतिभार (कंजेस्शन) नसेल तर, राज्य भार प्रेषण केंद्र सद्य परिस्थिती वितरण परवानाधारकाला कळवील. राज्य भार प्रेषण केंद्राकडून अतिभार-रहित परिस्थिती कळल्यानंतर, वितरण परवानाधारक, वरील विनियम १२ मधील तरतुदीं अंतर्गत वितरण वाहिनी मुक्त प्रवेशासाठी देईल.

१२.२.६ अल्प-कालीन मुक्त प्रवेशाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, मुदतीचे नूतनीकरण करण्यासाठी अल्प-कालीन ग्राहकाला कोणतेही सर्वाधिक प्राधान्य मिळण्याचा हक्क नसेल.

## १३. वितरण परवानाधारकाची संमती

१३.१ मुक्त प्रवेशास संमती देण्यापूर्वी आणि या विनियमांतील अन्य तरतुदींच्या अधीन राहून, वितरण परवानाधारक खालील बाबींची पडताळणी करील--

(एक) अंमलात असलेल्या राज्य ग्रिड संहितेमधील तरतूदींनुसार काल-गट-निहाय ऊर्जेचे मीटरींग करण्यासाठी आणि हिशोब ठेवण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा अस्तित्वात असणे;

(दोन) वितरण यंत्रणेमध्ये क्षमतेची उपलब्धता.

१३.२ आंतर-राज्य मुक्त प्रवेशः

अर्जदार जर वितरण यंत्रणेला जोडलेला असेल आणि दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश, मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि अल्प-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठीचा अर्ज जर अन्य राज्यातून वीज प्राप्त करून घेण्यासंबंधी असेल तर, वितरण परवानाधारक त्याची संमती अथवा नकार, राज्य पारेषण कंपनी आणि/किंवा राज्य भार पारेषण केंद्राला अनुक्रमे वेळोवेळी अमलात असलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणीयता मंजूर करणे, आंतर-राज्य पारेषणात दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि संबंधित बाबी) विनियम, २००९ आणि केंद्रीय विद्युत नियामक आयोग (आंतर-राज्य पारेषणत मुक्त प्रवेश) विनियम, २००८ प्रमाणे, कळवील.

वितरण परवानाधारक त्याची संमती किंवा संमती देण्याबाबत नकार, खालीलप्रमाणे कळवील-

(अ) अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या बाबतीत, अर्जदाराची विनंती प्राप्त झाल्यापाून तीन (३) कामाच्या दिवसांच्या आत;

(ब) मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशाच्या बाबतीत, अर्जदाराची विनंती प्राप्त झाल्यापाून पाच (५) कामाच्या दिवसांच्या आत;

परंतु असे की, संमती देण्यास नकार देताना त्याची कारणे नोंदण्यात येतील.

परंतु असे की, जर ग्राहकाकडून काही येणे बाकी प्रलंबित असेल तर, वितरण परवानाधारक अशी संमती देण्यास नकार देईल.

१३.३ राज्यांतर्गत मुक्त प्रवेश

(अ) निर्मिती केंद्राकडून मुक्त प्रवेशाकरिता मान्यता मागण्यासाठी आलेल्या अर्जाची छाननी करताना, वितरण परवानाधारक खालील बाबींची पडताळणी करील---

(एक) अंमलात असलेल्या राज्य ग्रिड संहितेमधील तरतूदींनुसार काल-गट-निहाय ऊर्जेचे मीटरींग करण्यासाठी आणि हिशोब ठेवण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा अस्तित्वात असणे;

(दोन) वितरण यंत्रणेमध्ये क्षमतेची उपलब्धता.

१३.४ आवश्यक पायाभूत सुविधा अस्तित्वात असल्याचे आणि वितरण जाळ्यमध्ये क्षमतेची उपलब्धता असल्याचे सिद्ध झाल्यावर, वितरण परवानाधारक त्याची मान्यता अर्जदाराला, अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच (५) कामाच्या दिवसांच्या आत ई-मेल अथवा फॅक्स द्वारे अथवा संदेशवहनाच्या मान्यताप्राप्त नेहमीच्या अन्य कोणत्याही साधनाद्वारे, अर्जदाराला कळवील.

१३.५ वितरण परवानाधारक, मान्यतेसाठी आलेला अर्ज कोणत्याही बाबतीत अपूर्ण अथवा सदोष असल्याचे आढळून आल्यास, उणीव अथवा दोष अर्जदाराला अर्ज प्राप्त झाल्यापासून तीन (३) कामाच्या दिवसांच्या आत ई-मेल अथवा फॅक्सद्वारे किंवा संदेश वहनाच्या मान्यताप्राप्त नेहमीच्या अन्य कोणत्याही साधनाद्वारे, अर्जदाराला कळवील.

१३.६ अर्ज योग्य असल्याचे आढळून आल्यावर, आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा नसल्याच्या किंवा वितरण जाळ्यामध्ये शिल्लक क्षमता उपलब्ध नसल्याच्या कारणामुळे, वितरण परवानाधारकाने मान्यता देण्याचे नाकारले तर असा नकार, त्याबाबतच्या कारणांसह, अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच (५) कामाच्या दिवसांच्या आत, ई-मेल अथवा फॅक्सद्वारे किंवा संदेशवहनाच्या मान्यताप्राप्त नेहमीच्या अन्य कोणत्याही साधनाद्वारे,अर्जदाराला कळविण्यात येईल.

१३.७ ग्राहकाने डे-अहेड तत्त्वावर मुक्त प्रवेश मागितल्यास

ग्राहकाकडून कोणतीही रक्कम येणे बाकी नसल्यास, वितरण परवानाधारक, विनियम १३.१ च्या अधीन राहून, त्याची मान्यता ताबडतोब देईल.

## १४. वाटप करण्यासाठी प्राधान्य

१४.१ वितरण यंत्रणेमध्ये मुक्त प्रवेश वाटपास खालील निकषांनुसार प्राधान्य देण्यात येईल :

(अ) मुक्त प्रवेशासाठी आलेला अर्ज दीर्घ-कालीन, मध्यम-कालीन अथवा अल्प-कालीन प्रवेशासाठी असला तरी वितरण परवानाधारकाला मुक्त प्रवेश क्षमतेचे वाटप करण्यात उच्चतम प्राधान्य राहील.

(ब) वितरण परवानाधारकानंतर दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारांना प्राधान्य राहील.

(क) दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारानंतर मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारांना प्राधान्य राहील

(ड) मध्यम-कालीन प्रवेशाच्या अर्जदारांनंतर अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारांना प्राधान्य राहील.

(इ) अल्प-कालीन मुक्त प्रवेश अर्जदारांना क्षमतेच्या उपलब्धतेस अधीन राहून वाटपासाठी प्राधान्य राहील.

(फ) जर अर्जदाराची संभाव्य गरज उपलब्ध क्षमतेपक्षा जास्त असेल आणि असा ग्राहक त्याची गरज उपलब्ध क्षमतेच्या मर्यादेत ठेवू शकत नसेल तर, त्याच्यापेक्षा कमी प्राधान्य असलेल्या अर्जदाराची विनंती विचारात घेण्यात येईल.

भाग-डी - मुक्त प्रवेशासाठी आकार

**१५. देयक तयार करणे**

१५.१ पुरवठादाराकडून ग्राहकाला विजेच्या पुरवठ्यासाठी देयक पाठवण्यात येईल आणि अशा देयकामध्ये खालील बाबी स्पष्टपणे व वेगळ्या दाखवण्यात येतील :—

(एक) वीज पुरवठा करारामधील, असल्यास, अटी व शर्तींनुसार वीज पुरवठ्यासाठी आकार

(दोन) अधिनियम किंवा या विनियमांखाली किंवा वेळोवेळी अमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्याखाली ग्राहकाकडून वसूली-योग्य असलेला कोणताही अन्य आकार अथवा अन्य रक्कम.

१५.२ वितरण यंत्रणेचा विजेच्या वहनासाठी केलेल्या वापराकरीता वितरण परवानाधारकाकडून, वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात स्थित असलेल्या पुरवठादाराला/मुक्त प्रवेश ग्राहकाला देयक पाठविण्यात येईल आणि त्यामध्ये खालील बाबी स्पष्टपणे व वेगळ्या दाखविण्यात येतील :-

(एक) खालील विनियम १६.१ नुसार ग्राहकांकडून वसूल केलेले अथवा वसूली-योग्य वहन आकार;

(दोन) खालील विनियम १७ नुसार ग्राहकांकडून वसूल केलेला किंवा वसूली-योग्य क्रॉस सबसिडी अधिभार;

(तीन) खालील विनियम १८ नुसार ग्राहकांकडून वसूल केलेला अथवा वसूली-योग्य वहन आकारावरील अतिरिक्त अधिभार;

(चार) वितरण परवानाधारकाने जर मुक्त प्रवेश ग्राहकाकारीता विजेचे शेड्युलिंग केले तर, परवानाधारकाने देय असलेले राज्य-भार प्रेषण केंद्राचे शुल्क आणि आकारांची, मुक्त प्रवेशाची शेड्युल करण्यात आलेल्या मागणीचे दीर्घ-कालीन आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकांकरीता यथा-प्रमाण तत्वावर एकूण मागणीच्या गुणोत्तरावर आधारित विभागणी करण्यात येईल. शेड्युल्ड आणि अन्य प्रचालन आकार हे, आयोगाने वेळोवेळी राज्य-भार प्रेषण केंद्राच्या शुल्क आणि आकारांच्या आदेशात अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकांकरीता मान्यता दिलेल्या दराइतक्या दराने, वितरण परवानाधारकाकडून अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकाला आकारण्यात येतील.

(पाच) वितरण परवानाधारकाच्या अंशकालीन मुक्त प्रवेश ग्राहकाच्या बाबतीत, अंशकालीन मुक्त प्रवेश ग्राहक हे पारेषण जाळयाच्या वापरासाठी पारेषण आकार पारेषण कंपनीऐवजी वितरण परवानाधारकाला अदा करतील. आणि

(सहा) अधिनियम किंवा या विनियमांखाली किंवा अधिनियमाखालील आयोचाच्या आदेशांतर्गत किंवा वेळोवेळी अमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्याखाली ग्राहकाकडून वसूली-योग्य असलेला कोणताही अन्य आकार, अधिभार अथवा अन्य रक्कम.

परंतु असे की, पॉवर एक्स्चेंजच्या माध्यमातून जर मुक्त प्रवेश मागण्यात आला असेल तर, वितरण परवानाधारकाकडून ग्राहकास देयक पाठविण्यात येईल.

१५.३ जेव्हा वीज निर्मात्याकडून किंवा परवानाधारकाकडून वितरण यंत्रणेचा वापर विजेची विक्री एखाद्या पात्र ग्राहकाला किंवा परवानाधारकाला किंवा पॉवर एक्स्चेंजला करण्यासाठी केला असेल तर, विजेच्या वहनाकरिता केलेल्या वितरण यंत्रणेच्या वापरासाठीचे देयक वीज निर्मात्याला किंवा परवानाधारकाला पाठविण्यात येईल आणि त्यामध्ये खालील बाबी स्पष्टपणे व वेगळ्या दाखविण्यात येतील :––

(एक) खालील विनियम १६.१ नुसार ग्राहकांकडून वसूल केलेले अथवा वसूलीयोग्य वहन आकार;

(दोन) जर वीज निर्मात्याकडून किंवा परवानाधारकाकडून वितरण परवानाधारकाच्या ग्राहकाला विजेची विक्री करण्यात आली असेल आणि वितरण परावानाधारक ग्राहकाकडून खालील विनियम १७.१ नुसार वसूल करीत नसेल तर, क्रॉस सबसिडी अधिभार;

(तीन) जर वीज निर्मात्याकडून किंवा परवानाधारकाकडून वितरण परवानाधारकाच्या ग्राहकाला विजेची विक्री करण्यात आली असेल आणि वितरण परावानाधारक ग्राहकाकडून खालील विनियम १८.१ नुसार वसूल करीत नसेल तर, वहन आकारांवरील अतिरिक्त अधिभार; आणि

(चार) अधिनियम किंवा या विनियमांखाली किंवा वेळोवेळी अमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्याखाली वीज निर्मात्याकडून किंवा परवानाधारकाकडून वसुलीयोग्य असलेला कोणताही अन्य आकार अथवा अन्य रक्कम.

१५.४ या विनियम १५ खाली देयके दर महिन्यास पाठविण्यात येतील.

१५.५ या विनियम १५ खाली पाठविण्यात आलेल्या देयकांची रक्कम विद्युत पुरवठा संहितेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत देय राहील.

## १६ वहन आकार

वितरण यंत्रणेचा वापर करणारे मुक्त प्रवेश ग्राहक खालीलप्रमाणे वहन किंवा ग्राहकाधिष्ठीत वितरण सुविधा आकार, जसे असेल तसे, अदा करतील :

१६.१ अ) मुक्त प्रवेश ग्राहकाने वितरण परवानाधारकाला त्याच्या यंत्रणेचा वापर करण्यासाठी द्यावयाचे वहन आकार वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय वीज दर) विनियम, २०११ अंतर्गत निश्चित करण्यात येतील.

परंतु असे की, वहन आकार हे प्रत्यक्ष वापरलेल्या ऊर्जेच्या आधारे, देय राहतील;

परंतु असे की, वितरण यंत्रणेच्या उपयोगकर्त्याने देय असलेल्या आकारांमध्ये, आयोग वेळोवेळी ठरवून देईल त्याप्रमाणे, स्थिर/मागणी आकारांच्या आणि अस्थिर आकारांच्या कोणत्याही संयोगाचा (कॉम्बिनेशन) समावेश असू शकेल.

परंतु आणखी असे की, जेथे फक्त मुक्त प्रवेशासाठी वापरण्यात आलेली ग्राहकाधिष्ठीत वितरण यंत्रणा ही जेव्हा एकाच मुक्त प्रवेश ग्राहकाकरिता बांधण्यात आली असेल तर, अशा ग्राहकाधिष्ठीत वितरण यंत्रणेसाठीचे वहन आकार वितरण परवानाधारकाकडून त्याच्या संबंधित यंत्रणांकरिता परिगणना करून काढण्यात येतील व त्यास आयोगाची मान्यता घेण्यात येईल आणि हे वहन आकार, शिल्लक क्षमतेचे वाटप आणि वापर अन्य व्यक्तींना किंवा अन्य प्रयोजनासाठी करण्यात येईल तोपर्यंत, पूर्णपणे अशा मुक्त प्रवेश ग्राहकाला, सहन करावे लागतील.

१६.२ मुक्त प्रवेश ग्राहकाच्या मालकीचे वितरण जाळे असेल आणि त्याची देखभाल जर वितरण परवानाधारक करीत असेल तर, वितरण परवानाधारकाला देय असलेले ग्राहकाधिष्ठीत वितरण सुविधा आकार लागू राहतील.

परंतु असे की, वितरण परवानाधारक आधिनियमाच्या कलम ६२ उप-कलम (१) च्या खंड (डी) मधील तरतुदींनुसार वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज सादर करताना त्याबरोबर अशा वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील ग्राहकाधिष्ठीत वितरण सुविधा आकारांच्या परिगणनेचा पूर्ण तपशील वितरण परवानाधारक सादर करेलः

परंतु आणखी असे की, ग्राहकाधिष्ठीत वितरण सुविधा आकार हा आयोगाकडून किरकोळ वीज दराच्या आदेशात किंवा आयोगाने पारित केलेल्या अन्य कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशात निश्चित करण्यात येईलः

परंतु आणखी असेही की, आयोगाकडून ग्राहकाधिष्ठीत वितरण सुविधा आकार निश्चित केला जात नाही तोपर्यंत, ग्राहक ज्या व्होल्टेज पातळीशी जोडलेला असेल त्या पातळीच्या वहन आकारांच्या पन्नास (५०) टक्के रक्कम, वरील विनियम १६.१ मध्ये निश्चित केल्याप्रमाणे, समर्पित वितरण सुविधा आकार म्हणून वितरण परवानाधारक लागू करेलः

परंतु आणखी असे की, जो ग्राहक ग्राहकाधिष्ठीत वितरण सुविधा आकार अदा करीत असेल त्याला वरील विनियम १६.१ खाली वहन आकार लावण्यात येणार नाही.

## १७ क्रॉस सबसिडी अधिभार

१७.१ वितरण परवानाधारकाचा प्रत्येक ग्राहक ज्याला या विनियमांनुसार मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला आहे किंवा कोणताही ग्राहक जो वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात स्थित असेल आणि/किंवा जो ग्राहकाधिष्ठित पारेषण वाहिनीचा वापर करून निर्मिती कंपनीकडून विजेचा पुरवठा घेत असेल त्याला, ठरवून देण्यात येईल त्याप्रमाणे क्रॉस सबसिडी अधिभार, मुक्त प्रवेश मिळण्यासाठी एक अट म्हणून, अदा करावा लागेलः

परंतु असे की, ज्या व्यक्तीने स्व-वापरासाठी वीज निर्मिती प्रकल्प उभा केला असेल अशा व्यक्तीला जर मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला तर, स्ववापरासाठीच्या वीज निर्मितीवर, स्ववापराच्या ठिकाणी वीज नेण्याकरिता, असा अधिभार लावता येणार नाही.

१७.२ मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून संबंधित महिन्यात जितकी ऊर्जा वापराच्या ठिकाणी प्रत्यक्षात घेण्यात आली असेल त्याच्या आधारे निश्चित करण्यात आलेला प्रति युनिट क्रॉस सबसिडी अधिभार, मुक्त प्रवेश ग्राहकाने दर महिन्यास देय

राहील. ज्या वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेला ग्राहक जोडलेला असेल त्या वितरण परवानाधारकाला अधिभाराची रक्कम अदा करण्यात येईलः

परंतु असे की, जेथे ग्राहक, वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (वितरण परवानाधारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करण्याचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २००५ मध्ये ठरवून दिलेल्या व्होल्टेज पातळीशी जोडलेला नसेल तेथे क्रॉस सबसिडी अधिभार हा ग्राहक वितरण यंत्रणेच्या/पारेषण यंत्रणेच्या ज्या व्होल्टेज पातळीवर जोडलेला असेल त्यानुसार कॉस सबसिडी अधिभार लावण्यात येईल.

१७.३ क्रॉस सबसिडी अधिभाराच्या निश्चितीकरणाच्या प्रयोजनासाठी सूत्र खालीलप्रमाणे असेल :—

$$S = T - [C (1 + L / 100) + D]$$

जेथे,

एस हा अधिभार आहे.

टी हा संबंधित वर्गवारीतील ग्राहकांनी देय असलेला वीज दर आहे.

सी हा वीज खरेदीतून द्रव इंधनावरील आधारित निर्मिती आणि नूतनशील ऊर्जा वगळून उरलेल्या वीज खरेदीतील **सर्वात वरच्या मा**र्जिनच्या ५ टक्क्याचा भारांकित सरासरी खर्च आहे.

डी हा प्रति युनिट तत्त्वावरील वहन आकार आहे.

एल हा या विनियमांतील विनियम २५.२ नुसार आयोगाने लागू असलेल्या व्होल्टेज पातळीवरील ठरवून दिलेली वितरण यंत्रणा हानि असेल, जी टक्केवारीत व्यक्त करण्यात येतेः

परंतु असे की, जर वरील सूत्रानुसार अधिभाराचे मूल्य ऋण असेल तर ते शून्य म्हणून समजण्यात येईलः

परंतु असे की, “एल” हा ग्राहक वर्गवारीच्या व्होल्टेज पातळीवरील हानि असेल आणि त्यामध्ये वीज खरेदीच्या स्रोताच्या भागाचा, म्हणजेच “सी” ला अनुरुप पारेषण हानीचा समावेश असेलः

परंतु आणखी असे की, लागू असलेल्या अधिभारातील सूट, असल्यास, जर मुक्त प्रवेश ग्राहकाने नूतनशील ऊर्जा स्रोताकडून वीज खरेदी केली तर आयोगाकडून वेळोवेळी ठरवून देण्यात येईल**:**

परंतु आणखी असे की, आयोग, आवश्यकता वाटल्यास, वरील सूत्राबाबत फेरविचार करु शकेल आणि त्यात आवश्यक बदल सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने अधिसूचित करील.

१७.४ मुक्त प्रवेश ग्राहकाने वितरण परवानाधारकाला देय असलेला क्रॉस सबसिडी अधिभार आयोगाकडून वितरण परवानाधारकाच्या वीज दराच्या आदेशात किंवा आयोगाने पारित केलेल्या अन्य कोणत्याही आदेशात निश्चित करण्यात येईलः

परंतु आणखी असे की, जेव्हा क्रॉस सबसिडीत कपात करण्याचा कालबध्द कार्यक्रम ठरवून देण्यात येईल तेव्हा मुक्त प्रवेश ग्राहकांवर लावावयाच्या अधिभारामध्ये आयोगाकडून सुधारणा करण्यात येईलः

१७.५ वितरण परवानाधारक, अधिनियमाच्या कलम ६२ च्या उप-कलम (१) च्या खंड (डी) मधील तरतुदींनुसार वीज दर निश्चितीकरणाच्या अर्जासोबत, त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रांतर्गत क्रॉस सबसिडी अधिभाराच्या परिगणनेचा पूर्ण तपशील आयोगाला सादर करील.

## १८. अतिरिक्त अधिभार

१८.१ अधिनियमाच्या कलम ४२ च्या उप-कलम (४) मधील बंधनानुसार वितरण परवानाधारकाला कराव्या लागणा-या विजेच्या पुरवठ्याकरिता होणारा स्थिर खर्च भागविण्याकरिता, वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील मुक्त प्रवेश ग्राहकाला, जो त्याच्या वितरण परवानाधारकाशिवाय अन्य व्यक्तीकडून विजेचा पुरवठा घेत आहे, विजेच्या वहनाकरिता वहन आकारांवर आणि क्रॉस सबसिडी अधिभारावर, अतिरिक्त अधिभार वितरण परवानाधारकाला अदा करेल.

१८.२ हा अतिरिक्त अधिभार, जर मुक्त प्रवेश देण्यात येत असल्यामुळे किंवा दिलेला असल्यामुळे, वीज खरेदीच्या बांधिलकीच्या सदर्भात परवानाधारकावरील बंधन तसेच राहत असेल किंवा अशा कराराच्या परिणामस्वरुप स्थिर आकाराचा बोजा सोसणे हे एक न टाळता येण्याजोगे बंधन आणि कारण असेल तरच, लागू होईल.

१८.३ वितरण परवानाधारक विजेचा पुरवठा करण्याच्या त्याच्यावरील बंधनामुळे करीत असलेल्या स्थिर खर्चाची परिगणना केलेले एक सविस्तर विवरणपत्र आयोगास त्याच्या वीज दराच्या याचिकेसोबत सादर करेल आणि या खर्चाचे समायोजन करण्यासाठी आयोगाने मंजूर केलेला खर्च व प्रत्यक्ष झालेला खर्च यांच्या आधारे एक वेगळी याचिका आयोगाच्या आवश्यक छाननीसाठी व मंजुरीसाठी वार्षिक तत्त्वावर सादर करील.

१८.४ आयोग, वितरण परवानाधारकाने मुक्त प्रवेश ग्राहकांकडून वसूल करावयाच्या वर्गवारीनिहाय अतिरिक्त अधिभार खालील तत्त्वांच्या आधारे निश्चित करील :---

(एक) वितरण परवानाधारकाने, अशा ग्राहकावर, असा खर्च केलेला असणे किंवा तो केला जाण्याची वाजवी शक्यता असणे आवश्यक आहे; आणि

(दोन) सदर खर्च, ग्राहकाकडून अथवा ज्यांना त्याच मत्तांमधून किंवा सुविधांमधून विजेचा पुरवठा करण्यात आला आहे अशा अन्य ग्राहकांकडून किंवा आयोगाने अधिनियमाच्या कलम ६४ खालील अधिकारांचा वापर करून मान्यता दिलेल्या वहन आकार, स्टॅन्ड-बाय आकार किंवा अशा अन्य आकारांतून अन्य ग्राहकांकडून, वसूल केलेला नसेल किंवा वसूल करता येण्यासारखा नसेल.

परंतु असे की, आयोगाने असा निश्चित केलेला अतिरिक्त अधिभार, ज्या ग्राहकांना ते ज्या वितरण परवानाधारकाशी जोडलेले आहेत त्याच्याऐवजी अन्य स्त्रोताकडून वीज पुरवठा घेण्यासाठी मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला आहे अशा सर्व ग्राहकांना, लागू राहील.

१८.५ मुक्त प्रवेश ग्राहकांनी मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून संबंधित महिन्यात घेतलेल्या प्रत्यक्ष ऊर्जेच्या आधारे प्रति युनिट तत्त्वावर निश्चित करण्यात आलेला अतिरिक्त अधिभार मासिक तत्त्वावर देय राहील.

## १९ वितरण परवानाधारकाकडून मुक्त प्रवेश ग्राहकाने वीज घेण्यासाठी स्टॅन्ड-बाय आकार

१९.१ वीज पुरवठादाराने विजेचा पुरवठा खंडित केला अथवा वीज पुरवठा करणा-या निर्मात्याकडून त्याच्या देखभालीच्या कामासाठी काम बंद ठेवण्यात आल्यामुळे, मुक्त प्रवेश ग्राहकाला वीज पुरवठा केला गेला नाही तर मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून येणा-या भाराची गरज भागविण्यासाठी वितरण परवानाधारक स्टॅन्ड-बाय विजेचा पुरवठा, मुक्त प्रवेश ग्राहकाने पुरवठ्यासाठी पर्यायी व्यवस्था करेपर्यंत, करील.

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहकाच्या डे-अहेड विनंतीनुसार असा स्टॅन्ड-बाय पुरवठा वितरण परवानाधारकाकडून चालू ठेवण्यात येईल.

परंतु आणखी असे की, असा स्टॅन्ड-बाय पुरवठा एकदा सुरू केल्यानंतर तो दिवसातील सर्व ९६ काल-गटांना लागू राहील.

पंरंतु आणखी असेही की, अशा स्टॅन्ड-बाय पुरवठ्याचे नियमन वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारातील अटी व तरतुदींनी करण्यात येईल.

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहकाला अशा वीज पुरवठ्यासाठी, अनिर्धारित विनिमय (यु आय) आकारांच्या दराने किंवा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेल्या यंत्रणा सर्वोच्च किंमतीने (सिस्टीम मार्जिनल प्राइसने (एस एम पी) ) किंवा ग्राहक ज्या वितरण परवानाधारकाला जोडलेला असेल त्या वितरण परवानाधारकाच्या आयोगाने मान्यता दिलेल्या वीज दराच्या अनुसूचीमध्ये देण्यात आलेल्या तात्पुरत्या वीज दराच्या वर्गवारीतील ऊर्जा आकार किंवा अस्थिर आकारांच्या दराने, यापैकी जे जास्त असेल त्याप्रमाणे, ऊर्जा आकार भरावे लागतील.

परंतु असे की, जर ग्राहकाने वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० मध्ये व्याख्या केलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मात्याकडून "अनिश्चित वीज" प्राप्त करून घेण्याचा पर्याय स्वीकारला आणि ग्राहकाने वितरण परवानाधारकाबरोबर ठेवलेल्या करारांतर्गत शिल्लक मागणीच्या मर्यादेपर्यंत केलेल्या अशा ऊर्जेच्या पुरवठ्याला, अशा ग्राहकाला लागू असलेल्या वर्गवारीला लागू असलेल्या वीज दरानुसार आकार देय राहतील आणि आयोगाच्या आदेशांना अनुसरून करारांतर्गत मागणी ओलांडल्यामुळे उचित दंड लावण्यात येईल.

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहकांना अन्य कोणत्याही स्त्रोताकडून स्टॅन्ड-बाय विजेची व्यवस्था करण्याचा पर्याय उपलब्ध असेल.

१९.२ वितरण परवानाधारकाने केलेल्या स्टॅन्ड-बाय वीज पुरवठ्याची घटना ही विनियम २६ मधील तरतुदी अंतर्गत "असंतुलन आकारांची" घटना म्हणून ठरविण्यात येणार नाही.

## २०. सुरक्षा अनामत

२०.१ ग्राहकाने वीज मीटरची खरेदी करण्याचे ठरविल्यास ते वगळून अन्य प्रकरणी, वितरण परवानाधारक ग्राहकाला मीटरच्या किंमतीकरिता, अधिनियमाच्या कलम ४७ च्या उप-कलम (१) च्या खंड (बी) मधील तरतुदींनुसार सुरक्षा अनामत ठेवण्यास कळवेल.

परंतु असे की, कोणत्याही प्रकरणी मीटरच्या सुरक्षा अनामतीची रक्कम मीटरच्या किंमतीपेक्षा जास्त असणार नाही.

२०.२ वितरण परवानाधारक अर्जदाराला, वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारातील अटी व शर्तीनुसार परिगणना केलेल्या वहन आकार, क्रॉस सबसिडी अधिभार आणि वहन आकारांवर अतिरिक्त अधिभार यासाठीच्या मासिक देयकाइतकी सुरक्षा अनामत ठेवण्यास सांगू शकेल.

परंतु असे की, अल्पकालीन मुक्त प्रवेशाच्या बाबतीत वितरण परवानाधारक विनियम २०.२ मधील तरतुदीप्रमाणे एक महिन्याच्या देयकाइतक्या सुरक्षा अनामती ऐवजी ती मुक्त प्रवेशाच्या कालावधीस अनुसरून घेईल.

२०.३ जेथे पुरवठादाराने विनियम २०.२ अंतर्गत वीज यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या कराराच्या सुरवातीला सुरक्षा अनामत ठेवावयाची आवश्यकता असेल तर, अशा सुरक्षा अनामतीची परिगणना विनियम २०.२ खाली विजेच्या वहनाकरीता वितरण यंत्रणेच्या अंदाजित वापरावयाच्या आधारे करण्यात येईलः

परंतु असे की, जर वीज पॉवर एक्स्चेंजमधून घेण्यात येणार असेल तर ग्राहकाकडून सुरक्षा अनामत या विनियमांतील विनियम २०.२ नुसार देण्यात येईल.

परंतु असे की, आवश्यक असलेली अतिरिक्त सुरक्षा अनामतीची रक्कम किंवा असलेली शिल्लक सुरक्षा जर वितरण परवानाधारकाकडील शिल्लक रकमेच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त असेल तर सुरक्षा अनामतीच्या रकमेचे समायोजन करण्यात येईल.

२०.४ विनियम २० खाली द्यावयाची सुरक्षा अनामत, अशी सुरक्षा अनामत देणारी व्यक्ती रोखीने दर्शनी धनाकर्षासह (डिमांड-ड्राफ्ट), परत न घेता येणारे पत-पत्र (लेटर ऑफ क्रेडिट) किंवा अनुसूचित वाणिज्यिक बँकेने दिलेली विनाशर्त बँक हमी, यापैकी कोणत्याही प्रकारे देऊ शकेलः

परंतु असे की, सुरक्षा अनामत जर रोख स्वरूपात असेल तर, त्यावर भारतीय रिझर्व बँकेच्या बँक दराइतक्या दराने व्याज देण्यात येईल;

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारकाकडून नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सुरक्षा अनामत ठेवण्यात येईल.

## २१. राज्य ग्रिड संहितेचे पालन

२१.१ विनिर्दिष्ट करण्यात येणाऱ्या राज्य ग्रिड संहितेचे पालन, ती ज्या मर्यादेपर्यंत लागू करण्यात आली असेल त्या मर्यादेपर्यंत करणे, सर्व ग्राहकांचे आणि सर्व पुरवठादारांचे कर्तव्य असेलः

परंतु असे की, ग्राहक आणि/ किंवा पुरवठादाराने राज्य ग्रिड संहितेचे पालन न केल्यास अशा ग्राहक आणि/ किंवा पुरवठादाराला, जसे असेल तसे, अधिनियमाचा भंग केल्याचे परिणाम भोगावे लागतीलः

परंतु आणखी असे की, ग्राहक आणि/ किंवा पुरवठादाराने राज्य ग्रिड संहितेचे पालन न केल्यास अशा उपयोगकर्त्याबरोबर केलेला वीज यंत्रणेशी जोडणी व वीज वापर करण्यासाठीचा करार देखील रद्द केला जाऊ शकेल.

२१.२ या विनियमांना अनुसरून मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती, त्यांना लागू करण्यात आलेल्या मर्यादेपर्यंत संतुलन व हिशोबपूर्ती संहितेचे (बॅलन्सिंग आणि सेटलमेंट कोड) पालन करीलः

परंतु असे की, अशा प्रत्येक व्यक्तीला संतुलन व हिशोबपूर्तीच्या संहितेमध्ये उल्लेख केलेला आकार, पारेषण यंत्रणेचा अनिर्धारित वापर करण्याकरिता आणि विजेच्या अनिर्धारित आंतरबदलांकरिता असलेल्या आकारांसह, अदा करावे लागतील.

## भाग- इ काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग), वीज मापन, सुधारणा आणि हानि

### २२. काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग)

२२.१ आंतरराज्य मुक्त प्रवेश व्यवहारांचे काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) वेळोवेळी सुधारणा केलेल्या भारतीय विद्युत ग्रिड संहितेनुसार करण्यात येईल.

२२.२ १ मेगावॉट आणि त्यावरील भाराच्या ग्राहकांच्या आणि सर्व निर्मिती केंद्रांच्या - त्यांची क्षमता कितीही असली तरीही - राज्यांतर्गत मुक्त प्रवेशाच्या व्यवहारांचे काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) राज्य भार प्रेक्षण केंद्राकडून राज्य ग्रिड संहितेमधील तरतुदींनुसार करण्यात येईल :

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहकाने त्याचे डे-अहेड शेड्युल वितरण परवानाधारकाला आदल्या दिवशी जास्तीत जास्त सकाळी १०-०० वाजेपर्यत देणे आवश्यक आहे, ज्यामुळे वितरण परवानाधारकाकडून राज्य भार प्रेषण केंद्राला जे शेड्युल देण्यात येते त्यामध्ये समाविष्ट करणे त्याला शक्य होईल :

परंतु असे की, वितरण परवानाधारकाच्या अंशकालीन मुक्त प्रवेश ग्राहकाच्या बाबतीत, ग्राहक त्याचे शेड्युल वितरण परवानाधारकाला सादर करेल व त्याने ते राज्य भार प्रेषण केंद्राला सादर करण्ग्याची गरज नाही.

२२.३ वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० मध्ये “अनिश्चित वीज” निर्मिती करणारा म्हणून ठरविलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती प्रकल्पाला शेड्युलिंगमधून, आयोग जोपर्यंत या अटीत, विनियमांत सुधारणेद्वारे किंवा कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाद्वारे सुधारणा करीत नाही तोपर्यंत, सूट देण्यात येईल.

### २३. वीज मापन (मीटरिंग) आणि संदेशवहन

२३.१ मुक्त प्रवेश ग्राहक आणि सर्व निर्मिती केंद्रांकरिता, त्यांची क्षमता कितीही असली तरी, वितरण परवानाधारकाकडून विशेष ऊर्जा मीटर्स ग्राहकांकरिता आणि ग्राहकांच्या खर्चाने बसविण्यात येतील :

परंतु असे की, अशा मीटरची खरेदी, वितरण परवानाधारकाकडून किंवा वितरण परवानाधारकाने यथोचितपणे मान्यता दिलेल्या कोणत्याही पुरवठादाराकडून, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (मीटर बसविणे व चालविणे) विनियम, २००६ आणि त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांना अनुसरून असलेल्या तपशीलवार वैशिष्ट्यांसह, करण्यात येईल :

परंतु असेही की, वितरण परवानाधारकाकडून विनिर्दिष्ट करावयाची तपशीलवार वैशिष्ट्ये ही राज्य भार प्रेषण केंद्राच्या ऊर्जा लेख्यांच्या संबंधातील आवश्यकतांना अनुसरून असतील :

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारक, ग्राहक ज्यांच्याकडून विशेष ऊर्जा मीटर खरेदी करून बसवता येतील अशा किमान दोन मीटर उत्पादकांची नावे अधिसूचित करील, अशा मीटर्समध्ये वितरण परवानाधारकाच्या देयकांसंबंधीच्या आवश्यकता भागविणाऱ्या तरतुदी असतील.

२३.२ बसविलेल्या विशेष ऊर्जा मीटर्समध्ये काल-गटवारीनुसार झालेला ॲक्टिव्ह वीज वापर आणि व्होल्टेजनुसार झालेला रिॲक्टिव्ह वीज वापर यांचे राज्य ग्रिड संहितेनुसार मापन करण्याची क्षमता असेल.

२३.३ वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांची मीटर बसविणे, देखभाल करणे, मीटरची चाचणी करणे आणि दोष असलेली, हरवलेली व जळालेली मीटर्स हाताळणे, यांच्याबाबतीत जबाबदारी ही, आयोगाने वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांच्याकरिता अनुक्रमे विद्युत पुरवठा संहिता आणि कृतीच्या मानकांच्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, असेल.

२३.४ ग्राहकांच्या मीटर मधील नोंदी प्रत्येक दोन महिन्यांतून किमान एकदा घेण्याची जबाबदारी वितरण परवानाधारकाची राहील :

परंतु असे की, मीटरमधील नोंदी घेण्याच्या वेळी पुरवठादाराच्या प्राधिकृत प्रतिनिधीला उपस्थित राहण्याचा हक्क असेलः

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारकाच्या प्राधिकृत प्रतिनिधीला मीटर मधील नोंदी घेण्यासाठी, तपासणी व चाचणी करण्यासाठी ग्राहकाच्या जागेत अशा वेळेला आणि अशा रितीने प्रवेश करण्याचा हक्क, ज्याप्रमाणे अधिनियम आणि विद्युत पुरवठा संहितेनुसार वितरण परवानाधारकाच्या स्वतःच्या ग्राहकांच्या बाबतीत असतो, त्याप्रमाणे असेल.

२३.५ वितरण परवानाधारक किंवा राज्य भार प्रेषण केंद्राने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला विशेष ऊर्जा मीटर्स तपासणीसाठी खुली असतील.

२३.६ सर्व मुक्त प्रवेश ग्राहक केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या वीज मापना (मीटरींग) संबंधीच्या मानकांचे पालन करतीलः

परंतु असे की, ग्राहकांना मुक्त प्रवेश देण्यासाठीची वीज मापनाची सर्व ठिकाणे राज्य वीज मापन (मीटरींग) संहितेचे पालन करतीलः

परंतु असे की, राज्य वीज मापन (मीटरींग) संहितेमध्ये वीज मापनाच्या ज्या ठिकाणची व्याख्या करण्यात आलेली नसेल त्यांची व्याख्या, राज्य भार प्रेषण केंद्राकडून राज्यात ऊर्जा हिशोब ठेवणे सुकर करण्यासाठी, करण्यात येईल.

२३.७ राज्य भार प्रेषण केंद्र, रिमोट ट्रान्समिशन युनिट- डेटा कॉन्सन्ट्रेटरची (आर टी यू-डीसी) तपशीलवार वैशिष्ट्ये विनिर्दिष्ट करील आणि प्रत्यक्ष वेळेच्या संनियंत्रणासाठी त्याच्या स्थापनेची पडताळणी करीलः

परंतु असे की, वितरण परवानाधारक आणि/किंवा राज्य भार प्रेषण केंद्राने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीद्वारे तपासणीसाठी रिमोट ट्रान्समिशन युनिट- डेटा कॉन्सन्ट्रेटर खुली असतील.

२३.८ राज्य भार प्रेषण केंद्राला, ऊर्जेचे हिशोब ठेवण्याच्या प्रयोजनासाठी, ऊर्जा मीटरमधील माहिती ऑन-लाइन कळविण्यात येईल.

२३.९ मुक्त प्रवेश ग्राहक आणि वितरण परवानाधारक आणि/किंवा राज्य भार प्रेषण केंद्र यांच्यातील प्रत्यक्ष संदेशवहनाचा खर्चाची व्याख्या वितरण परवानाधारक आणि/किंवा राज्य भार प्रेषण केंद्र यांच्याकडून करण्यात येईल आणि त्याप्रमाणे येणारा खर्च मुक्त प्रवेश ग्राहकाला सहन करावा लागेल.

२३.१० ऊर्जा हिशोब ठेवण्याकरिता राज्य भार प्रेषण केंद्राला ऊर्जा मीटरमधील माहिती पुरविण्याची जबाबदारी संयुक्तपणे मुक्त प्रवेश ग्राहक आणि तो ज्याला जोडलेला असेल अशा वितरण परवानाधारकाची राहील.

२३.११ निर्मिती कंपनीने मुक्त प्रवेशाचा पर्याय स्वीकारल्यास अशी कंपनी निर्मितीचे राज्य भार प्रेषण केंद्रात रिअलटाइम संनियंत्रण करण्यासाठी आपल्या निर्मितीची योग्य दर्शनक्षमता (व्हिजीबिलिटी) राखण्याची काळजी घेईल.

२३.१२ मुक्त प्रवेश ग्राहकाकडे दूरध्वनी/मोबाइल, फॅक्स आणि ई-मेलची सुविधा असेल. त्याच्या संदेशवहन यंत्रणेचा तपशील वितरण परवानाधारक आणि/किंवा राज्य भार प्रेषण केंद्राला कळविण्यात येईल.

## २४. सुधारणा

ऊर्जेच्या केलेल्या काल व परिमाण निर्धारण (शेड्युल) मध्ये सुधारणा करण्यास, भारतीय विद्युत ग्रिड संहिता (आय इ जी सी) किंवा राज्य ग्रिड संहितेमधील तरतुदीनुसार, जसे असेल तसे, परवानगी देण्यात येईल.

## २५. ऊर्जा हानि

२५.१ <u>पारेषण हानि</u>

२५.१.१ आंतर-राज्य पारेषण

२५.१.१.१ दीर्घकालीन मुक्त प्रवेश आणि मध्यमकालीन मुक्त प्रवेश : केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या तरतूदींनुसार पारेषण यंत्रणेमधील विभागून देण्यात आलेली ऊर्जा हानि खरेदीदार सहन करतील.

२५.१.१.२ अल्पकालीन मुक्त प्रवेश : केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या तरतूदींनुसार पारेषण यंत्रणेमधील ऊर्जा हानि मुक्त प्रवेश ग्राहक सहन करेल.

२५.१.२ राज्यांतर्गत पारेषणः

आयोगाने राज्यांतर्गत यंत्रणेकरिता निश्चित केलेली पारेषण हानि मुक्त प्रवेश व्यवहारांकरीता लागू राहीलः

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहकाने सादर करावयाच्या काल व परिमाण निर्धारणात (शेड्युलमध्ये) मान्यता दिलेल्या राज्यांतर्गत पारेषण हानीचा विचार करण्यात येईल :

परंतु असे की, ऊर्जेची हिशोबपूर्ती ही राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये झालेल्या प्रमाणकानुसार हानीच्या आधारे करण्यात येईल.

२५.२. <u>वितरण यंत्रणा हानि</u>

आयोगाकडून, वितरण परवानाधारकाने वीज दर निश्चितीकरण्याच्या प्रक्रियेच्या वेळी सादर केलेल्या माहितीच्या छाननीवर आधारीत, लागू असलेल्या वर्षासाठी वेगवेगळ्या व्होल्टेज पातळीवरील वितरण यंत्रणेसाठी तांत्रिक हानि, निश्चित करण्यात येईल आणि तिची विभागणी मुक्त प्रवेश ग्राहकांनी प्रत्यक्ष वापरलेल्या ऊर्जेच्या प्रमाणात करण्यात येईल आणि ती संबंधित व्होल्टेज पातळीवर वस्तूरूपात किंवा आयोगाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या कोणत्याही पद्धतीनुसार, देय राहील :

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहकावर फक्त यंत्रणेमधील तांत्रिक हानि आकारण्यात येईल आणि वाणिज्यिक हानीचा कोणताही भाग आकारण्यात येणार नाही.

**भाग एफ : असंतुलन आणि रिॲक्टिव ऊर्जा आकार**

**२६. असंतुलन आकार**

२६.१ दीर्घकालीन मुक्त प्रवेश किंवा मध्यमकालीन मुक्त प्रवेश किंवा अल्पकालीन मुक्त प्रवेश मंजूर झाल्यानंतर सर्व व्यवहारांचे काल-परिमाण निर्धारण (शेड्युलिंग), आंतरराज्य व्यवहारांकरिता भारतीय विद्युत ग्रिड संहिता (आय इ जी सी) आणि राज्यांतर्गत व्यवहारांकरिता राज्य ग्रिड संहितेमधील संबंधित तरतुदींनुसार/आयोगाच्या आदेशांनुसार, एक दिवस आधी (डे-अहेड) तत्त्वावर, करण्यात येईल :

परंतु असे की, या विनियमांच्या विनियम २६ मधील तरतुदी राज्य पूलमध्ये सहभागी झालेल्या मुक्त प्रवेश निर्माते आणि ग्राहकांना लागू राहणार नाहीत आणि त्यांना अंतिम संतुलन आणि हिशोबपूर्ती पद्धतीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या ऊर्जा संतुलन आणि हिशोबपूर्तीच्या तरतुदी किंवा आयोगाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली अन्य कोणतीही संतुलन आणि हिशोबपूर्ती पद्धत, लागू राहील.

२६.२ मुक्त प्रवेश ग्राहकांच्या संबंधात वीज अंतःक्षेपणाच्या (इंजेक्शन) ठिकाणी ऊर्जेची हिशोबपूर्ती : मुक्त प्रवेश ग्राहकांच्या संबंधात निर्धारित आणि प्रत्यक्ष अंतःक्षेपण केलेली वीज आणि/किंवा प्रत्यक्ष खेचलेली (ड्रॉअल) वीज यामधील तफावतीची हिशोबपूर्ती खालीलप्रमाणे करण्यात येईल :—

२६.२.१ <u>ज्यादा खेचलेली वीज:</u>

मुक्त प्रवेश ग्राहकाने खेचलेल्या ज्यादा विजेची हिशोबपूर्ती खालील २ पैकी उच्च असलेल्या पर्यायाने करण्यात येईलः-

(एक) यंत्रणा सर्वोच्च किंमत (सिस्टम मार्जिनल प्राईस) अधिक अन्य आनुषंगिक आकार ( नक्त यू आय आकार, अतिरिक्त यू आय) किंवा राज्यात वेळोवेळी कार्यरत असलेल्या राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेले अन्य कोणतेही राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दरांतर्गत हिशोबपूर्ती आकार , किंवा

(दोन) संबंधित वितरण परवानाधारकासाठी आयोगाने वेळोवेळी निश्चित केल्यानुसार वीज दराच्या अनुसूचीत निश्चित करण्यात आलेला तात्पुरत्या वीज दरातील, जो लागू असेल तो, ऊर्जा आकार किंवा अस्थिर आकार.

२६.२.२ <u>कमी खेचलेली वीजः</u>

मुक्त प्रवेश ग्राहकाने कमी वीज खेचल्यास त्याला वितरण परवानाधारकाकडून कोणतेही आकार अदा केले जाणार नाहीत :

परंतु असे की, आंतरराज्य यू आय पद्धतीखाली जर कोणताही दंड आकार लावण्यात आला असेल तर, वितरण परवानाधारक या आकाराची वसुली मुक्त प्रवेश ग्राहकाकडून यथा-प्रमाणात करील.

२६.३ मुक्त प्रवेश व्यवहारातील जादा खेचलेली आणि कमी खेचलेली वीज.

२६.३.१ मुक्त प्रवेश ग्राहकासाठी वापराच्या ठिकाणाच्या शेड्युलमधील ऊर्जेची (युनिट) प्रत्येक काल-गटाकरिता परिगणना करण्यासाठी, वीज खेचण्याच्या शेड्युलमधील तरतुदींनुसार, वापराच्या ठिकाणी असलेल्या अनुसूचीमधील क्षमतेला (किवॅ) काल-गटाच्या कालावधीने गुणण्यात येईल.

२६.३.२ वापराच्या ठिकाणाच्या शेड्युलमधील मागणीची परिगणना करण्यासाठी, वापराच्या ठिकाणाच्या शेड्युलमधील क्षमतेला (किवॅ), त्या काल-गटाच्या पॉवर फॅक्टर ने भागण्यात येईल. या प्रयोजनासाठी पॉवर फॅक्टर युनिटी म्हणून विचारात घेण्यात येईल.

२६.३.३ जादा खेचलेल्या किंवा कमी खेचलेल्या विजेची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल :-

(अ) मुक्त प्रवेश ग्राहकाने जादा खेचलेली वीज = (प्रत्येक काल-गटात ग्राहकाने खेचलेली नोंदणी झालेली वीज) – किमान (वापराच्या ठिकाणाची शेड्युलमधील मागणी/ऊर्जा, मुक्त प्रवेश निर्मात्याने ग्राहकाला वापराच्या ठिकाणी उपलब्ध करून दिलेली प्रत्यक्ष मागणी/ऊर्जा) – वितरण परवानाधारकाकडून मिळण्याचा हक्क असलेली शेड्युलमधील मागणी/ऊर्जा

(ब) मुक्त प्रवेश ग्राहकाने कमी खेचलेली वीज = किमान (वापराच्या ठिकाणाची शेड्युलमधील मागणी/ऊर्जा, वापराच्या ठिकाणी मुक्त प्रवेश निर्मात्याने ग्राहकाला उपलब्ध करून दिलेली प्रत्यक्ष मागणी/ऊर्जा)– (प्रत्येक काल-गटात ग्राहकाने खेचलेली नोंदणी झालेली वीज)

२६.४ नोंदणी केलेल्या खेचलेल्या विजेमधून, मुक्त प्रवेश ग्राहक म्हणून शेड्युलमधील हक्काचे प्रथम समायोजन करण्यात येईल आणि उरलेली शिल्लक ही ग्राहकाच्या करारांतर्गत मागणीसाठी वापरण्यात येईल. नोंदलेल्या कमाल खेचलेल्या विजेतील फरकाचा हिशोब/आकारणी खालील प्रमाणे करण्यात येईल :--

२६.४.१ जेव्हा खेचलेली जादा वीज ही वितरण परवानाधारकाचा ग्राहक म्हणून करारांतर्गत मागणी म्हणून हाताळण्यात येणार असेल तर वरील विनियम २६.३ नुसार मेळ घातल्यानंतर उरलेली ज्यादा खेचलेली वीज ही मागणी अधिभार म्हणून ग्राहकावर, अशा ग्राहकांना लागू असलेल्या किरकोळ वीज दराच्या तरतुदींशी मिळत्याजुळत्या रीतीनुसार, लावण्यात येईल. ग्राहकाने ज्यादा खेचलेल्या विजेची हिशोबपूर्ती वरील विनियम २६.२.१ नुसार करण्यात येईल.

२६.४.२ मुक्त प्रवेश ग्राहक म्हणून असलेल्या शेड्युलमधील हक्कापेक्षा जेव्हा ग्राहकाने खेचलेली वीज कमी असेल तेव्हा तो वरील विनियम २६.२.२ खाली कमी वापर म्हणून समजण्यात येईल :

परंतु असे की, ग्राहकाचे नियमन वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या महराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ आणि आयोगाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या वीज दराच्या आदेशातील अनुसूचीने करण्यात येईल.

२६.५ निर्मिती कंपनी/ निर्मात्याच्या वतीने वीज व्यापार परवानाधारकाने घेतलेल्या मुक्त प्रवेशाच्या संबंधातील निर्धारित आणि प्रत्यक्ष विजेचे अंतःक्षेपण आणि/किंवा खेचलेली वीज यांच्यातील तफावतीची हिशोबपूर्ती खालीलप्रमाणे करण्यात येईलः-

२६.५.१ <u>ज्यादा वीज अंतःक्षेपणः</u>

(अ) निर्मिती कंपनी/ वीज व्यापाऱ्याने शेड्युलमधील अंतःक्षेपणापेक्षा केलेल्या ज्यादा वीज अंतःक्षेपणामुळे जर ग्रिडचा फायदा होत असेल तर अशा ज्यादा वीज अंतःक्षेपणाची हिशोबपूर्ती ही, आंतर-राज्य उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली लागू असलेल्या यू आय आकाराने किंवा यंत्रणा सर्वोच्च किंमत (एस एम पी) अधिक अन्य आनुषंगिक आकारा (नक्त यू आय आकार, अतिरिक्त यू आय) ने किंवा राज्यात वेळोवेळी प्रचलित असलेल्या राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेल्या राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या अन्य कोणत्याही हिशोबपूर्तीसाठीच्या आकाराने किंवा वितरण परवानाधारकाच्या नूतनशील स्रोत आणि द्रवरूप इंधनावर आधारित वीज निर्मिती वगळून अन्य स्रोतांकडील दीर्घ-कालिन वीज खरेदीच्या भारांकित सरासरी खर्चाने, जे कमी असेल त्यानुसार, करण्यात येईल.

(ब) शेड्युलमधील अंतःक्षेपणापेक्षा वीज निर्माता/ वीज व्यापाऱ्याने केलेले ज्यादा अंतःक्षेपण जर ग्रिडला घातक असेल तर विजेच्या अशा जादा अंतःक्षेपणाकरिता मुक्त प्रवेश निर्माता/व्यापारी, आंतरराज्य उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली लागू असलेला यू आय आकार किंवा राज्यात वेळोवेळी प्रचलित असलेल्या, राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेली यंत्रणा सर्वोच्च किंमत (एम एम पी) अधिक अन्य आनुषंगिक आकारा (नक्त यू आय आकार, अतिरिक्त यू आय)ने किंवा अन्य कोणतेही राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या हिशोबपूर्तीसाठीचे आकार, जे जास्त असेल ते, राज्य पूल मध्ये भरणा करील :

परंतु असे की, वितरण परवानाधारक हा नोडल एजन्सी असल्यामुळे, मुक्त प्रवेश निर्माता/वीज व्यापाऱ्याला/पॉवर एक्स्चेंजच्या सदस्याला असा आकार लागू करेल आणि वसूल करील व तो राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेल्या राज्य पूल खात्यामध्ये भरणा करील.

२६.५.२ <u>कमी वीज अंतःक्षेपण</u>

मुक्त प्रवेश निर्मात्याने/परवानाधारकाने पालन करावयाच्या निर्धारित अंतःक्षेपणपेक्षा कमी अंतःक्षेपण केल्यास, त्याची भरपाई ग्रिडमधून करण्यात येईल व त्याची किंमत, आंतरराज्य उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली लागू असलेल्या यू आय आकाराने किंवा राज्यात वेळोवळी प्रचलित असलेल्या यंत्रणा सर्वोच्च किंमतीने (एम एम पी) अधिक अन्य आनुषंगिक आकारा (नक्त यू आय आकार, अतिरिक्त यू आय)ने किंवा अन्य कोणत्याही राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या हिशोबपूर्ती आकाराने, जे जास्त असेल त्यानुसार, निर्माता/वीज व्यापारी यांच्याकडून वितरण परवानाधारकाला अदा करण्यात येईल. त्याशिवाय, मुक्त प्रवेश निर्मात्याच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी प्रादेशिक भार प्रेषण केंद्र आणि/ किंवा राज्य भार प्रेषण केंद्राने, कोणताही, अतिभार (कंजेस्शन) आकार निश्चित केला असेल तर तो देखील वितरण परवानाधारकाला देय राहील :

परंतु असे की, जर कोणताही निर्माता/ वीज व्यापारी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला थेट जोडलेला असेल तर त्याच्याकडून वितरण हानि वसूल करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, जर विजेचे कमी अंतःक्षेपण सतत दोन दिवस होत राहिले तर, राज्य भार प्रेषण केंद्र काल-परिमाण निर्धारणामध्ये (शेड्युलमध्ये) सुधारणा करण्यासाठी वीज निर्मात्याला/वीज व्यापाऱ्याला नोटीस देईल. जर वीज निर्माता/ वीज व्यापारी मुक्त प्रवेश अनुसचीप्रमाणे विजेचे अंतःक्षेपण करू शकला नाही तर अशा प्रकरणी वीज निर्माता/वीज व्यापाऱ्याने शेड्युलमध्ये ताबडतोब सुधारणा करावी किंवा अन्यथा तो, यंत्रणा सर्वोच्च किंमतीने (एम एम पी) अधिक अन्य आनुषंगिक आकाराच्या (नक्त यू आय आकार, अतिरिक्त यू आय) किंवा राज्यात वेळोवळी कार्यरत असलेल्या राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेल्या राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या अन्य कोणत्याही हिशोबपूर्तीसाठीच्या आकाराच्या, दुप्पट दंड आकार भरण्यास, जबाबदार राहील.

तथापि, वीज निर्माता/वीज व्यापारी संपूर्ण कालावधीकरिता पूर्ण राखीव क्षमतेसाठी मुक्त प्रवेश आकार अदा करण्यास जबाबदार राहील.

२६.५.३ <u>राज्यामधील निर्मात्यांना जेव्हा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीत सहभागीदार म्हणून घोषित करण्यात येईल तेव्हा त्यांना खालील बाबी लागू राहतील</u> :—

(अ) वेळेच्या कोणत्याही १५ मिनिटांच्या काल-गटात घोषित क्षमतेच्या १०५ टक्क्यापर्यंतची कोणतीही निर्मिती आणि तिची एका दिवसातील एकूण सरासरी ही घोषित सरासरी क्षमतेच्या १०१ टक्क्यापर्यंत जात असेल तर ती गेमींग म्हणून संबोधण्यात येणार नाही आणि निर्मात्याला शेड्युलमधील निर्मितीच्या घोषित क्षमतेपेक्षा जास्त झालेल्या वीज निर्मितीसाठी, यंत्रणा सर्वोच्च किंमत (एम एम पी) अधिक अन्य आनुषंगिक आकाराच्या (नक्त यू आय आकार, अतिरिक्त यू आय) म्हणून निश्चित केलेला यू आय आकार किंवा राज्यात वेळोवेळी कार्यरत असलेल्या राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेला राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर हिशोबपूर्ती आकार किंवा निर्मितीचा सर्वात कमी अस्थिर खर्च, जे कमी असेल ते, मिळण्याचा हक्क राहील.

(ब) विहित मर्यादांपेक्षा जास्त झालेल्या कोणत्याही वीज निर्मितीकरिता, राज्य भार प्रेषण केंद्र त्यात कोणतेही गेमींग नसल्याची खात्री करण्यासाठी तपास करील आणि राज्य भार प्रेषण केंद्राला जर गेमींग असल्याचे आढळून आले तर, तत्सम यू आय आकार जे निर्मिती केंद्राला अशा अतिरिक्त वीज निर्मितीमुळे मिळणार असतील ते शून्यवत करण्यात येतील आणि या संबधातील रक्कम लाभधारकांच्या यू आय खात्यामध्ये निर्मिती केंद्रामधील त्यांच्या क्षमतेच्या हिश्याच्या प्रमाणात समायोजित करण्यात येईल :

परंतु असे की, आयोगाकडून, वरील अटीमध्ये वेळोवेळी फेरबदल/ फेरफार, कोणत्याही विशिष्ट/सर्वसाधारण आदेश किंवा विनियमांद्वारे करण्यात येतील.

२६.६ असंतुलन आकार अदा करण्यास उच्च प्राधान्य देण्यात येईल आणि संबंधित घटक (परवानाधारक किंवा मुक्त प्रवेश ग्राहक, जसे असेल तसे, यांच्यासह) राज्य भार प्रेषण केंद्रातर्फे चालविल्या जाणाऱ्या राज्य असंतुलन पूल खात्यामध्ये, विवरणपत्र निर्गमित झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत, निर्देशित रकमेचा भरणा करतील. असंतुलन आकारामुळे ज्या व्यक्तीला रक्कम मिळावयाची आहे त्या व्यक्तीला राज्य असंतुलन पूल खात्यामधून, तीन (३) कामाच्या दिवसांच्या आत, रक्कम अदा करण्यात येईल.

२६.७ वरील असंतुलन आकार अदा करण्यात जर दोन दिवसांपेक्षा अधिक विलंब, म्हणजेच विवरणपत्र निर्गमित करण्याच्या दिनांकापासून बारा (१२) दिवसांपेक्षा जास्त, झाला तर कसुरदार, पक्षकाराला ०.०४ टक्के या दराने विलंबाच्या प्रत्येक दिवसाकरिता सरळव्याज द्यावे लागेल. व्याजाची ही वसूल केलेली रक्कम, ज्या व्यक्तीला ही रक्कम मिळावयाची होती व जी अदा करण्यास विलंब झाला, त्या व्यक्तीला अदा करण्यात येईल. रक्कम अदा करण्यास सातत्याने, जर काही, विलंब झाला तर तसे, राज्य भार प्रेषण केंद्राकडून आयोगाला, सुधारणात्मक कारवाई सुरू करण्यासाठी, कळविण्यात येईल.

२६.८ मुक्त प्रवेश ग्राहकाने जर वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम,२०१० मध्ये “अनिश्चित वीज” निर्माण करणारा म्हणून निश्चित केलेल्या नूतनशील ऊर्जा प्रकल्पाकडून वीज पुरवठ्याची व्यवस्था केली तर विनियम २६ लागू राहणार नाही :

परंतु असे की, वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० मध्ये “अनिश्चित वीज” निर्माण करणारा म्हणून निश्चित केलेल्या नूतनशील ऊर्जा प्रकल्पाकडून मुक्त प्रवेश ग्राहकाला वीज दिल्यानंतर उरलेली शिल्लक वीज वितरण परवानाधारकाकडून खाली अटींवर खरेदी करण्यात येईलः-

(१) अंतक्षेपण केलेल्या विजेकरिता काटेकोरपणे १५ मिनिटांच्या कालगटाच्या आधारे क्रेडिट देण्यात यावे.

(२) मुक्त प्रवेश ग्राहकांच्या वापरकरिता विजेचा पुरवठा केल्यानंतर त्याच १५ मिनिटांच्या काल-गटातील शिल्लक वीज, वितरण परवानाधारकाक्डून, आयोगाने वितरण परवानाधारकाच्या संबंधित वर्षाकरिता मान्यता दिलेल्या सरासरी वीज खरेदी खर्चाच्या दराने, खरेदी करण्यात येईल :

परंतु असे की, वितरण परवानाधारकास, अशा शिल्लक विजेची खरेदी करून त्याद्वारे नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाची पूर्तता करणे शक्य व्हायला पहिजे.

**स्पष्टीकरण**.-- या विनियमांच्या प्रयोजनासाठी “ सरासरी वीज खरेदी खर्च “ म्हणजे आयोगाने वीज दराच्या आदेशात किंवा अचूक समायोजनाच्या आदेशात किंवा अन्य कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशात, मान्यता दिलेली भारांकित सरासरी किंमत. ज्या किंमतीने वितरण परवानाधारकाने स्ववापरासाठीच्या वीज निर्मितीवरील खर्चासह विजेची खरेदी केलेली असेल. असा कोणताही आदेश काढण्यात आलेला नसल्यास, शेवटाचा मान्यता देण्यात आलेला “ सरासरी वीज खरेदी खर्च” हा हिशोबपूर्तीच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येईल.

## २७. रिॲक्टीव ऊर्जा आकार

२७.१ ५ मेगावॉट किंवा अधिक भार असणाऱ्या मुक्त प्रवेश ग्राहकांच्या संबंधात, मुक्त प्रवेश ग्राहकांकडून रिॲक्टीव ऊर्जा आकारांचा भरणा करण्याची पद्धत ही राज्य ग्रिड संहितेमध्ये आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय वीज दर) विनियम, २०११ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तरतुदींनुसार राहील.

२७.२ ५ मेगावॅट पेक्षा कमी भार असणाऱ्या मुक्त प्रवेश ग्राहकांच्या संबंधात, आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या पॉवर फॅक्टरच्या आधारे रिॲक्टीव ऊर्जा आकारांची परिगणना करण्यात येईल.

२७.३ नूतनशील ऊर्जा निर्मात्यांच्या बाबतीत, रिॲक्टिव्ह ऊर्जा आकार हे संबंधित वीज दराच्या आदेशात मान्यता देण्यात आलेल्या आकारांनुसार राहतील.

**भाग जी : वाणिज्यिक बाबी**

## २८. देयक तयार करणे, वसूली आणि वाटप

या विनियमांखाली देय असणाऱ्या आकारांची देयके खालील कार्यपद्धतीनुसार तयार करण्यात येतीलः--

३०.१ <u>आंतरराज्य व्यवहार :</u>

(अ) **अल्पकालीन मुक्त प्रवेश**

(१) केंद्रीय पारेषण कंपनी आणि राज्य पारेषण कंपनीच्या यंत्रणांच्या वापरासाठीचे पारेषण आकार आणि प्रादेशिक भार प्रेषण केंद्रे आणि राज्य भार प्रेषण केंद्रे यांना अल्पकालीन मुक्त प्रवेशासाठी द्यावयाच्या परिचालन

(ऑपरेटिंग) आकारांची वसुली आणि वाटप, नोडल प्रादेशिक भार प्रेषण केंद्राकडून, केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

(२) वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेला जोडलेला अल्पकालीन मुक्त प्रवेश ग्राहक विनियम १५.२ प्रमाणे अशा वितरण परवानाधारकाला देय असणारे आकार वितरण परवानाधारकाला अदा करील.

(ब) **दीर्घकालीन प्रवेश आणि मध्यमकालीन मुक्त प्रवेश**

(१) एकत्रित भार प्रेषण आणि संपर्क योजनेसह राज्य भार प्रेषण केंद्राला देय असलेल्या आकारांची देयके तयार करणे, वसुली आणि वाटप केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

(२) राज्य भार प्रेषण केंद्राला देय असणाऱ्या आकारांची देयके राज्य भार प्रेषण केंद्राकडून राज्य पारेषण कंपनीला किंवा वितरण परवानाधारकाच्या वितरण जाळ्याला जोडलेल्या मुक्त प्रेवश ग्राहाकाला, पुढील कॅलेंडर महिन्याच्या तिसऱ्या (३) कामाच्या दिवसापूर्वी, थेट पाठविण्यात येतील.

(३) राज्य भार प्रेषण केंद्राकडून देयक प्राप्त झाल्यावर वितरण परवानाधारकाशी जोडलेल्या मुक्त प्रवेश ग्राहकाला वितरण परवानाधारक विनियम १५.३ प्रमाणे देयक पाठवेल.

(४) वितरण जाळ्याला जोडलेला मुक्त प्रवेश ग्राहक विनियम १५.२ प्रमाणे आकारांचा भरणा करेल. मुक्त प्रवेश ग्राहकाकडून रक्कम प्राप्त झाल्यावर, वितरण परवानाधारक राज्य पारेषण कंपनी/राज्य भार प्रेषण केंद्र यांना देय असलेल्या रकमांचे वाटप मासिक तत्त्वावर करील.

(५) राज्य पारेषण कंपनीला जोडलेला मुक्त प्रवेश ग्राहक देयक रकमेचा भरणा विनियम १५.२ प्रमाणे करील.

२८.२ <u>राज्यांतर्गत व्यवहार:</u>

(अ) **अल्पकालीन मुक्त प्रवेश :**

वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेला जोडलेला अल्पकालीन मुक्त प्रवेश ग्राहक, वितरण परवानाधारकाला देय असलेल्या आकारांचा भरणा, विनियम १५.२ प्रमाणे करील.

(ब) **दीर्घकालीन आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश :**

राज्य भार प्रेषण केंद्र त्यांना देय असलेल्या देयकांचा तपशील पुढील कॅलेंडर महिन्याच्या तिसऱ्या (३) दिवसापर्यंत वितरण परवानाधारकाला कळवेल. वितरण परवानाधारक हे आकार वेगळे दाखवून, त्याला येणे असलेल्या आकारांसह, असल्यास, मुक्त प्रवेश ग्राहाकाला त्याचे देयक वरील महिन्याच्या पाचव्या (५) दिवसापर्यंत पाठवेल. मुक्त प्रवेश ग्राहक या आकारांचे प्रदान विनियम १६ प्रमाणे करेल. वितरण परवानाधारक राज्य भार प्रेषण केंद्राला देय असणाऱ्या रकमांचे वाटप मासिक तत्त्वावर करील.

## २९. विलंब भरणा अधिभार

२९.१ जर या विनियमांखाली देय असणाऱ्या आकाराच्या कोणत्याही देयकाचा भरणा मुक्त प्रवेश ग्राहाकाने देय दिनांकाच्या आत करण्यास विलंब केला तर, या अधिनियमाखाली व त्याखाली करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही विनियमांखालील कारवाईस बाधा न येऊ देता, विलंब भरणा अधिभार प्रति महिना १.२५ टक्के या दराने आकारण्यात येईल.

## ३०. देयक अदा न करणे

३०.१ मुक्त प्रवेश ग्राहकाकडून देय असणारा कोणताही आकार किंवा रक्कम त्याने अदा न केल्यास, त्याने या विनियमांचे पालन केले नाही, असे मानण्यात येईल. वितरण परवानाधारक, असे आकार दावा दाखल करून वसूल करण्याच्या त्याच्या अधिकारास बाधा न येऊ देता, ग्राहकाला पंधरा (१५) दिवसांची आगाऊ नोटीस देवून मुक्त प्रवेश खंडित करू शकेल.

राज्य भार प्रेषण केंद्राला देय असणारे आकार अदा न केले गेल्यास, सदर केंद्र अशा कसूरदार मुक्त प्रवेश ग्राहाकाकरिता वीज पुरवठ्याचे काल व मापन निर्धारण (शेड्युल) करणे नाकारु शकेल आणि वितरण परवानाधारकाला अशा ग्राहकाची ग्रिडला दिलेली जोडणी खंडित करण्याचे निर्देश देऊ शकेल.

**३१. भरणा सुरक्षा पद्धत**

दीर्घकालीन प्रवेश आणि मध्यमकालीन मुक्त प्रवेशाच्या संदर्भात, मुक्त प्रवेशासाठीचा अर्जदार, विविध आकार वसूल करण्यासाठी जबाबदार असलेल्या एजन्सीच्या नावे, विविध आकारांच्या दोन महिन्यांच्या कालावधीच्या अंदाजित रकमेसाठी, एक रद्द न करता येण्याजोगे पत-पत्र (लेटर ऑफ क्रेडिट) उघडेल.

**३२. वीज अंतःक्षेपण करण्याची आणि वीज खेचण्याची ठिकाणे बदलण्यास मुभा**

३२.१ दीर्घकालीन मुक्त प्रवेश ग्राहाकाला विजेचे अंतःक्षेपण करण्याची आणि/किंवा वीज खेचण्याची ठिकाणे बदलण्याची मुभा वर्षातून दोन वेळा असेल. ही मुभा अशा ग्राहकांकरिता त्यांच्या विनंतीनुसार वितरण परवानाधारकाने त्यामुळे यंत्रणेवर होणाऱ्या परिणामांच्या करावयाच्या अभ्यासाच्या निष्कर्षांना अधीन राहून असेलः

परंतु असे की, अर्जदाराला अशी मुभा देताना, विद्यमान ग्राहकांच्या हक्कांवर विपरित परिणाम होऊ दिला जाणार नाहीः

परंतु असे की, अशा बदलाच्या संदर्भात वितरण परवानाधारकाने करावयाचा अतिरिक्त खर्च, दीर्घकालीन मुक्त प्रवेश ग्राहक सहन करील.

३२.२ एक संपूर्ण वर्षाकरिता मध्यमकालीन मुक्त प्रवेश घेणारा ग्राहक देखील विजेचे अंतःक्षेपण करण्याची आणि/किंवा वीज खेचण्याची ठिकाणे वर्षातून दोन वेळा, व्यवहार्यतेच्या अधीन राहून, बदलू शकेलः

परंतु असे की, अशा बदलाच्या संदर्भात वितरण परवानाधारकाने करावयाचा अतिरिक्त खर्च, मध्यमकालीन मुक्त प्रवेश ग्राहक सहन करील.

३२.३ वीज निर्मिती किंवा निर्मितीशी संबंधीत जाळे दुरुस्तीसाठी आकस्मिकपणे बंद ठेवावे लागले तर, वितरण परवानाधारक अल्पकालिन मुक्त प्रवेश ग्राहकाला वीज अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण किंवा ठिकाणे बदलण्यास परवानगी, तांत्रिक दृष्ट्या व्यवहार्य असल्यास, देऊ शकेलः

परंतु असे की, अशा बदलाच्या संदर्भात वितरण परवानाधारकाने करावयाचा अतिरिक्त खर्च, अल्पकालीन मुक्त प्रवेश ग्राहक सहन करीलः

परंतु आणखी असे की, असा बदल करण्यास मुक्त प्रवेशाच्या कालावधीत फक्त एकदाच परवानगी देण्यात येईलः

परंतु असे की, दीर्घकालीन प्रवेश आणि मध्यमकालीन प्रवेशाच्या बाबतीत, विद्यमान मुक्त प्रवेश ग्राहकाकडून विजेचे अंतःक्षेपण करण्याच्या आणि/किंवा वीज खेचण्याच्या ठिकाणात करावयाच्या बदलासाठीचा अर्ज वितरण परवानाधारकाला कमीत कमी तीन (३) महिने अगोदर सादर करण्यात येईलः

परंतु असे की, पहिला बदल अंमलात आल्यापासून सहा महिने झाल्यानंतरच, दुसरा बदल करण्यास परवानगी देता येईल. वितरण परवानाधारकाने असा अभ्यास करण्यासाठी केलेल्या सर्व खर्चाची प्रतिपूर्ती अशा ग्राहकांकडून पूर्णपणे करण्यात येईलः

परंतु असे की, विजेचे अंतःक्षेपण करण्याच्या आणि/किंवा वीज खेचण्याच्या ठिकाणात कोणताही बदल करण्यास, जर मुक्त प्रवेशांतर्गत वापरावयाच्या विजेच्या परिमाणात कोणताही बदल होणार नसेल तरच, परवानगी देण्यात येईलः

परंतु आणखी असे की, असा बदल, वितरण परवानाधारकाच्या जाळ्याशी जोडलेल्या किंवा जोडणी घेण्याचा उद्देश असलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या वीज अंतःक्षेपण करण्याच्या ठिकाणात करण्यात येत असल्यास, आणि अशा प्रकल्पाचा, त्याच्या विजेची विक्री, विनियम ३.१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पात्र व्यक्तीला किंवा परवानाधारकाला करण्याचा उद्देश असेल आणि अशी वीज जर उद्देशित लाभधारकाने खेचली नाही तर, पदधारक वितरण परवानाधारकाकडील अशी सर्व ऊर्जा व्यपगत ऊर्जा म्हणून मानण्यात येईल.

**भाग एच : माहिती प्रणाली**

**३३. माहिती प्रणाली**

३३.१ प्रत्येक वितरण परवानाधारक इंटरनेटवर आधारित माहिती प्रणाली ठेवेल व त्यात खालील तपशील देण्यात येईल :-

(अ) अर्जाचा नमुना, अर्ज सादर करण्याची रीत व कार्यपद्धती आणि अर्जा सोबत पाठविण्याचे शुल्क;

(ब) वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या कराराचा नमुना;

(क) आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील असे वहन आकार आणि क्रॉस सबसिडी अधिभार; आणि

(ड) दीर्घ-कालीन प्रवेश, मध्यम-कालीन प्रवेश आणि चालू अल्पकालीन मुक्त प्रवेश ग्राहकांच्या बाबतीत सद्यस्थिती अहवाल, ज्यात खालील बाबींचा समावेश असेल :-

(१) ग्राहकाचे नाव

(२) मुक्त प्रवेश मंजूर केलेला कालावधी (सुरु होण्याचा दिनांक व समाप्तीचा दिनांक);

(३) वीज अंतःक्षेपण करण्याचे ( इंजेक्शन) ठिकाण;

(४) वीज खेचण्याचे (ड्रॉअल) ठिकाण;

(५) वापरलेली पारेषण यंत्रणा/ वितरण यंत्रणा;

(६) वापरलेली मुक्त प्रवेश क्षमता; आणि

(७) मुक्त प्रवेश ग्राहकांच्याबाबतीत मुक्त प्रवेश कालावधीचे प्रत्येक दिवसाचे काल व परिमाण निर्धारण (शेड्यूल).

**भाग आय : वितरण यंत्रणेला जोडलेल्या निर्मिती केंद्राला मुक्त प्रवेश**

**३४. व्याप्ती**

३४.१ वितरण यंत्रणेला जोडलेल्या निर्मिती केंद्राला मुक्त प्रवेश हवा असल्यास अशा निर्मिती केंद्राला, विनियम ३६.१ खाली समाविष्ट असणारे प्रकरण वगळता, दीर्घ-कालीन प्रवेश, मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि अल्प-कालीन मुक्त प्रवेश या सारख्या वेगवेगळ्या प्रसंगासाठी मुक्त प्रवेशाची मागणी करणाऱ्या ग्राहकाला लागू असलेली कार्यपद्धती अनुसरावी लागेल. त्याचप्रमाणे, अशा निर्मिती केंद्राला, मुक्त प्रवेश मागणाऱ्या ग्राहकाला लागू असणारे अर्जाचे शुल्क आणि अन्य मुक्त प्रवेश आकारदेखील, क्रॉस सबसिडी अधिभार आणि अतिरिक्त अधिभार वगळून, भरावे लागतील.

३४.२ मुक्त प्रवेशाची मागणी करणारे निर्मिती केंद्र, ते ज्या वितरण परवानाधारकाला जोडलेले असेल त्या वितरण परवानाधारकाकडे, विहित नमुन्यामध्ये अर्ज करेल.

**३५. अर्जाची छाननी**

वितरण परवानाधारक, अशा निर्मिती केंद्राच्या अर्जाची छाननी करताना, खालील पद्धतीचा अवलंब करेलः-

३५.१ मुक्त प्रवेशाची मागणी करणाऱ्या निर्मिती केंद्राच्या अर्जाची छाननी करताना, वितरण परवानाधारक खालील बाबींची पडताळणी करेल-

(अ) काल-गट-निहाय ऊर्जेचे मापन करण्यासाठी आवश्यक पायाभूत सोयी-सुविधांच्या अस्तित्वाबाबत आणि प्रचलित राज्य ग्रिड संहितेमधील तरतुदींनुसार हिशोब ठेवण्यात येत असल्याची; आणि

(ब) वितरण यंत्रणेत शिल्लक क्षमतेची उपलब्धतेची.

३५.२ जेथे वितरण यंत्रणेमध्ये आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा आणि शिल्लक क्षमता असल्याचे सिद्ध झाले असेल तर, वितरण परवानाधारक ग्राहकाला लागू असलेल्या येथे वर उल्लेखिलेल्या विनियम ९.२ मध्ये निर्देशित केलेल्या कालमर्यादेत त्याची मान्यता कळवील.

परंतु असे की, जर आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध नसतील तर अशा प्रकरणी, वितरण परवानाधारक अशा निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला तांत्रिक आवश्यकता, करून घ्यावयाच्या कामाचा तपशील, त्यासाठी अदा करावयाचे आकार आणि कामे पुरी करून घेण्यासाठी लागणारा अंदाजित कालावधी कळवील, ज्यामुळे अशा निर्मिती कंपनीला असा विजेचा पुरवठा करणे शक्य होईल. वितरण परवानाधारकाला या विनियमांखाली मुक्त प्रवेश देताना झालेला सर्व वाजवी खर्च अशा निर्मिती कंपनीकडून वसूल करण्याचा हक्क राहील.

परंतु आणखी असे की, निर्मिती कंपनीकडून वसूल करावयाचा खर्च निश्चित करताना वितरण परवानाधारक, अधिनियमाच्या कलम ६४ च्या उप-कलम (१) मधील तरतूदींनुसार वीज दर निश्चित करण्यासाठी करावयाच्या अर्जाचा एक भाग म्हणून वितरण परवानाधारकाने सादर करावयाच्या गुंतवणूक योजनेनुसार हाती घेण्यासाठी नियोजित केलेल्या कामाचा तपशील विचारात घेईल.

३५.३ जर अर्ज कोणत्याही प्रकारे अपूर्ण अथवा सदोष असल्याचे आढळून आले तर वितरण परवानाधारक, अर्जदाराला अशी उणीव किंवा दोष ई-मेलने किंवा फॅक्सद्वारे किंवा संदेशवहनाच्या मान्यताप्राप्त नेहमीच्या अन्य कोणत्याही मार्गाने खालीलप्रमाणे कळवेलः-

(एक) दीर्घ-कालिन आणि मध्यम-कालिन मुक्त प्रवेशांच्या बाबतीत, अर्ज प्राप्त झाल्यापासून कामाच्या सात (७) दिवसांच्या आत

(दोन) अल्प-कालिन मुक्त प्रवेशांच्या बाबतीत, अर्ज प्राप्त झाल्यापासून कामाच्या चार (४) दिवसांच्या आत

३५.४ अर्ज योग्य असल्याचे आढळून आले असेल परंतु आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा अस्तित्वात नसल्याच्या किंवा वितरण यंत्रणेमध्ये शिल्लक क्षमता उपलब्ध नसल्याच्या कारणास्तव, वितरण परवानाधारकाने संमती देण्याचे नाकारले तर असा नकार, त्याबाबतच्या कारणांसह, ई-मेल अथवा फॅक्सद्वारे किंवा संदेशवहनाच्या नेहमीच्या अन्य कोणत्याही मान्यता देण्यात आलेल्या मार्गाने अर्जदाराला खालीलप्रमाणे कळविण्यात येईलः-

(एक) दीर्घ-कालिन आणि मध्यम-कालिन मुक्त प्रवेशांच्या बाबतीत, अर्ज प्राप्त झाल्यापासून कामाच्या सात (७) दिवसांच्या आत

(दोन) अल्प-कालिन मुक्त प्रवेशांच्या बाबतीत, अर्ज प्राप्त झाल्यापासून कामाच्या पाच (५) दिवसांच्या आत

३५.५ निर्मिती केंद्र आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे वहन आकार वितरण परवानाधारकाला अदा करेल.

परंतु असे की, ग्राहकाधिष्ठीत वाहिन्या जर वीज निर्मिती केंद्रांच्या मालकीच्या असतील तर, वहन आकार लागू राहणार नाहीत.

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारक जर ग्राहकाधिष्ठीत वाहिन्यांची देखभाल करीत असेल तर, वितरण परवानाधारक मुक्त प्रवेश निर्मात्याला ग्राहकाधिष्ठीत वितरण सुविधा आकार लावेल.

**भाग जे - संकीर्ण**

**३६ पारेषण परवानाधारकाच्या जबाबदाऱ्या**

३६.१ ज्या ग्राहक किंवा व्यक्तीला या विनियमांखाली मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला आहे असा ग्राहक किंवा व्यक्ती पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणी घेऊन जर विजेचा पुरवठा घेत असेल आणि अशा ग्राहक किंवा व्यक्तीला विजेचा पुरवठा करण्यासाठी वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा वापर केला गेला नसेल तर, वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारातील तरतूदी लागू राहणार नाहीत.

परंतु असे की, जर मुक्त प्रवेश ग्राहक वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात स्थित असेल तर, अधिभार देय राहील.

३६.२ विनियम ३६.१ मध्ये उल्लेखलेल्या परिस्थितीमध्ये खालील विनियम लागू राहतील--

(एक) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम २०१४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षमता वाटपांच्या तत्त्वांच्या आधारे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला जोडणी देण्यात येईल;

(दोन) राज्य पारेषण कंपनी/राज्य प्रेषण केंद्र, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला, ( अंशकालीन मुक्त प्रवेश ग्राहक वगळून —ज्यांच्याकडून वितरण परवानाधारक वसूली करील) आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या आणि वितरण परवानाधारकाने पारेषण परवानाधारकाला कळविलेल्या दरावर आधारित, लागू असलेल्या पारेषण आकार, क्रॉस सबसिडी अधिभाराकरिता, देयक पाठवील;

(तीन) पारेषण परवानाधारकाकडे असलेल्या माहितीच्या आधारे पारेषण परवानाधारक वितरण परवानाधारकाला ग्राहकाच्या दर्जात कोणताही बदल झाल्यास, तो वितरण परवानाधारकाला कळवील ज्यामुळे क्रॉस सबसिडी अधिभार निश्चित करताना मदत होईल;

(चार) अधिनियमाखाली ज्या कारणांमुळे जोडणी खंडित करणे अनुज्ञेय असेल त्यापैकी कोणत्याही कारणामुळे ग्राहकाची जोडणी खंडित करण्याचा वितरण परवानाधारकाला हक्क राहील;

(पाच) वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारातील वितरण परवानाधारकावरील बंधने लागू राहाणार नाहीत;

(सहा) वितरण परवानाधारकाचा ग्राहक केवळ आंतर-राज्य पारेषण यंत्रणेवर मुक्त प्रवेश घेत असेल तर तो या विनियमाखाली लागू असणा-या अधिभाराइतका अधिभार देखील भरेल;

(सात ) वितरण परवानाधारकाच्या जाळ्याचा उपयोग न करता, थेट राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणी घेऊन मुक्त प्रवेश घेत असलेल्या वितरण परवानाधारकाच्या ग्राहकाला या विनियमाखाली लाग़ू असणा-या अधिभाराइतका अधिभार देखील भरेल;

(आठ) वितरण परवानाधारकाच्या जाळ्याचा उपयोग न करता, इंटरफेजद्वारे थेट राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणी घेऊन मुक्त प्रवेश घेत असलेल्या ग्राहकांना या विनियमाखाली लाग़ू असणा-या अधिभाराइतका अधिभार देखील भरेल.

स्पष्टीकरण - या विनियमाच्या प्रयोजनार्थ, "पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता" या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम २०१४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अर्थाप्रमाणे असेल.

परंतु असे की, जर अशा सर्व मुक्त प्रवेश ग्राहकांची वीज खेचण्याची ठिकाणे (ड्रॉअल पॉइंट्स) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला जोडलेली असतील आणि जर मुक्त प्रवेश ग्राहक, ज्या निर्मिती कंपनीची विजेचे अंतःक्षेपण करण्याची (इंजेक्शन पॉइंट्स) ठिकाणे आंतर-राज्य किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला जोडलेली असतील अशा निर्मिती कंपनीकडून, वीज पुरवठा घेत असतील तर त्यांना वहन आकार लागू होणार नाहीत. अशा मुक्त प्रवेश ग्राहकांना, त्यांनी पारेषण मुक्त प्रवेश विनियमांखाली ज्या पारेषण परवानाधारकाच्या जाळ्यात प्रवेश घेतला असेल अशा पारेषण परवानाधारकाला फक्त लागू असलेले पारेषण आकार, भरावे लागतील.

परंतु आणखी असे की, ज्या निर्मिती केंद्रांकडे, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणा-या ग्राहकाधिष्ठीत पारेषण वाहिन्या असतील, अशा सर्व निर्मिती केंद्रांना वहन आकार लागू होणार नाहीत आणि अशा ग्राहकाधिष्ठीत पारेषण वाहिन्यांना, अधिनियमाच्या कलम २ (१६) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे अर्थ राहील.

## ३७. मुक्त प्रवेश कमी करण्यासाठी प्राधान्य

३७.१ राज्य ग्रिडच्या कामकाजातील तांत्रिक निर्बंधांना अधीन राहून, ग्राहकांच्या मुक्त प्रवेश सेवा कमी करणे आवश्यक झाले तर, राज्य ग्रिड संहितेच्या आवश्यकतांना अधीन राहून, वितरण परवानाधारकाला देण्यात आलेला मुक्त प्रवेश सर्वात शेवटी कमी करण्यात येईल. इतरांमध्ये, अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक प्रथम कमी करण्यात येतील, त्यानंतर, मध्यक-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक व त्यानंतर दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक असतील.

परंतु असे की, अल्प-कालीन मुक्त व्यवहारांमध्ये, द्वि-पक्षीय व्यवहार प्रथम व त्यानंतर पॉवर एक्स्चेंजचे व्यवहार रद्द किंवा कमी करण्यात येतील.

## ३८. विद्यमान करार

३८.१ या विनियमाच्या अधिसूचनेच्या पूर्वी केलेली कोणती गोष्ट किंवा केलेली किंवा करण्यात आली आहे असे मानण्यात येणारी कोणतीही कार्यवाही ज्यात कोणताही विद्यमान करार किंवा निर्गमित केलेला किंवा करण्यात आलेला करार, दस्तावेज किंवा विलेख यांचा समावेश असेल आणि जे वितरण यंत्रणेच्या वापरासंबंधी असतील ते, अधिनियमाशी विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंतच, वैध व बंधनकारक असतील.

परंतु असे की, ग्राहक त्याचा मुक्त प्रवेश कालावधी समाप्त झाल्यानंतर असा ग्राहक, वितरण परवानाधारकाच्या सर्व अन्य ग्राहकांसारखाच एक ग्राहक असल्याचे समजण्यात येईल व त्यांच्याप्रमाणेच त्याला देयके पाठविण्यात येतील, त्याच्या दर्जात कोणताही बदल होणार नाही आणि त्याला मुक्त प्रवेश कालावधीपूर्वी वितरण परवानाधारकाकडून ज्या सेवा मिळत होत्या त्या सेवा पुरविण्यात येतील.

## ३९. वाद

३९.१. या विनियमांखालील कोणत्याही वादावर आयोगाकडून अभिनिर्णय देण्यात येईल.

परंतु असे की, या वादाच्या अभिनिर्णयासाठी खाली संदर्भ केलेल्या समितीचा अहवाल आयोग विचारात घेईल.

१. समिती

(एक) आयोग """मुक्त प्रवेश संनियंत्रण आणि आढावा समिती'', या नावाची एक समिती स्थापन करेल. या समितीमध्ये राज्य भार प्रेषण केंद्र, पदधारक वितरण परवानाधारक, आयोगाच्या कर्मचाऱ्यांपैकी एक व्यक्ती आणि प्राधिकृत ग्राहक

प्रतिनिधी, यांचा प्रत्येकी एक सदस्य राहील. ही समिती परवानाधारकाच्या कार्यक्षेत्रातील मुक्त प्रवेशाच्या प्रगतीचे संनियंत्रण करील   आणि या समितीची दर तीन (३) महिन्यात किमान एक बैठक होईल.

(दोन) वितरण परवानाधारक मंजूर केलेले मुक्त प्रवेश, प्रलंबित किंवा त्याने नाकारलेले अर्ज, इ. माहिती समितीला देईल.

(तीन) सदर समिती चालू विनियमांवर आपले निरीक्षण/ सूचना दर सहा (६) महिन्यातून किमान एकदा सादर करील.

**४०. दैवी आपत्ती**

४०.१ या विनियमांत काहीही नमूद करण्यात आले असले तरी त्याचा अर्थ, दैवी आपत्तीच्या घटना घडल्यामुळे वितरण परवानाधारक जर वीज जोडणी , मुक्त प्रवेश मंजूर करु शकत नसेल तरी त्याने ते करावे, असा घेण्यात येणार नाही. दैवी आपत्तीच्या घटना खालीलप्रमाणे असतील:-

(एक) नैसर्गिक आपत्ती जी केवळ पूर, वादळ, दुष्काळ, भूकंप आणि साथीचे   रोग यासह परंतु त्यापुरतीच मर्यादित नसेल;

(दोन) युद्ध (घोषित किंवा अघोषित), बंड, आक्रमण, सशस्त्र संघर्ष किंवा परकीय शत्रुच्या कारवाया यापैकी कोणतीही घटना जी भारताशी संबंधित किंवा भारतावर थेट परिणाम करणारी असेल, तसेच क्रांती, दंगल, उठाव, अन्य नागरी असंतोष, दहशतवादी किंवा घातपाताच्या कृत्ये, यापैकी भारतामधील प्रत्येक घटना;

(तीन) निर्मिती केंद्र, स्व-वापरासाठीच्या निर्मिती केंद्र किंवा ग्राहकावर, आंतर-राज्य पारेषण यंत्रणा किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा किंवा अन्य कोणतीही सुविधा किंवा यंत्रणा, जी करारांतर्गत जबाबदा-या पार पाडण्यासाठी करावयाच्या कृतीचा एक अविभाज्य आणि महत्त्वाचा भाग असेल, यांच्यावर थेट परिणाम करणारे अणु-स्फोट, किरणोत्सर्गी अथवा रासायनिक प्रदुषण किंवा आयोनायझिंग किरणोत्सर्जन;

(चार) वर उल्लेखलेल्या कोणत्याही घटनेशी साम्य असणारी भारतात घडणारी  कोणतीही घटना किंवा परिस्थिती.

परंतु असे की, अशी दैवी आपत्तीची घटना घडल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत ती घडल्याचे वितरण परवानाधारक अर्जदार/मुक्त प्रवेश उपयोगकर्त्याला कळवील.

या विनियमांत काहीही विरुद्ध नमूद करण्यात आले असले तरी, वितरण परवानाधारक दैवी अपत्तीच्या घटनांमुळे कोणत्याही हानीस किंवा दायित्वांना जबाबदार राहणार नाही.

**४१. सूट**

४१.१ या विनियमात काहीही नमूद करण्यात आले असले तरी ते नियत दिनांकापूर्वी विजेच्या वितरणाचा व्यवसाय करीत असलेल्या स्थानिक प्राधिकरणाला लागू राहणार नाही.

४१.२ या विनियमात काहीही नमूद करण्यात आले असले तरी ते, जे ग्राहक एकाच वितरण क्षेत्रात कार्यरत असणा-या एका वितरण परवानाधारकाकडून दुस-या वितरण परवानाधारकाकडे गेले असतील त्यांना लागू राहणार नाही.

**४२. दुरुस्ती करण्याचे अधिकार**

४२.१ आयोग या विनियमातील कोणत्याही तरतुदीमध्ये कोणत्याही वेळी सुधारणा करु शकेल.

**४३. अडचणी दूर करण्याचे अधिकार**

४३.१ या विनियमांतील तरतूदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवली तर, आयोग, सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, अडचणी दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटेल, परंतु अधिनियमांमधील तरतूदींशी विसंगत नसतील, अशा तरतूदी करु शकेल.

**४४. रद्द करणे आणि अपवाद**

४४.१ या विनियमात अन्यथा नमूद केलेल्या बाबी वगळून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून रद्द होतील.

४४.२ हे विनियम रद्द करण्यात आले असले तरी, या रद्द केलेल्या विनियमांखाली करण्यात आलेली किंवा केली आहे असे मानण्यात येणारी कोणतीही कार्यवाही ही या विनियमांखाली करण्यात आलेली किंवा केली आहे असे मानण्यात येईल.

४४.३ हे विनियम अमलात येण्याच्या दिनांकापूर्वी प्रचलित असलेल्या करार किंवा संविदेखाली राज्यातील वितरण यंत्रणेतील मुक्त प्रवेश ग्राहकांना, अशा प्रचलित करार/ संविदेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या त्याच अटी व शर्तीना अनुसरुन, वितरण यंत्रणेमध्ये प्रवेश चालू ठेवण्याचा हक्क राहील. असा प्रचलित करार/ संविदा समाप्त झाल्यानंतर, या

विनियमांखाली, अशा व्यक्ती दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश किंवा मध्यम-कालीन मुक्त प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश घेण्यास पात्र असतीलः

परंतु असे की, आयोगाने या विनियमाखाली निश्चित केलेला वहन आकार, क्रॉस सबसिडी अधिभार, अतिरिक्त अधिभार, स्टँड-बाय आकार किंवा अन्य कोणताही आकार सर्व मुक्त प्रवेश ग्राहकांना लागू राहील.

४४.४ या विनियमांत काहीही नमूद करण्यात आले असले तरी, त्यामुळे वीज निर्मिती करीत असलेल्या कोणताही परवानाधारक किंवा ग्राहक किंवा व्यक्ती किंवा वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात जागा असलेल्या व्यक्तीला, मुक्त प्रवेश मिळण्यासाठीच्या कोणत्याही किंवा सर्व शर्ती लागू करण्यातून, त्यासंबंधी लेखी आदेशाद्वारे कारणे देऊन, सूट देण्याचे आयोगाचे अधिकार अवैध ठरणार नाहीतः

परंतु असे की, आयोग अशी सूट देण्यापूर्वी, व्यवहार्य असेल तितकी, कोणत्याही स्वारस्य असलेल्या किंवा बाधित पक्षकाराला त्याचे अभिवेदन सादर करण्याची वाजवी संधी देईल.

४४.५ या विनियमांत काहीही स्पष्टपणे किंवा सूचितपणे नमूद केले असले तरी त्यामुळे, ज्यासाठी कोणतेही विनियम करण्यात आलेले नाहीत, असे कोणतेही प्रकरण हाताळण्यास किंवा अधिनियमातील कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यास, बाधा येणार नाही आणि आयोग अशी प्रकरणे, अधिकार आणि कार्ये त्यास योग्य वाटेल अशारितीने हाताळू शकेल.

मुंबई,

**अश्वनी कुमार,**

सचिव,

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

दिनांक २५ जून २०१४.

## परिशिष्ट १

[मविनिआ (वितरण मुक्त प्रवेश) विनियम २०१४ मधील विनियम ४.१ पहा]

## मुक्त प्रवेशासाठी अर्जाचा नमुना

प्रति

(वितरण परवानाधारकाचे नाव आणि पत्ता)

**विषय : वितरण यंत्रणेत मुक्त प्रवेश**

मी/आम्ही (अर्जदाराचे नाव), विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम २ च्या उप-कलम (४७) सह कलम ४२ च्या उप-कलम (२) व (३) नुसार व त्याखाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विनियमांनुसार, विजेचा पुरवठा मिळविण्यासाठी आपल्या वितरण यंत्रणेत प्रवेश घेऊ इच्छितो.

या संदर्भात, मी/आम्ही आपणास विनंती करतो की, पुढील पानावर दिलेल्या सविस्तर माहितीच्या आधारे, आपल्या वितरण यंत्रणेशी जोडणी व तिचा वापर करण्यासाठी, माझ्या/आमच्या आणि (विद्युत निर्मिती कंपनीचे नाव) / (परवानाधारकाचे नाव) बरोबर आपण वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठी करार करावा.

मी/आम्ही घोषित करतो की, अधिनियमातील तरतुदींनुसार आणि याबाबतीत आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या विनियमांनुसार मी/आम्ही आपल्या वितरण यंत्रणेत मुक्त प्रवेश मिळविण्यासाठी पात्र आहे/आहोत.

अधिनियमातील तरतुदी, आयोगाने विनिर्दिष्ट केलेले विनियम आणि वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारामधील अटी व शर्ती यांचे पालन करण्यास मी/आम्ही सहमत आहे/आहोत.

अर्जदाराची सही

दिनांक :

सध्याचा पत्ता :-

सोबतः अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे/दस्तावेज

१. **अर्जदाराचा सध्याचा दर्जा :** ग्राहक/इच्छुक ग्राहक

२. **ग्राहकाला द्यावयाच्या वीज जोडणीसंबंधीचा तपशीलः**

(ए) ग्राहक क्रमांकः

(बी) मीटर क्रमांकः

(सी) सध्याच्या वीज पुरवठा करार समाप्त करावयाचा दिनांक

(डी) मागणीत वाढ/कमी करण्यासाठी कोणताही अर्ज प्रलंबित आहे काय?ः (हो किंवा नाही)

(इ) वरील (डी) चे उत्तर “ हो ” असल्यास अर्जाचा क्रमांक व दिनांक

(एफ) वीज देऊ इच्छिणारी वीज निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक यांच्याकडे अर्जात मागितलेला भार, कमाल भार व सरासरी भार यासहः

(जी) वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या कराराचा हवा असलेला कालावधीः

३ **वितरण परवानाधारकाच्या वीज पुरवठ्याच्या क्षेत्रात विजेचा पुरवठा हवा असलेल्या इच्छुक ग्राहकाला किंवा व्यक्तीला द्यावयाच्या वीज जोडणीचा तपशीलः**

(ए) अर्जदाराचे नाव आणि अर्जदार त्या जागेचा मालक नसल्यास जागेच्या मालकाचे नावः

(बी) प्रवेश द्यावयाच्या जागेचा पत्ता :

(सी) वीज वापराचा उद्देश :

(डी) वीज देऊ इच्छिणारी वीज निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक यांच्याकडे अर्जात मागितलेला भार, कमाल भार व सरासरी भार यासहः

(इ) जागेमध्ये वायरिंगचे काम करणार असणाऱ्या परवानाप्राप्त विद्युत कंत्राटदाराचे नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि ई-मेल आयडी :

(एफ) वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या कराराचा हवा असलेला कालावधीः

४ **ग्राहक/इच्छुक ग्राहकाच्या अर्जाच्या संबंधात विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला द्यावयाच्या वीज जोडणीचा तपशीलः**

वितरण यंत्रणेशी जोडणीच्या संबंधातील तांत्रिक आवश्यकतांवर आधारित वितरण परवानाधारकाने दिल्याप्रमाणे.

## परिशिष्ट-२

[मविनिआ (वितरण मुक्त प्रवेश) विनियम २०१४ मधील विनियम ६ पहा]

### वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या कराराचा नमुना

हा करार दिनांक, ----- ------ २०---- रोजी

(१) नाव --------------- (पत्ता)------------(येथून पुढे ‘‘वितरण परवानाधारक’’ म्हणून संबोधिलेला);

(२) नाव ----------------(पत्ता) ----------- (येथून पुढे ‘‘ग्राहक’’ म्हणून संबोधिलेला) आणि;

(३) (नाव) --------------(पत्ता) ---------- (येथून पुढे ‘‘पुरवठादार’’ “म्हणून संबोधिलेला)ः

यांच्यामध्ये झाला आहे.

ज्याअर्थी वितरण परवानाधारकाकडे, त्याच्या परवान्यात विनिर्दिष्ट केलेल्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वितरण यंत्रणेचे संचालन व देखभाल करण्यासाठी परवाना आहेः

ज्याअर्थी अधिनियमातील आणि वितरण मुक्त प्रवेश विनियमातील तरतुदींनुसार, वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेत प्रवेशासाठी, ग्राहक पात्र आहे व त्याला प्रवेशाची परवानगी देण्यात आली आहेः

ज्याअर्थी अधिनियमातील आणि वितरण-मुक्त प्रवेश विनियमांतील तरतुदींनुसार विजेचे वहन करण्यासाठी वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेच्या वापर करण्याकरिता पुरवठादार पात्र आहे व त्याला (सदर वितरण यंत्रणेचा) वापर करण्याची परवानगी देण्यात आली आहेः

या करारात खालील बाबींच्या संबंधात पक्षकारांचे अधिकार व दायित्वे निश्चित करण्यात आली आहेत :--

(अ) वितरण परवानाधारकाने ग्राहकाला वितरण यंत्रणेशी जोडणी देण्याची तरतूद आणि अशा जोडणीसाठी ग्राहकाने द्यावयाची रक्कम;

(ब) वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेशी अशा जोडणीच्या संबंधात ग्राहकाची दायित्वेः

(क) विजेचे वहन करण्यासाठी पुरवठादाराच्या वापराकरिता वितरण परवानाधारकाने केलेली वितरण यंत्रणेची तरतूद आणि पुरवठादाराने अशा वापरासाठी द्यावयाची रक्कम; आणि

(ड) वितरण परवानाधारकाने दिलेल्या वितरण यंत्रणेच्या वापराच्या संबंधात पुरवठादाराची दायित्त्वे.

सर्व पक्षकार खालील प्रमाणे आपली सहमती देत आहेतः-

## भाग-अ - सर्वसाधारण

### १. व्याख्या

संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर, या करारामध्ये -

(ए) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(बी) **"अनुज्ञेय वीज खेचणी (ड्रॉअल) किंवा वाटप केलेली क्षमता"** म्हणजे ग्राहकाला, वितरण यंत्रणेवर ठरवून दिलेल्या ठिकाणांमध्ये विजेचे अंतःक्षेपण (इंजेक्शन) करण्यासाठी आणि वीज खेचण्यासाठी (ड्रॉअल), विजेचे हस्तांतरण करण्याकरिता परवानगी देण्यात आलेली मेगावॉटमधील क्षमता;

(सी) **"अर्जदार"** म्हणजे या विनियमांनुसार वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेत जोडणीयता मिळण्यासाठी आणि/किंवा मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठी ज्याने अर्ज केला आहे अशी व्यक्ती;

(डी) **"प्राधिकृत प्रतिनिधी"** म्हणजे वितरण परवानाधारक किंवा पुरवठादार, जसे असेल तसे, यांच्या सर्वसाधारण किंवा विशिष्ट प्राधिकाराखाली कार्ये करीत असलेले वितरण परवानाधारकाचे किंवा पुरवठादाराचे सर्व अधिकारी, कर्मचारी किंवा प्रतिनिधी;

(इ) **"संतुलन व हिशोबपूर्तीची संहिता (Balancing and Settlement Code)"** म्हणजे राज्य भार प्रेषण केंद्राने विकसित केलेली आणि आयोगाने मान्यता दिलेली अशी संहिता ज्यानुसार महाराष्ट्र राज्यातील ग्रिडचा वापर करणाऱ्यांच्या ऊर्जेच्या लेख्यांमध्ये (आवश्यक देवाण-घेवाण करून) संतुलन राखण्यात येईल व त्यांनी शेड्युलनुसार द्यावयाची ऊर्जा व प्रत्यक्ष दिलेली ऊर्जा यातील फरकाचा हिशोब पूर्ण करण्यात येईल;

(एफ) **"मंडळ"** म्हणजे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ;

(जी) **"आयोग"** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(एच) **"जोडणी"** म्हणजे ग्राहकाची जागा वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेशी जोडणे ज्यामुळे अशी जागा आणि अशी वितरण यंत्रणा यांच्यामध्ये विजेचे हस्तांतरण करता येणे शक्य होईल;

(आय) **"जोडणीचे ठिकाण"** म्हणजे ज्या ठिकाणी ग्राहकाची जागा वितरण यंत्रणेशी जोडलेली असते ते भौतिक ठिकाण;

(जे) **"वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठी करार"** म्हणजे वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेला जोडण्यासाठी व यंत्रणेचा वापर करण्यासाठी करण्यात आलेला करार आणि हे करार खालील प्रकारचे असतील :-

या विनियमांना अनुसरुन आणि त्यातील अटी व शर्तींच्या अधीन राहून :-

(एक) वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात जागा असलेली व जिला सदर वितरण परवानाधारका व्यतिरिक्त अन्य परवानाधारकाकडून किंवा वीज निर्मिती कंपनीकडून वीज पुरवठ्याची गरज आहे अशी व्यक्ती आणि सदर वितरण परवानाधारक यांच्यात करण्यात आलेला करार;

(दोन) वर (१) मध्ये उल्लेखलेल्या व्यक्तीला, अशा वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा विजेच्या वहनासाठी वापर करून, विजेचा पुरवठा करण्यास इच्छुक असलेला वितरण परवानाधारक आणि निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक, जसे असेल तसे, यांच्यात झालेला करार;

(तीन) अशा वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात जागा असलेली व्यक्ती जिला वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (विद्युत बाजारपेठ) विनियम, २०१०, अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या पॉवर एक्स्चेंजमधून, सभासदामार्फत किंवा स्वतः सभासद होऊन, वीज पुरवठ्याची गरज आहे अशी व्यक्ती आणि वितरण परवानाधारक यांच्यात झालेला करार;

(के) **"करारांतर्गत मागणी"** म्हणजे किलोवॉट (के-डब्लू) किंवा अश्व-शक्ती (एचपी) किंवा किलोव्होल्ट ॲम्पीअर (केव्हीए) किंवा मेगाव्होल्ट ॲम्पीअर (एमव्हीए) मधील वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांच्यात परस्पर संमतीने मान्य झालेली विजेची मागणी जी -

(एक) वीज पुरवठ्याच्या करारात नोंदल्याप्रमाणे असेल; किंवा

(दोन) वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारात नोंदल्याप्रमाणे असेल; किंवा

(तीन) अन्य लेखी पत्रव्यवहारात मान्य केल्याप्रमाणे असेल;

परंतु असे की, मेगाव्होल्ट ॲम्पीअर/किलोव्होल्ट ॲम्पीअर पासून मेगावॉट/किलोवॉट युनिट मध्ये रुपांतर करण्याच्या प्रयोजनासाठी युनिटी पॉवर फॅक्टर विचारात घेण्यात येईल.

(एल) **"ग्राहकाधिष्ठित वितरण सुविधा"** म्हणजे सेवा-वाहिनीचा समावेश नसेल अशा सुविधा, ज्या वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा भाग असतील, ज्या त्याच जागेतील किंवा अशा जागेला लागून असलेल्या जागेतील, स्पष्टपणे व केवळ एका ग्राहकाला किंवा ग्राहकांच्या गटाला विजेचा पुरवठा करण्याकरिता समर्पित असतील;

(एम) **" वितरण मुक्त प्रवेश विनियम "** म्हणजे अधिनियमाच्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (पी), खंड (क्यू) आणि खंड (झेडपी), अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेले विनियम;

(एन) **" विद्युत पुरवठा संहिता "** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (यू), खंड (व्ही), खंड (डब्ल्यू), खंड (एक्स), आणि खंड (झेडपी), अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेले विनियम;

(ओ) **"ऊर्जीकरण"** म्हणजे कोणत्याही आयसोलेटर, ब्रेकर किंवा स्वीचची हालचाल किंवा भर घातलेला कोणताही फ्युज किंवा मीटर ज्याद्वारे ॲक्टिव्ह पॉवर किंवा रिॲक्टिव्ह पॉवरचा पुरवठा जोडणीच्या ठिकाणामधून ग्राहकाच्या जागेमध्ये करता येईल किंवा तेथून काढून घेता येईल आणि "निर-ऊर्जीकरण" आणि "फेर-ऊर्जीकरण" या संज्ञांचा अर्थ त्यानुसार लावण्यात येईल.

(पी) **"परवानाधारक विद्युत ठेकेदार "** म्हणजे राज्य शासनाने विद्युत कामे करण्याच्या प्रयोजनासाठी परवाना दिलेला विद्युत ठेकेदार.

(क्यू) **"मीटर"** म्हणजे दिलेल्या वेळेत पुरविण्यात आलेल्या विद्युत उर्जेचे किंवा वीज पुरवठ्यात असलेल्या विद्युत उर्जेचे परिमाण मोजण्यासाठी, नोंदविण्यासाठी व साठविण्यासाठी एकत्रित उपकरणांचा संच ज्यामध्ये संपूर्ण करंट मीटर, आणि मिटरींग उपकरण जसे की करंट ट्रान्सफॉर्मर, कॅपॅसिटर व्होल्टेज ट्रान्सफॉर्मर, किंवा आवश्यक वायरिंग व उपकरणांसहित पोटेन्शियल किंवा व्होल्टेज ट्रान्सफॉर्मर यांचा अंतर्भाव असेल तसेच पूर्व-भरणा केलेल्या मीटर्सचादेखील असेल;

(आर) **" अंशकालीन मुक्त प्रवेश ग्राहक"** म्हणजे निर्मिती कंपनी किंवा अन्य परवानाधारक किंवा पॉवर एक्स्चेंजच्या मार्फत वीज घेण्यासाठी ज्याला या विनियमांतर्गत मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला आहे असा ग्राहक आणि त्याचवेळी जो त्याची विजेची गरज भागविण्यासाठी ( तो ज्याच्या वीज पुरवठ्याच्या क्षेत्रात राहतो अशा वितरण परवानाधारकाकडे) त्याची अंशतः विजेची मागणी राखून ठेवतो;

(एस) **"पुरवठ्याचे ठिकाण"** म्हणजे ग्राहकाच्या जागेत बसविलेल्या कट-आउट्सच्या बहिर्गामी टर्मिनलचे ठिकाणः

परंतु असे की, उच्च दाब मांडणी असलेल्या ग्राहकाच्या बाबतीत पुरवठ्याचे ठिकाण म्हणजे ग्राहकाच्या उपकरणाच्या आधी बसविलेल्या वितरण परवानाधारकाच्या मीटरच्या कपाटातील बहिर्गामी टर्मिनलचे ठिकाणः

परंतु आणखी असे की, मीटरचे कपाट नसल्यास किंवा जेथे मीटर हे उच्च दाब मांडणीच्या लघु-दाबाच्या बाजूला असेल तर, अशा ग्राहकाच्या मेन स्वीचगिअरचे प्रवेशी टर्मिनल हे पुरवठ्याचे ठिकाण राहील.

(टी) **"नियम"** म्हणजे अधिनियमाच्या कलम १७८ आणि १८० अंतर्गत विहित करण्यात येतील असे नियम आणि अधिनियमाच्या कलम १७७ अंतर्गत विनिर्दिष्ट करण्यात येतील असे विनियम;

(यू) **"पुरवठादार"** म्हणजे अन्य वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात स्थित असलेल्या ग्राहकाला किंवा व्यक्तीला अशा अन्य वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा वापर करून त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात, वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारानुसार किंवा ग्राहकाधिष्ठीत पारेषण वाहिन्या टाकून, विजेचा पुरवठा करणारी वीज निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक, जसे असेल तसे;

(व्ही) **" पुरवठा करार"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ४९ अंतर्गत अभिप्रेत असलेला करार;

येथे वापरण्यात आलेले शब्द किंवा उक्ती ज्यांची व्याख्या करण्यात आलेली नाही त्यांना, अधिनियम, नियम व विनियमात देण्यात आलेला अर्थ राहील.

**२. अधिनियम, नियम व विनिमय यांचे पालन**

२.१ या करारामधील सर्व पक्षकार अधिनियम आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियम व विनियमातील तरतुदींचे पालन करतील. जेथे या करारामधील कोणतीही तरतूद, अधिनियम आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियम व विनियमातील तरतुदींशी विसंगत असेल तर, अशा विसंगतीच्या मर्यादेपर्यंत, अधिनियम, नियम किंवा विनियम, जसे असेल तसे, यामधील तरतुदीं ग्राह्य असतील.

**३.** वेळोवेळी सुधारणा केलेले वितरण आणि पारेषण मुक्त प्रवेश विनियम, राज्य ग्रिड संहिता आणि संतुलन व हिशोबपूर्तीची संहिता यांचे पालन.

३.१ या करारातील सर्व पक्षकार, वेळोवेळी सुधारणा केलेले वितरण आणि पारेषण मुक्त प्रवेश विनियम**,** २०१४, राज्य ग्रिड संहिता आणि संतुलन व हिशोबपूर्तीची संहिता यामधील तरतुदींचे, त्यांना लागू असतील त्या मर्यादेपर्यंत, पालन करतील.

**४. कराराची मुदत**

४.१ या कराराची सुरूवात या करारात विनिर्दिष्ट केलेल्या तारीख व वेळेपासून होईल आणि खालील खंड ५ नुसार तो समाप्त न केला गेल्यास, पक्षकार संमत करतील अशा कालावधीपर्यंत तो पुढेही अंमलात राहील.

**५. कराराची समाप्ती**

५.१ या कराराची समाप्ती करू इच्छिणारा पक्षकार, इतर पक्षकारांना या कराराच्या समाप्तीविषयी किमान तीस (३०) दिवस आधी लेखी पूर्व-सूचना देईलः

परंतु असे की, अधिनियम, विनियम व या करारानुसार वितरण परवानाधारकाला देय असलेल्या सर्व देय रकमांची हिशोबपूर्ती करण्याच्या अधीन राहून हे समाप्तीकरण करता येईल.

५.२ अधिनियमातील तरतुदीनुसार, पुढील परिस्थितीत वितरण परवानाधारक करार समात करून ग्राहकाचा पुरवठा बंद करू शकेल :-

५.२ (अ) अधिनियमाच्या कलम ५६ नुसार ग्राहकाने त्याच्याकडून देय असलेला कोणताही आकार किंवा कोणतीही अन्य रक्कम न भरल्यास;

(ब) ग्राहकाने अधिनियमाच्या कलम १६३ च्या उप-कलम (३) मध्ये निर्देश केलेली एखादी कृती केल्यास; किंवा

(क) अधिनियम, नियम व विनियमांतील कोणत्याही अन्य तरतुदीखाली आणि/किंवा प्रचालित असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यानुसार पुरवठा बंद करणे प्राधिकृत करण्यात आले असल्यास.

५.३ वितरण परवानाधारक पुरवठादाराला या कराराच्या समाप्तीची पंधरा (१५) दिवस आधी लेखी पूर्वसूचना देईल जर :-

(अ) अधिनियम, विनियम व या करारानुसार पुरवठादाराकडून येणे असलेला कोणताही आकार किंवा कोणतीही अन्य रक्कम त्याने अदा केली नसल्यास;

(ब) या करारानुसार पुरवठादाराने त्याचे कोणतेही दायित्व पूर्ण न केल्यास व त्यामुळे परिणामी वितरण परवानाधारकाचे नुकसान होण्याची शक्यता असल्यास;

(क) जर पुरवठाकार नादार झाला असल्यास.

५.४ वरील खंड ५.३ नुसार दिलेल्या पूर्व-सूचनेच्या कालावधित पुरवठादार सूचनेत नमूद केलेले कारण किंवा कारणे यांच्यांत सुधारणा घडवून आणण्यासाठी उपाय-योजना करेल किंवा ती दूर करेल अन्यथा वितरण परवानेधारक सूचनेत दिलेल्या तारखेपासून पुरवठा खंडित करु शकेल.

५.५ वरील खंड ५ मध्ये काहीही असले तरी जेथे कराराच्या समाप्तीची परिणती ही ग्राहकाचा वीज पुरवठा बंद होण्यात होते तेथे ते केवळ अधिनियमाने प्राधिकृत केलेल्या कारणांसाठीच असेल.

५.६ खंडित ग्राहकाची पुनर्जोडणी ही या अधिनियमाच्या व विनियमांमधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

**६. वाद निवारण**

६.१ वाद निवारण करण्यासाठी प्रत्येक पक्ष वाजवी प्रयत्न करून उभयपक्षी मान्य होईल अशा पद्धतीने वाद निवारण करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्नशील राहील.

**६.२** जेव्हा असा वाद हा--

(अ ) वितरण परवानाधारक व ग्राहक; किंवा

(ब) वितरण परवानाधारक व पुरवठादार यांच्यामधील असून तो उभयपक्षी मिटत नसेल तर त्याचे निवारण वितरण मुक्त प्रवेश विनियमांनुसार करण्यात येईल.

**७ दैवी आपत्ती**

७.१ दैवी आपत्ती घटना घडल्याच्या कारणाने कोणताही पक्षकार त्याचे दायित्व पालन वेळेवर करण्यात पूर्णतः किंवा अंशतः असमर्थ ठरला व त्या पक्षकाराची क्षमता दैवी आपत्तीच्या त्या घटनेमुळे बाधित झाली असेल तर असे दायित्व, त्याबाबतच्या जबाबदारीशिवाय, स्थगित ठेवण्यात येईल.

७.२ दैवी आपत्तीच्या घटनेमुळे बाधित झालेला पक्षकार अशा प्रत्येक दैवी आपत्तीच्या घटनेमुळे या कराराच्या पालन करण्यावर होणारे परिणाम दूर करण्यासाठी वाजवी असे सर्व प्रयत्न करेल.

७.३ वरील खंड ७.२ च्या अधीन राहून, जर एखाद्या पक्षकाराच्या मते अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, जिच्या परिणामस्वरुप दैवी आपत्तीची घटना घडू शकण्याची शक्यता आहे तर तो पक्षकार दुसऱ्या पक्षकाराला व्यावहारिकदृष्ट्या शक्य असेल तितके लवकर अशा दैवी आपत्तीच्या घटने संदर्भात पुढील सूचना देईल :-

(अ ) तिचे स्वरूप व अंदाजे कालावधी,

(ब) त्यामुळे ज्यावर परिणाम होऊ शकतील अशी दायित्वे व त्या घटनेमुळे दायित्वावर होणाऱ्या परिणामाचे स्वरुप व व्याप्ती; आणि

(क) अशा घटनेचे परिणाम दूर करण्यासाठी, त्यावर मात करण्यासाठी किंवा ते किमान पातळीवर रोखण्यासाठी केलेली उपाययोजनाः

परंतु असे की, दैवी आपत्तीच्या घटनांबाबतची परिस्थिती वितरण मुक्त प्रवेश विनियम, २०१४ ंनुसार हाताळण्यात येईल.

८. **प्रतिनिधित्त्व आणि हमी**

८.१ पुरवठादार प्रतिनिधी म्हणून हमी देतो की तो,

अ) तो, विजेचा पुरवठा हवा असणा-या पात्र व्यक्तीला, अधिनियम व वितरण मुक्त प्रवेश विनियमांतील तरतुदींनुसार, विजेचा पुरवठा करत असणारा किंवा करु इच्छिणारा, विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक आहे.

८.२ ग्राहक प्रतिनिधी म्हणून हमी देतो की -

(अ) तो, अधिनियम आणि वेळोवेळी सुधारणा केलेल्या वितरण मुक्त प्रवेश विनियम, २०१४ मधील तरतुदीनुसार वितरण यंत्रणेत मुक्त प्रवेश मिळण्यासाठी पात्र असून वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रांत जागा असलेला व विजेचा पुरवठा हवा असणारा, एक ग्राहक किंवा व्यक्ती आहे; किवा

(ब) तो, विजेचा पुरवठा हवा असणा-या पात्र ग्राहकाला किंवा व्यक्तीला, अधिनियम व वितरण मुक्त प्रवेश विनियम, २०१४ मधील तरतुदींनुसार, विजेचा पुरवठा करत असणारा किंवा करण्यास इच्छुक असणारा तो एक विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक आहे.

८.३ वितरण परवानाधारक प्रतिनिधी म्हणून हमी देतो की त्याच्याजवळ कराराची मुदत संपेपर्यंत विजेचे वितरण करण्याचा परवाना आहे.

**९. करारामध्ये बदल**

९.१ राज्यात मुक्त प्रवेश सुरू केल्यामुळे त्यापासून मिळालेल्या अनुभवांच्या आधारे या करारात कोणताही वाजवी बदल करणे आवश्यक वाटल्यास करारामधील सर्व पक्षकार त्याबाबत सदहेतूने चर्चा करण्यास सहमत आहेत.

**भाग-ब - जोडणी**

**१० जोडणीसाठी करार**

१०.१ हा करार खालील व्यक्तींनी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने करण्यात येईलः-

(अ) ग्राहक आणि

(ब) वीज पुरवठा हवा असलेली व्यक्ती जिची जागा वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात आहे.

अधिनियम आणि वितरण मुक्त प्रवेश विनियमांतील तरतुदींना अधीन राहून वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेत प्रवेश मिळण्यासाठी

१०.२ या करारातील अटी व शर्तींच्या अधीन राहून, अधिनियम किंवा वितरण मुक्त प्रवेश विनियमांत प्राधिकृत केले असल्यास ते वगळून, वितरण परवानाधारक ग्राहकाची जागा, जोडणीच्या ठिकाणी वितरण यंत्रणेशी जोडण्याचे व या कराराच्या कालावधीत जोडलेली ठेवण्याचे व जोडणीचे ठिकाण ऊर्जीकृत ठेवण्याचे मान्य करतो.

१०.३ खालील बाबींवर कोणताही प्रतिकूल परिणाम होऊ नये यासाठी ग्राहक वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेशी दिलेल्या जोडणीची सर्व प्रकारे खबरदारी घेईलः

(अ) वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा वापर;

(ब) वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेतून होणा-या वीज पुरवठ्याचा दर्जा व विश्वासार्हता; आणि

(क) अधिनियमाच्या कलम ५३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विनियमांनुसार, ग्राहकाने परवानाधारकाच्या कामांच्या व कर्मचारी वर्गाच्या घ्यावयाची सुरक्षा

**११ अर्जाची छाननी**

११.१ वरील खंड १०.१ नुसार अर्ज प्राप्त झाल्यानंतर, अर्जदार विद्यमान ग्राहक नसल्यास, वितरण परवानाधारक त्याचा अधिकृत प्रतिनिधी खालील कामांसाठी पाठवेल -

(अ) वितरण यंत्रणेशी जोडणी करण्यासाठी तांत्रिक आवश्यकतांचा अभ्यास करण्यकरिता; आणि

(ब) अर्जदाराला पूर्व-सूचना देवून जोडणी द्यावयाच्या जागेची तपासणी करण्यासाठी.

११.२ अर्जदाराच्या अनुमतीने अधिकृत प्रतिनिधि, मेन्स, कट-आऊट्स किंवा सर्किट ब्रेकर्स आणि मीटर्सची मांडणी निश्चित करेल व त्या जागेसाठी विद्युत भार मंजूर करेल :

परंतु असे की, सर्वसाधारणतः सेवा देण्याकरिता प्रवेशास सुलभ अशी जागा निवडण्यात येईल तसेच हवामानाच्या प्रतिकूल परिणामांपासून बचाव व्हावा व मीटरमधील नोंदी घेणे सुलभ व्हावे यासाठी मीटर योग्य उंचीवर बसविण्यात येईल.

११.३ वरील खंड ११.१ मध्ये उल्लेखलेली तपासणी करण्यात आल्यानंतर, वितरण परवानाधारक अर्जदाराला पुढील बाबतीत कळवेल- जोडणी देण्यासाठी कराव्या लागणा-या आवश्यक कामांची सविस्तर माहिती, या कामांसाठी अर्जदाराला खालील खंड १३ नुसार सहन करावा लागणारा खर्च, अर्जदाराने प्राप्त करून घ्यावयाचे उरलेले दस्तावेज आणि मान्यता/सांविधिक परवानग्यांची यादी देईल.

११.४ परिपूर्ण असा अर्ज व त्या सोबत आवश्यक आकारांची रक्कम, तसेच योग्य अशी जागा किंवा खोलीची उपलब्धता आणि खालील खंड १२ नुसार आवश्यक असलेल्या अन्य मान्यता व परवानग्या प्राप्त झाल्यानंतर, वितरण परवानाधारक जोडणीच्या ठिकाणाचे ऊर्जीकरण करण्यासाठी आवश्यक कामांना मंजुरी देईल आणि ती कामे करेल किंवा करून घेण्यास परवानगी देईल.

११.५ वितरण परवानाधारक जोडणीच्या ऊर्जीकरणासाठी करावयाच्या चाचण्यांबाबत ग्राहकाला किमान दोन (२) दिवस आधी पूर्व-सूचना देईल आणि जोडणीचे ऊर्जीकरण केल्यानंतर लगेच ग्राहकाला जोडणी सुविधा दिल्याची तारीख आणि वेळ कळवेल.

११.६ वरील खंड ११.५ मध्ये उल्लेखलेली पूर्व-सूचना मिळण्यापूर्वी, ग्राहक त्याच्या जोडणीच्या ठिकाणातून वितरण यंत्रणेमधून वीज घेणे किंवा वितरण यंत्रणेला वीज देण्यासारखे कोणतेही कृत्य करणार नाही.

११.७ वितरण यंत्रणेला जोडणी देण्यासाठी करण्यात आलेल्या कामांची देखभाल या कराराच्या कालावधीत वितरण परवानाधारक करेल.

११.८ वितरण परवानाधारकाला, अन्य कोणत्याही पात्र व्यक्तीला जोडणी देण्यासाठी किंवा त्या वितरण परवानाधारकाच्या इतर कोणत्याही ग्राहकाला विजेचा पुरवठा करण्यासाठी अशा कामांचा वापर करण्याचा, हक्क असेल. मात्र असा वापर ग्राहकाच्या जोडणीला किंवा त्या ग्राहकाच्या संबंधातील वितरण यंत्रणेच्या वापराला हानिकारक नसला पाहिजे.

**१२ वहिवाटीचा हक्क व प्रवेशाच्या अटी**

१२.१ अर्जदाराच्या अधिकारात असलेल्या सर्व मान्यता अर्जदार, वितरण यंत्रणेत प्रवेश मिळण्यासाठी आवश्यक असणारी कामे करण्याकरिता वितरण परवानाधारकाला देईल.

१२.२ जर वहन करणा-या वितरण परवानाधारकाला अर्जदाराच्या जागेत जोडणीसाठी वितरण रोहित्र बसविण्याची गरज वाटली तर अर्जदार, वितरण परवानाधारकाला कराराच्या कालावधीकरिता अशा जागेतील सुयोग्य जमिनीचा काही भाग किंवा खोली भाडेपट्टी कराराने उपलब्ध करून देईलः

परंतु असे की, वरील तरतूद, जर मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून हस्तांतरण करावयाची वीज १ मेगावॉटपेक्षा जास्त असेल तरच, लागू होईल.

परंतु असे की, वर उल्लेखलेला भाडेपट्टा हा वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ ( विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम, २००५ नुसार, असेल.

१२.३ वरील खंड १२.२ मध्ये काहीही असले तरी जेथे स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा राज्य सरकारच्या कोणत्याही समुचित प्राधिकरणाच्या विकास नियंत्रण नियमाच्या अंतर्गत जमिनीची किंवा खोलीची तरतूद

करण्यात येणार असेल तर अशा जमीन किंवा खोलीच्या वापराबाबतच्या अटी व शर्ती, त्या नियमांखाली किंवा सदर प्राधिकरणाद्वारे निश्चित करण्यात येतील.

**१३ आकार लागू करण्याची तत्त्वे**

१३.१ जोडणी देण्यासाठी वितरण मेन्सपासून अर्जदाराच्या जागेपर्यंत सेवा-वाहिन्या टाकण्याची कामे करावयाची आवश्यकता असेल तेव्हा, विद्युत पुरवठा संहितेत आयोगाने मान्यता दिलेल्या आकारांच्या अनुसूचीच्या आधारे, अशा कामांसाठी केलेला सर्व खर्च अर्जदाराकडून वसूल करण्याचा अधिकार वितरण परवानाधारकाला असेल.

१३.२ जेथे जोडणी देण्यासाठी ग्राहकाधिष्ठित वितरण सुविधा उभारणे आवश्यक असेल तेथे अशा कामांसाठी केलेला सर्व वाजवी खर्च मान्यताप्राप्त आकारांच्या अनुसूचीच्या आधारे अर्जदाराकडून वसूल करण्याचा अधिकार वितरण परवानाधारकाला असेल.

१३.३ जोडणीसाठी करावी लागणारी कामे, जी वरील खंड १३.१ किंवा खंड १३.२ मध्ये उल्लेखलेली नसतील, तेव्हा ग्राहकाला, हा करार समाप्त झाल्यानंतर, वितरण परवानाधारकाच्या स्वतःच्या ग्राहकांकरिता विद्युत पुरवठा संहितेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तत्त्वांना अनुसरुन, सनदी लेखापालाने प्रमाणित केलेली, अशा सुविधांची वसुलीयोग्य रक्कम मिळण्याचा हक्क ग्राहकाला असेल.

परंतु असे की, जेव्हा अशा सुविधा ग्राहकाने पुरविलेल्या असतील तेव्हा, हा करार समाप्त झाल्यानंतर अशा सुविधा ग्राहकाला ठेवून घेता येतील.

परंतु तथापि असे की, अधिनियमाच्या कलम ५६ खाली कोणतीही रक्कम ग्राहकाने भरणा न केल्यामुळे जर करार समाप्त झाला असेल तर, वितरण परवानाधारकाला, त्या कलमाखाली उपलब्ध असलेल्या हक्कांव्यतिरिक्त, अशा रकमांचे समायोजन ग्राहकाला या खंड १३.५ खाली मिळण्याचा हक्क असलेल्या सुविधांच्या वसुलीयोग्य रकमेमधून करण्याचा हक्क राहील किंवा अशा वसुलीयोग्य रकमांच्या सुविधा ग्राहकाने वितरण परवानाधारकाला द्यावयाच्या अशा रकमेपोटी ठेवून घेण्याचा, हक्क राहील.

**स्पष्टीकरण** - या विनियमांच्या प्रयोजनार्थ "वसूलीयोग्य रक्कम" या संज्ञेचा अर्थ भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या लेखा मानक (ए.एस) २८ "इम्पेअरमेंट ऑफ असेटस्" मध्ये दिल्याप्रमाणे असेल.

१३.४ जेथे वितरण परवानाधारकाने अर्जदाराला परवानाधारक विद्युत ठेकेदाराकडून जोडणीसाठी कामे करून घेण्यास परवानगी दिली असेल तर, वितरण परवानाधारकाला फक्त वितरण परवानाधारकाने केलेल्या पर्यवेक्षणासाठी आकारांची वसुली करण्याचा हक्क असेल व ही वसुली जर, वितरण परवानाधारकाला अशी कामे करून घेण्यासाठी जे कामगार नेमावे लागले असते त्यांच्यावरील खर्चाच्या जास्तीत जास्त १५ टक्के इतकी असेल.

१३.५ या खंड १३ खालील सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर, वितरण परवानाधारक हा पुरवठा वितरण परवानाधारकास कामे पूर्ण झाल्याचे या खंड १३ खाली अधिसूचित करेल .

**१४ नावातील बदल**

१४.१ ग्राहकाचा मृत्यू झाल्यास किंवा जागेची मालकी किंवा ताबेदारी यात बदल झाल्यास नव्या मालकाने किंवा ताबेदाराने नाव बदलण्याकरिता अर्ज केल्यास ती जोडणी त्या दुसऱ्या व्यक्तीच्या नावे केली जाऊ शकेलः

परंतु असे की, नावातील अशा बदलामुळे अर्जदाराला ती जोडणी एखाद्या नव्या जागी हलविण्याचा अधिकार असणार नाही.

१४.२ नाव बदलण्यासाठी केलेल्या अर्जाबरोबर, विद्युत पुरवठा संहितेनुसार मान्यता देण्यात आलेली, वितरण परवानाधारकाच्या आकाराची रक्कम पाठविण्यात येईल.

१४.३ खंड १४.१ नुसार केलेल्या अर्जासोबत पुढील कागदपत्रे पाठविण्यात येतीलः

(एक) ज्याच्या नावे जोडणी करावयाची आहे त्याच्यासाठी हस्तांतरकर्त्याने दिलले संमतीपत्र;

(दोन) संमतीपत्र नसल्यास, जागेच्या संबंधात पुढीलपैकी कोणताही एक दस्तावेज-- (अ) जागेच्या

मालकीचा पुरावा (ब) विभागणीच्या बाबतीत विभागणी करारपत्र (क) नोंदणीकृत करारपत्र किंवा (ड) वारसा प्रमाणपत्र;

(तीन) सांविधिक गरज असल्यास, जागेला वीज पुरवठा करण्याच्या उद्देशाच्या संबंधात परवान्याची/ मंजुरीची फोटोप्रत;

(चार) प्रक्रिया शुल्क किंवा ते भरल्याची पावती.

१४.४ नाव बदलण्यासाठी आलेल्या अर्जाच्या तारखेनंतर दोन (२) महिन्यांच्या आत वितरण परवानाधारक अर्जदाराला नाव बदलण्याबाबतचा निर्णय कळवेलः

परंतु असे की, वितरण परवानाधारकाने नाव बदलण्यास परवानगी दिली नसेल किंवा नकार दिला असेल तर तसे करण्यापूर्वी नाव बदलण्यासाठी अर्जदाराला त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईलः

परंतु आणखी असे की, असा अर्ज नाकारण्याची कारणे वितरण परवानाधारक अर्जदाराला लेखी कळवेल.

१४.५ एखाद्या निधन पावलेल्या ग्राहकाकडून किंवा जागेच्या आधीच्या मालक/ताबेदाराकडून वितरण परवानाधारकाला देय असलेला कोणताही आकार किंवा आकारा व्यतिरिक्त अन्य कोणतीही रक्कम ही त्या जागेचा कायदेशीर प्रतिनिधी /कायदेशीर वारस किंवा नवीन मालक /ताबेदार यांच्यावर, जसे असेल तसे, जागेवरील येणे आकार म्हणून लागू होईल आणि वितरण परवानाधारकाकडून तो अशा कायदेशीर प्रतिनिधी, वारस किंवा जागेचा नवीन मालक/ताबेदार यांच्याकडून, जसे असेल तसे, वसुलीयोग्य राहील;

परंतु असे की, कायदेशीर वारसाला जोडणीचे हस्तांतरण वगळता, या खंड १४.५ नुसार हस्तांतर करण्यात आलेली दायित्वे, अधिनियमाच्या कलम ५६ आणि या करारानुसार, वितरण परवानाधारकाला येणे असलेल्या जास्तीत जास्त सहा महिन्यांच्या कालावधीत भरणा न केलेल्या आकारांइतकी सीमित राहतील.

## १५ ग्राहकाच्या जागेचे वायरिंग

ग्राहकाच्या जागेत जोडणीच्या ठिकाणा पलीकडील वायरिंगचे काम ग्राहकाने स्वतः, अधिनियमाच्या तरतुदी अंतर्गत त्यासाठी कोणतेही नियम किंवा विनियम करण्यात येत नाही तोपर्यंत, भारतीय विद्युत नियम,१९५६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मानकांनुसार, करून घ्यावयाचे आहे.

## १६ मागणी व निर्यातीवरील मर्यादा

१६.१ वेळोवेळी संमती देण्यात आलेल्या करारांतर्गत मागणीपेक्षा (आयात किंवा निर्यात, लागू असेल तसे) जास्त विजेची आयात किंवा निर्यात, वितरण परवानाधारकाची लेखी पूर्व-परवानगी घेतल्याशिवाय ग्राहक त्याच्या जोडणीच्या ठिकाणातून होऊ देणार नाही.

१६.२ करारांतर्गत मागणीपेक्षा (आयात किंवा निर्यात, लागू असेल तसे) जास्त झाली तर वितरण परवानाधारक सविस्तर माहिती देऊन ग्राहकाला नोटीस देऊन सात (७) दिवसांच्या आत परिस्थितीत सुधारणा करण्याची विनंती करेल. ग्राहकाने तसे न केल्यास, अधिनियमानुसार त्याला उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही अधिकारा व्यतिरिक्त, वितरण परवानाधारकाला आयोगाने ठरवून दिलेला दंड आकारण्याचा अधिकार असेल.

## १७ पॉवर फॅक्टर / हार्मोनिक्स

१७.१ ग्राहकावर त्याच्या विद्युत भाराचा सरासरी पॉवर फॅक्टर, भारतीय विद्युत नियम १९५६ मध्ये विहित करण्यात आलेल्या पातळीवर, भारतीय विद्युत नियम १९५६ मधील नियम २७ नुसार वितरण परवानाधारकाने स्वीकारलेल्या त्यातील तफावतीसह, काही असल्यास, आणि आयोगाच्या या संबंधांतील आदेशानुसार, राखणे बंधनकारक राहील.

१७.२ ग्राहकावर त्याच्या विद्युत भाराच्या हार्मोनिक्सचे नियंत्रण, आय ई ई ई स्टॅंडर्ड ५१९-१९९२ ने विहित करण्यात आलेल्या पातळीवर व तसेच आयोगाच्या संबधित आदेशानुसार, राखणे बंधनकारक राहील.

१७.३ वितरण परवानाधारक ग्राहकाला वाजवी कालावधीत, जो तीन (३) महिन्यांपेक्षा कमी नसेल, त्याच्या संचमांडणीचा सरासरी पॉवर फॅक्टर विहित मानकापेक्षा कमी नसेल इतक्या मूल्यापर्यंत वाढविण्यास किंवा हार्मोनिक्स नियंत्रणाखाली ठेवण्यास सांगेल;

परंतु असे की, पुरवठा वितरण परवानाधारक कमी/जास्त पॉवर फॅक्टरसाठी आणि हार्मोनिक्ससाठी, आयोगाच्या संबंधित आदेशानुसार, दंड आकारू शकेल किंवा प्रोत्साहन-अधिदान देऊ शकेल.

१८ **जागेत प्रवेश**

१८.१ वितरण परवानाधारकाचा अधिकृत प्रतिनिधी किंवा अधिनियम व त्याखाली करण्यात आलेल्या नियम व विनियमानुसार अधिकार असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीला, ग्राहकाच्या जागेत असलेल्या वितरण परवानाधारकाच्या मालमत्तेमधील एखादे विद्युत संयंत्र, विद्युत वाहिन्या किंवा मीटर चालविण्यास, हाताळण्यास किंवा काढून टाकण्यास, किंवा तेथील मोहोर, नाम-पट्टी (नेम प्लेट), ओळख-क्रमांक यात मोडतोड, काढून टाकण्यास, खाडाखोड, किंवा अन्यथा ढवळाढवळ, करण्याचा अधिकार असणार नाही;

परंतु असे की, दोन्ही वितरण परवानाधारकांचा असा अधिकृत प्रतिनिधी या खंड १८ मधील कोणतीही कामे ग्राहक किंवा त्याचा प्रतिनिधी यांच्या उपस्थितीशिवाय करणार नाही;

परंतु आणखी असे की, जेव्हा एखादी व्यक्ती जागेत विजेचा अनाधिकृत वापर करीत आहे आणि / किंवा ती व्यक्ती या अधिनियमाच्या भाग १४ मध्ये तरतूद करण्यात आलेल्या स्वरुपाचा गुन्हा करीत आहे, असे वाटण्यास वितरण परवानाधारकाजवळ सबळ कारण असेल तेव्हा द्यावयाही भेट वगळून, अधिकृत प्रतिनिधीच्या अन्य भेटीची पूर्व-सूचना, वितरण परवानाधारक ग्राहकाला देईल.

१८.२ ग्राहक, वितरण परवानाधारकाच्या अधिकृत प्रतिनिधीला, मीटरची नोंदणी, तपासणी, चाचणी, स्थापना, मीटर काढून टाकण्यासाठी किंवा बदली मीटर बसविण्यासाठी किंवा जोडणीच्या ठिकाणाचे उर्जीकरण किंवा निर्-उर्जीकरण करण्यासाठी, त्याच्या जागेत प्रवेश करण्यास परवानगी देईल.

**१९ मीटर**

१९.१ <u>मीटरची तपशीलवार वैशिष्ट्ये</u>

अ) प्रत्येक ग्राहक अधिनियमाच्या कलम ५५ खाली प्राधिकरणाने याबाबत तयार केलेल्या विनियमांनुसार अचूक मीटर बसवेल किंवा बसवून धेईल.

परंतु असे की प्रत्येक ग्राहक जो-

(एक) वेळोवेळी सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम २०१४ च्या विनियम ३.१ खाली अनुज्ञेय असलेल्या करारांतर्गत मागणी असणारा ग्राहक, किंवा

(दोन) वेळोवेळी सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम २०१४ च्या विनियम ३.१ खाली अनुज्ञेय असलेल्या करारांतर्गत मागणी असणारी व विजेचा पुरवठा हवा असणारी व जिची जागा वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात असेल अशी व्यक्ती, किंवा

(तीन) वीज निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक असेल व तो,

विशेष एनर्जी मीटर बसवेल किंवा किंवा बसवून घेईल.

१९.२ <u>वीज पुरवठा आणि मीटरचा खर्च</u>

अ) ग्राहक, वितरण परवानाधारकाकडून किंवा केंद्रीय विद्युत प्राधिकरण (मीटर बसविणे व चालविणे ) विनियम २००९ नुसार वितरण परवानाधारकाने यथोचितपणे मान्यता दिलेल्या पुरवठादाराकडून तपशीलवार वैशिष्ट्यांनुसार अचूक मीटर खरेदी करण्याचे ठरवू शकेल;

परंतु असे की, वितरण परवानाधारकाने ठरवून द्यावयाची तपशीलवार वैशिष्ट्ये ही राज्य भार प्रेषण केंद्राच्या ऊर्जा हिशोबासाठी असणा-या आवश्यकतांची पूर्तता करणरी असावीत.

परंतु असे की, वितरण परवानाधारकाच्या देयकसंबंधीच्या आवश्यकतांची पूर्तता करणा-या विशेष ऊर्जा मीटर्सच्या खरेदीसाठी वितरण परवानाढारकाने कमीत कमी दोन मीटर उत्पादकांचा तपशील कळविणे आवश्यक आहे.

परंतु असेही की, ग्राहकाने जर वितरण परवानाधारकाकडून मीटर खरेदी करण्याचे ठरवले तर तो वितरण परवाधारकाकडून असे मीटर, आयोग विद्युत पुरवठा संहितेमध्ये मान्यता देईल त्या किंमतीस, खरेदी करेल.

ब) ग्राहकाने मीटर खरेदी करण्याचे ठरविल्यास ते वगळून अन्य प्रकरणी, वितरण परवानाधारक, अधिनियमाच्या कलम ४७ च्या उप-कलम (१) च्या खंड (बी) नुसार, ग्राहकाला मीटरच्या किंमतीसाठी सुरक्षा अनामत ठेवण्यास सांगू शकेल.

परंतु असे की, कोणत्याही परिस्थितीत सुरक्षा अनामतीची रक्कम मीटरच्या किंमतीपेक्षा जास्त असणार नाही.

परंतु असे की, जेव्हा सुरक्षा अनामत रोखीच्या स्वरूपात असेल तेव्हा, अशा ठेवीवर रिझर्व्ह बँकेच्या बँक दराने व्याज देण्यात येईल.

१९.३ हरवलेले/जळालेले मीटर

१९.३.१ हरवलेल्या मीटरबाबत वितरण परवानाधारकाकडे कोणतीही तक्रार करताना त्यासोबत संबंधित पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या प्रथम माहिती अहवाला (एफ आय आर) ची एक प्रत जोडण्यात येईल.

१९.३.२ नवीन मीटर बसविल्यानंतर आणि मीटरची किंमत व अन्य उपकरणांवरील खर्च आणि वितरण परवानाधारकाचे मान्यताप्राप्त अन्य कोणतेही आकार भरल्यानंतर, जोडणीच्या ठिकाणाचे फेर-ऊर्जीकरण करण्यात येईल.

१९.३.३ ग्राहकाने तक्रार केल्यानंतर किंवा वितरण परवानाधारकाच्या प्राधिकृत प्रतिनिधीच्या पहाणी नंतर, मीटर जळाले असल्याचे आढळून आल्यास, त्याऐवजी दुसरे मीटर देण्यात येईल आणि लवकरात लवकर जोडणीच्या ठिकाणाचे फेर-ऊर्जीकरण करण्यात येईल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक, ग्राहकाकडून मीटरची किंमत वसूल करू शकेल.

१९.३.४ मीटर जळाले किंवा हरवले असल्यास ते वगळून अन्य प्रकरणी, वितरण परवानाधारकाला, या कराराच्या मुदतीत, एकाहून अधिक वेळा मीटरची किंमत वसूल करण्याचा अधिकार असणार नाही.

१९.४ मीटरची चाचणी

१९.४.१ वितरण परवानाधारक मीटरची नियकालिक चाचणी करण्यासाठी जबाबदार राहील.

१९.४.२ ग्राहक, मान्यताप्राप्त चाचणी आकारांचा भरणा करून, वितरण परवानाधारकाला मीटरच्या अचुकतेची चाचणी करण्याची विनंती करु शकेल.

परंतु असे की, ग्राहक वितरण परवानाधारकाला आयोगाने मान्यता दिलेल्या केंद्रात मीटरची चाचणी करण्यास सांगू शकेल.

१९.४.३ वितरण परवानाधारक, ग्राहकाने मीटरची चाचणी करून घेण्याची विनंती केल्याच्या दिनांकापासून दोन (२) महिन्यांच्या कालावधीत, ग्राहकाला मीटर चाचणी अहवालाची एक प्रत देईल.

१९.४.४ मीटरची चाचणी करण्यात आल्यानंतर आणि भारतीय विद्युत नियम, १९५६ मध्ये विहित करण्यात आलेल्या अचुकतेच्या मर्यादेच्या पलिकडे मीटर बिघडले असल्याचे आढळून आल्यास, प्राधिकरणाकडून अधिनियमाच्या कलम ५५ अंतर्गत विनियम विनिर्दिष्ट करण्यात येईपर्यंत, वितरण परवानाधारक ग्राहकाने भरलेले चाचणी आकार परत करेल आणि पुरवठादाराला ग्राहकाच्या देयकात समायोजन करणे शक्य व्हावे यासाठी त्याला चाचणीचे निष्कर्ष कळवेल;

परंतु असे की, देयकात आकारण्यात आलेल्या अशा जादा किंवा कमी रकमेचे समायोजन, वितरण परवानाधारक आणि पुरवठादार यांच्यात, जसे असेल तसे, करण्यात येईल.

## भाग- क - वितरण यंत्रणेचा वापर

२० **वितरण यंत्रणेचा वापर**

२०.१ वितरण परवानाधारक, विजेच्या वहनासाठी वितरण यंत्रणेचा वापर करण्यास, भेदभावरहित पद्धतीने आणि त्याच्या वितरण यंत्रणेच्या अन्य तुलनात्मक उपयोगकर्त्यांना लागू असलेल्या अटींपेक्षा अधिक जाचक नसतील अशा अटींवर, परवानगी देईल.

२०.२ पुरवठादार,वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा वापर अशा रितीने करेल की, ज्यामुळे असा वापर करण्यामुळे खालील बाबींवर त्याचा विपरीत परिणाम होणार नाहीः-

(अ) वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा अन्य उपयोगकर्त्यांकडून होणारा वापर;

(ब) वितरण परवानाधारकाच्या ग्राहकांना करावयाच्या वीज पुरवठ्याचा दर्जा आणि विश्वासार्हता; आणि

(क) अधिनियमाच्या कलम ५३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विनियमांनुसार पुरवठादाराने वितरण परवानाधारकाच्या कामांची आणि कर्मचा-यांच्या सुरक्षिततेची घ्यावयाची काळजी;

२१ **वीज पुरवठ्याचा दर्जा आणि विश्वासार्हता**

२१.१ वितरण परवानाधारक कृतींच्या मानकांनुसार, त्याच्या वितरण यंत्रणेतून होणा-या पुरवठ्याच्या दर्जाच्या आणि विश्वासार्हतेच्या मानकांचे पालन करेल आणि वितरण यंत्रणेशी संबंधित दोषांचे व ग्राहकांच्या अन्य तक्रारींचे निवारण करेल.

२१.२ पुरवठादाराला याची जाणीव असेल की, वितरण यंत्रणेमधील वितरण परवानाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या परिस्थितीचा, वीज पुरवठ्याच्या दर्जा आणि विश्वासार्हतेवर विपरीत परिणाम होऊ शकतो;

परंतु असे की, जेव्हा वितरण यंत्रणेमधील वितरण परवानाधारकाच्या नियंत्रणाधिन असलेल्या परिस्थितीच्या परिणामस्वरूप वीज पुरवठ्यावर विपरीत परिणाम झाला तर, कृतीच्या मानकांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमे इतकी आणि कालावधीत, वितरण परवानाधारक बाधित ग्राहकाला भरपाई देण्यास जबाबदार राहील;

परंतु आणखी असे की, जेथे ग्राहकाला अशी भरपाई देय असेल तेथे, पुरवठादारास बाधित ग्राहकाचा प्रतिनिधी या नात्याने अधी भरपाई मागण्याचा हक्क राहील आणि अशा रितीने वितरण परवानाधारकाकडून प्राप्त झालेल्या भरपाईचा फायदा पुरवठादार, ग्राहकाला त्याच्या वीज पुरवठ्याच्या देयकात, समायोजनाच्या रूपात देईल.

२२ **माहितीचे अदान-प्रदान**

२२.१ वितरण परवानाधारक आणि पुरवठादार, मुक्त प्रवेश ग्राहक आणि त्यांची वितरण यंत्रणेशी जोडणी व तिचा वापर या संबंधात त्यांच्यापैकी एकाकडे असणारी माहिती ते दुस-यास, त्याला अधिनियम, नियम, वितरण मुक्त प्रवेश विनियम किंवा या करारांतील त्यांच्या जबाबदा-या पार पाडणे त्यांना शक्य व्हावे म्हणून आवश्यक माहिती, वेळेवर देण्यासाठी वाजवी प्रयत्न करण्यास, ते सहमत असतील.

परंतु आणखी असे की, या खंडांतर्गत माहितीची तरतूद ही, मागितलेल्या अशा माहितीच्या संदर्भात गोपनियता राखण्याच्या दोन्ही पक्षकारांवर, अधिनियम किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या अंतर्गत असलेल्या, बंधनाच्या अधीन राहून असेल.

२२.२ वितरण परवानाधारक आणि पुरवठादार, यांच्यापैकी एकाने दुस-यास या कराराखाली पुरविलेली सर्व माहिती अचूक व पूर्ण असेल याची खात्री करण्याकरिता आवश्यक त्या वाजवी उपाय-योजना करण्यास, ते सहमत असतील.

२३. **सेवांमधील समन्वय**

२३.१ वितरण परवानाधारक आणि पुरवठादार, या खंड २३ नुसार, ग्राहकाला विजेचा पुरवठा करणे सुकर होण्यासाठी ते त्यांच्या कार्यांत समन्वय राखण्यास सहमत असतील.

२३.२ मीटरच्या नोंदी घेणे

२३.२.१ वितरण परवानाधारक, ग्राहकाच्या मीटरमधील नोंदी दर दोन महिन्यांतून एकदा घेण्यास जबाबदार राहील.

परंतु असे की, वितरण परवानाधारक किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी

मीटरमधील नोंदी घेत असताना पुरवठादाराच्या प्राधिकृत प्रतिनिधीस हजर राहण्याचा हक्क असेल.

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारकाच्या प्राधिकृत प्रतिनिधीस मीटरमधील नोंदी घेण्यासाठी, पहाणीसाठी आणि चाचणीसाठी ग्राहकाच्या जागेत अशा वेळी आणि अशा रितीने प्रवेश करण्याचा हक्क असेल ज्याप्रमाणे वितरण परवानाधारकाला त्याच्या स्वतःच्या ग्राहकांच्या बाबतीत विद्युत पुरवठा संहितेनुसार असतो.

तथापि, जर ग्राहक, ग्राहकाचा प्राधिकृत प्रतिनिधी , निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा पॉवर एक्स्चेंजचा सदस्य, ज्याच्याकडून ग्राहकाचा विजेचा पुरवठा घेण्याचा उद्देश असेल, यांनी जर अंतीम देयकाच्या नोंदी घेताना सहभागी होण्यास जर नकार दिला तर, वितरण परवानाधारकाचा प्रतिनिथी एक लेखी नोटीस दिल्यानंतर, अंतिम मीटरच्या नोंदी घेईल ज्या ग्राहकावर बंधनकारक असतील.

२३.२.२ वितरण परवानाधारक, मीटरमधील नोंदी घेतल्याच्या दिनांकानंतर, दोन (२) दिवसांच्या आत मीटरमधील नोंदणींची माहिती पुरवठादाराला कळवेल.

२३.२.३ सदोष मीटरच्या बाबतीत, केलेल्या चाचणीचे निष्कर्ष पुरवठादारास कळविण्यात येतील ज्यामुळे त्याला ग्राहकाच्या देयकात समायोजन करणे सुकर होईल.

परंतु असे की, अधिनियमातील भाग-बारा आणि भाग-चौदा मधील तरतुदींच्या अधीन राहून, ज्या महिन्यात वाद उद्‌भवला असेल त्या महिन्याच्या आधीच्या महिन्यापासून जास्तीत जास्त तीन (३) महिन्यांच्या कालावधीपर्यंत, केलेल्या चाचण्यांच्या निष्कर्षांना अनुसरुन आणि निर्धारित देयकाच्या सोबत मीटरचा चाचणी अहवाल पाठविण्याच्या अधीन राहून, ग्राहकाच्या देयकात समायोजन करण्यात येईल.

परंतु असे की, मीटरची मोहोर तुटली किंवा तिला हानि पोहोचली असल्यास, मीटरमधील दोषाची किंवा त्यातील अनधिकृत बदलाची तपासणी करण्यात येईल. सदोष मीटरच्या बाबतीत, निर्धारण या खंड २३.२.३ नुसार करणात येईल आणि अनधिकृत बदलांच्या बाबतीत, निर्धारण कलम १२६ किंवा कलम १३५ नुसार, प्रत्येक प्रकरणी त्यातील परिस्थितीवर अवलंबून, करण्यात येईल.

परंतु असे की, मीटरमध्ये नोंदी घेणे थांबले गेले असल्यास, ज्या कालवधीत नोंदी घेणे थांबले गेले असेल त्या कालावधीतील जास्तीत जास्त तीन (३) महिन्यांकारिता, ज्या महिन्याचे देयक तयार करण्यात येत असेल त्या महिन्याच्या मागील बारा (१२) महिन्यात मीटरमध्ये नोंद झालेल्या वीज वापराच्या सरासरीच्या आधारे, ग्राहकाला आकारणी करण्यात येईल.

परंतु असे की, ज्याप्रमाणे विद्युत पुरवठा संहितेनुसार वितरण परवानाधारकाच्या स्वतःच्या ग्राहकांना चाचणी आकर लागू असतील त्याप्रमाणे ग्राहक अथवा पुरवठादार, त्यांनी चाचणी आकारांचा भरणा करण्याच्या अधीन राहून, ते वितरण परवानाधारकास मीटरची चाचणी करण्यास सांगू शकतील.

२३.३ दोष निवारण

वितरण परवानाधारक, पुरवठादाराने ग्राहकाला करावयाच्या विजेच्या पुरवठ्यावर परिणाम करणाऱ्या वितरण यंत्रणेमधील दोषांचे निवारण करण्यासाठी जबाबदार राहील;

२३.३.१ परंतु असे की, कृतीच्या मानकांच्या विनियमानुसार अनुज्ञेय असलेली अपवादात्मक परिस्थिती वगळता, वितरण परवानाधारक, ग्राहकाच्या वीज पुरवठ्यावर परिणाम करणारे वितरण यंत्रणेमधील दोष, आयोगाने कृति-मानकांच्या विनियमांत विहित केलेल्या काल-मर्यादेत दूर करेल.

२३.४ नावात बदल

२३.४.१ ग्राहक नावात बदल करावयाचा अर्ज पुरवठादाराकडे करेल;

परंतु असे की, पुरवठादार अर्ज मिळाल्यावर वितरण परवानाधारकाला अशा नाव बदलण्याच्या अर्जाबाबत तत्काळ कळवेल;

परंतु असे की, अशा अर्जावर वितरण मुक्त प्रवेश विनियमात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रितीने व काल-मर्यादेत कार्यवाही करण्यात येईल.

२३.५ पुरवठा खंडित करणे

२३.५.१ जेव्हा वितरण परवानाधारकाला पुरवठादाराकडून ग्राहकाचा वीजपुरवठा खंडित करण्याची विनंती प्राप्त झाली असेल, तेव्हा अशी विनंती प्राप्त झाल्यानंतर, जितके व्यवहार्य असेल तितके लवकर, परंतु कोणत्याही परिस्थितीत एक (१) आठवड्याच्या आत, वितरण परवानाधारक विद्युतपुरवठा खंडित करेल;

परंतु असे की, पुरवठादार अधिनियमानुसार फक्त प्राधिकृत असलेल्या कारणांसाठी पुरवठा खंडित करण्याची विनंती करु शकेल;

परंतु आणखी असे की, जेथे अधिनियमानुसार प्राधिकृत नसलेल्या कारणासाठी वीज पुरवठा खंडित करण्याची विनंती पुरवठादाराने केली असेल तेथे पुरवठादार, विनंतीची अंमलबजावणी केल्यामुळे वितरण परवानाधारकाला झालेल्या कोणत्याही तोटा किंवा नुकसानीची वितरण परवानाधारकाला क्षतिपूर्ती करेल.

२३.६ तपासणी व निर्धारण

२३.६.१ जेथे पुरवठादाराजवळ, या अधिनियमाच्या भाग १२ किंवा भाग १४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा गुन्हा वीज पुरवठ्याच्या जागेवर, विजेचा पुरवठा करण्यात येत असताना, घडत असल्याबाबत विश्वास ठेवण्यास सबळ कारण असेल तेथे तो वितरण परवानाधारकाला त्याबाबत तत्काळ कळवेल.

२३.६.२ या करारात काहीही नमूद करण्यात आले असले तरी जेथे वितरण परवानाधारकाजवळ या अधिनियमाच्या भाग १२ किंवा भाग १४ मध्ये तरतूद केलेल्या स्वरूपाचा वीज पुरवठ्याच्या जागेवर, विजेचा पुरवठा करण्यात येत असताना, गुन्हा घडत असल्याबाबत विश्वास ठेवण्यास सबळ कारण असेल तेथे वितरण परवानाधारक अधिनियम, त्याखालील नियम व विनियम यांना अनुसरुन त्यास आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करेल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक अशी उपाययोजना करण्यापूर्वी पुरवठादाराला अशा कथित गुन्ह्याबद्दल व प्रस्तावित उपाययोजनेबाबत कळविण्याचा प्रयत्न करेल आणि अशी उपाययोजना केल्यानंतर मात्र, कोणत्याही परिस्थितीत, पुरवठादाराला त्वरित कळवेल.

**२४ सेवांसाठी रक्कम अदा करणे**

२४.१ देयके तयार करणे

२४.१.१ या करारानुसार पुरविलेल्या सेवांकरिता वितरण परवानाधारक पुरवठादार/ग्राहकाला मासिक तत्त्वावर देयक पाठवेल. दर महिन्याच्या दहा (१०) व्या दिवसापर्यंत मागील महिन्याकरिता देय आकारांची देयके पाठविण्यात येतील.

२४.१.२ पुरवठादार/ग्राहक अशा आकारांचा भरणा विद्युत पुरवठा संहितेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत करेल.

२४.१.३ पुरवठादार/ग्राहक, वेळोवेळी सुधारणा केलेल्या वितरण मुक्त प्रवेश विनियम,२०१४ नुसार आकारांचा भरणा करतील.

२४.२ रकमा भरणा करण्याची जबाबदारी

२४.२.१ अधिनियम, वितरण मुक्त प्रवेश विनियम आणि या करारानुसार वितरण परवानाधारकाने पाठविलेल्या देयकातील आकारांचा भरणा, जरी त्यांची वसुली पुरवठा करारांतर्गत ग्राहकाकडून केली गेली असली किंवा नसली तरीदेखील. करण्याची जबाबदारी पुरवठादार/ग्राहकावर राहील.

२४.३ आकार भरणा विलंब

२४.३.१ आकारांचा भरणा करण्यात कोणताही विलंब झाल्यास त्यासाठी दरमहा १.२५ टक्के इतका विलंब भरणा अधिभार द्यावा लागेल.

२४.३.२ वरील असंतुलन आकार अदा करण्यात जर दोन दिवसांपेक्षा अधिक विलंब, म्हणजेच विवरणपत्र निर्गमित करण्याच्या दिनांकापासून बारा (१२) दिवसांपेक्षा जास्त, झाला तर कसुरदार, पक्षकाराला ०.०४ टक्के या दराने विलंबाच्या प्रत्येक दिवसाकरिता सरळ व्याज द्यावे लागेल. व्याजाची ही वसूल केलेली रक्कम, ज्या व्यक्तीला ही रक्कम मिळावयाची होती व जी अदा करण्यास विलंब झाला, त्या व्यक्तील अदा करण्यात येईल. रक्कम अदा करण्यास सातत्याने, जर काही, विलंब झाला तर तसे, राज्य भार प्रेषण केंद्राकडून आयोगाला, सुधारणात्मक कारवाई सुरू करण्यासाठी, कळविण्यात येईल.

**२५ सुरक्षा अनामत**

२५.१ वरील खंड २४.१ नुसार वितरण परवानाधारकाला, वहन आकार, क्रॉस सबसिडी अधिभार आणि वहन आकारांवरील अतिरिक्त अधिभार यांच्या एक महिन्याच्या देयकाच्या रकमेइतकी सुरक्षा अनामत घेण्याचा हक्क राहील.

२५.२ जेथे सुरक्षा अनामत ही या कराराच्या सुरूवातीलाच घेणे आवश्यक असेल तेथे तिची परिगणना, वितरण यंत्रणेचा विजेच्या वहनासाठी होणाऱ्या अंदाजे वापराच्या आधारे करण्यात येईल;

परंतु असे की, जेव्हा अतिरिक्त सुरक्षा अनामत घेण्यची गरज भासेल किंवा शिल्लक सुरक्षा अनामतीची रक्कम दोन्ही परवानाधारकांकडील शिलकीच्या १० टक्क्यांपेक्षा अधिक असेल तेव्हा सुरक्षा अनामतीच्या रकमेचे समायोजन करण्यात येईल.

२५.३ अधिनियम, वितरण मुक्त प्रवेश विनियम आणि या करारानुसार, वितरण परवानाधारकाला पुरवठादाराकडून, वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा वापर करून वहन केलेल्या विजेवरील एक (१) महिन्याच्या पुरवठ्याच्या खर्चाइतकी सुरक्षा अनामत घ्यावयाचाही हक्क राहील;

परंतु असे की, अशी सुरक्षा अनामत ही, पुरवठादार दिवाळखोर, नादार झाल्याने किंवा अन्य कोणत्याही कारणांमुळे अकल्पितपणे पुरवठादाराने वीज पुरवठा खंडित किंवा समाप्त केल्यास, अशा पुरवठादाराच्या ग्राहकांना विजेचा पुरवठा करणे वितरण परवानाधारकाला शक्य व्हावे यासाठी असेल;

परंतु असे की, पुरवठादाराने वीजपुरवठा अकल्पितपणे खंडित किंवा समाप्त केल्यास, वितरण परवानाधारक मुक्त प्रवेश ग्राहकांच्या भाराची गरज मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून भागविण्यासाठी, सुरक्षा अनामत संपेपर्यंत किंवा पुरवठ्याची पर्यायी व्यवस्था होईपर्यंत, यापैकी जे आधी होईल तोपर्यंत, विजेचा स्टॅन्ड-बाय पुरवठा करेल. स्टॅन्ड-बाय पुरवठ्यासाठी आकारणी आणि हिशोबपूर्ती वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या वितरण मुक्त प्रवेशाच्या विनियमांमधील तरतुदींनुसार करण्यात येईल.

२५.४ पुरवठादाराच्या इच्छेप्रमाणे सुरक्षा अनामतीची रक्कम रोख (चेक व बँक ड्राफ्ट यासह) अपरिवर्तनीय पत-पत्र किंवा शेड्यूल्ड कमर्शियल बँकेने दिलेल्या बिनशर्त हमीच्या स्वरूपात असेल;

परंतु असे की, सुरक्षा अनामत ही रोख रकमेच्या स्वरुपात असल्यास त्यावर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या बँक दरानुसार व्याज देण्यात येईल;

परंतु असेही की, सुरक्षा अनामत, वितरण परवानाधारकाकडून नोटीस मिळाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत, जमा करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| ग्राहकाचे<br>नावे व सही | वितरण परवानाधारकाच<br>नाव व सही | पुरवठादाराचे<br>नाव व सही |

## जोडपत्र — ३

## अल्प-कालीन प्रवेशासाठी नमुने

### नमुना - अ.का.-१

**अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी अर्ज**

**(अल्प-कालीन मुक्त प्रवेश अर्जदाराने सादर करावयाचा अर्ज)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ग्राहक अर्ज क्र.: | | दिनांकः | |
| २ | अर्जदाराचे नाव | | | |
| ३ | ग्राहक क्र.: | | विद्यमान पुरावठादार (असल्यास): | |
| ४ | मीटर क्र. | | जोडणी प्रकारः | |
| ५ | पत्रव्यवहाराचा पत्ताः | | | |
| | दूरध्वनी क्रः | (कार्यालयीन) | (निवासी): | (फॅक्स): |
| | ई-मेल आयडीः | | | मोबाइल क्र. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | कराराचा तपशीलः [करार/ सामंजस्य कराराचा (एमओयू) तपशील ] | | | | | | |
| | अर्जदाराचा प्रकार | खरेदीदार/विक्रेता/व्यापारी/स्व-वापरासाठी वीज निर्माता/ नूतनशील ऊर्जा निर्माता | | | | | |
| | कोणाबरोबर | क्रमांक | दिनांक | पर्यंत वैध | करारातील क्षमता (मेवॉ) | अन्य स्रोताबरोबर करार केला असल्यास त्यातील क्षमता (मेवॉ) | मुक्त प्रवेशासाठी अर्जात मागणी केलेल्या दिवसांची संख्या |
| | खरेदीदार | | | | | | |
| | विक्रेता | | | | | | |
| | पॉवर एक्स्चेंज | | | | | | |
| ७ | समन्वयकाचा तपशील | | | | | | |
| | नाव आणि पदनामः | | | | | | |
| | दूरध्वनी क्रः | (कार्यालयीन) | (फॅक्स) | मोबाईल | | | |
| | ई-मेल आयडीः | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | अर्जात मागणी केलेली क्षमता | | | | |
| | कालावधी (दिवसात) | | कालावधी (वेळेत) | | क्षमता (मेगावॅट) |
| | (दिनांक)पासून | (दिनांक) पर्यत | तास (पासून) | तास (पर्यंत) | |
| | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | पीपीए / पीएसए / एमओयु चा तपशील | पीपीए/पीएसए/ एमओयूचा दिनांक | वैध कालावधी | | क्षमता |
| | पक्षकारांचे नाव आणि पत्ता | | प्रारंभ | समाप्ती | मेगावॅट |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विक्रेता | खरेदीदार | | | | |
| | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| १० | विजेचे अंतःक्षेपण करणाऱ्या कंपनीचा तपशील | |
| | नावः | |
| | विजेचे अंतःक्षेपण करण्याचे ठिकाणः | |
| | संबंधित वितरण कंपनी/परवानाधारकाचे नावः | |
| | तपशील (सर्वात जवळच्या उप-केंद्राकडे जाण्याचा मार्ग): | |
| | मीटर क्रः | |
| ११ | वीज खेचणा-या कंपनीचा तपशील | |
| | नावः | |
| | वीज खेचण्याचे ठिकाणः | |
| | संबंधित वितरण कंपनी/परवानाधारकाचे नाव : | |
| | तपशील (सर्वात जवळच्या उप-केंद्राकडे जाण्याचा मार्ग): | |
| | मीटर क्र.: | |
| १२ | वीज व्यापाऱ्याचे (असल्यास) नाव : | |
| १३ | अर्जाची फी भरणा केल्याचा तपशीलः | |

(**टीप.**---स्वतःसाठी वीज वापर असल्यास, भांडवल रचनेचा तपशील आणि आणि विद्युत अधिनियम, २००३ सह विद्युत नियम, २००५ मधील आवश्यकतांची पूर्तता केली असल्याबाबत सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र देण्यात यावे )

१४. येथे असे प्रमाणित करण्यात येते की,--

(अ) या व्यवहारातील सर्व कंपन्या (खरेदीदार, विक्रेता आणि व्यापारी यांच्यासह), वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ आणि/किंवा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४, जसे असेल तसे, यामधील तरतुदींचे पालन करतील.

(ब) मुक्त प्रवेश क्षमतेचे वाटप करण्यात आल्यास, राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दरामधील तरतुदींनुसार, 'डे-अहेड' काल व परिमाण निर्धारणाकरिता, या अर्जाची छाननी करण्यासाठी मी राज्य भार प्रेषण केंद्राला प्राधिकृत करतो.

(क) अर्जदार याद्वारे राज्य भार प्रेषण केंद्राला, -------------- (वितरण परवानाधारकाचे नाव) सर्व काळ नुकसान भरपाई देण्याची हमी देतो व राज्य भार प्रेषण केंद्राला आणि -------------- (वितरण परवानाधारकाचे नाव,) या मान्यतेखालील सर्व व्यवहारांच्या संबंधात कोणतेही नुकसान, हानी, दावे आणि कारवाई उद्‌भवल्यास त्यापासून त्याला नुकसानभरपाई देण्याची, बचाव, रक्षण करण्याची हमी देतो.

(ड) अर्जदार येथे मान्य करतो की तो, पॉवर एक्स्चेंजमधील आणि वीज व्यापाऱ्यांकडील एकूण बोली, मंजूर करण्यात आलेल्या परिमाणापेक्षा, अधिक राहणार नाहीत याची काळजी घेईल.

(इ) मे. --------------------- (राज्यांतर्गत विजेचा व्यापारी असल्यास त्याचे येथे नाव लिहावे) यांच्याकडे राज्यांतर्गत विजेच्या व्यापारासाठी वैध परवाना (संदर्भ क्र.----------- ने ------------- यांनी दिलेला आणि ------- पर्यंत वैध असलेला) आहे आणि तो वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ चे पालन करेल.

(फ) मे. --------------------- (आंतरराज्य विजेचा व्यापारी असल्यास त्याचे येथे नाव लिहावे) यांच्याकडे आंतरराज्य विजेच्या व्यापारासाठी वैध परवाना (संदर्भ क्र.----------- ने ------------- यांनी दिलेला आणि ------- पर्यंत वैध असलेला) आहे आणि तो वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह केंद्रीय विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना मंजूर करण्यासाठी अटी व शर्ती, कार्यपद्धती आणि अन्य संबंधित बाबी) विनियम, २००९ चे पालन करेल.

१५. राज्य भार प्रेषण केंद्राने निर्गमित केलेल्या 'अल्प-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्त्यांसाठी पारेषण क्षमता राखीव ठेवण्याच्या कार्यपद्धती'मधील तरतुदींना याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

स्वाक्षरी -

ठिकाणः नाव आणि पदनाम

दिनांकः

**जोडपत्रे :**

(एक) ------------ द्वारे विना-परताव्याचे अर्ज शुल्क

(दोन) करारातील विजेची मागणी, व्यवहाराचा कालावधी, विजेचे अंतःक्षेपण करण्याची आणि वीज खेचण्याची ठिकाणे, इ. बाबी नमूद करण्यात आलेल्या व्यवहाराशी संबंधित पक्षकारांमध्ये (खरेदीदार आणि विक्रेते) करण्यात आलेल्या पीपीए/पीएसए/सामंजस्य कराराची (एमओयु ) स्वप्रमाणित प्रत

| **वितरण परवानाधारकाच्या वापरासाठी (अर्जदाराने सादर केलेल्या अर्जाच्या संदर्भात)** | |
|---|---|
| वितरण परवाधारकाचा संदर्भ क्र.: | दिनांक : |
| वितरण परवानाधारकाच्या मंजुरी/नकाराचा क्र. | |
| शेरे (नकाराची कारणे नमूद करावीत) | |

(वितरण परवानाधारक नकाराच्या कारणाच्या पुष्ट्यर्थ प्रत्येक पानावर यथोचितपणे स्वाक्षरी केलेली कागदपत्रे देखील सोबत जोडेल )

अर्जास मंजूरी देण्यात आल्यानंतर, वितरण परवानाधारक राज्य भार प्रेषण केंद्राकडे सर्व दस्तावेज मुक्त प्रवेशाचे शेड्युलिंग करण्यासाठी पाठवेल -

| **राज्य भार प्रेषण केंद्राच्या वापरासाठी (अर्जदाराने सादर केलेल्या अर्जाच्या संदर्भात)** | |
|---|---|
| राज्य भार प्रेषण केंद्राचा संदर्भ क्र. | दिनांक : |
| राज्य भार प्रेषण केंद्राची मंजुरी/नकाराचा क्र. | |
| शेरे (नकाराची कारणे नमूद करावीत) | |

(राज्य भार प्रेषण केंद्र नकाराच्या कारणाच्या पुष्ट्यर्थ प्रत्येक पानावर यथोचितपणे स्वाक्षरी केलेली कागदपत्रे देखील सोबत जोडेल )

*अल्प-कालीन प्रवेशासाठी नमुने*

**पोच-पावती**

*(फक्त कार्यालयीन वापरासाठी)*

**अल्प-कालीन मुक्त प्रवेश मंजुरीसाठी अर्ज**

(अ) < ***ग्राहकाने भरावयाची माहिती*** >

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ग्राहक अर्ज क्रमांक | | दिनांक | |
| २ | व्यवहाराचा कालावधी | | | |
| ३ | ग्राहकाचा प्रकार***** | *विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ विजेचा व्यापारी (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)* | | |

<*****वीज हस्तांतरणाच्या संदर्भात >

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ग्राहकाचे नाव | | | |
| ५ | नोंदणी संकेतांक | | पर्यंत वैध | |

**< वितरण परवानाधारकाकडून देण्यात आल्याप्रमाणे नोंदणी संकेतांक असेल >**

(ब) < ***वितरण परवानाधारकाने भरावयाची माहिती*** >

| | |
|---|---|
| अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक व वेळ | |

ठिकाण : स्वाक्षरी

(स्टॅम्पसह)

दिनांक : (नाव आणि पदनाम)

**<u>पोच-पावती</u>**

(यथोचितपणे भरलेला अर्ज प्राप्त झाल्यानंतर वितरण परवानाधारकाने ग्राहकाला ताबडतोब द्यावयाची पावती)

**अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी अर्ज**

**(अ) < *ग्राहकाने भरावयाची माहिती* >**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ग्राहक अर्ज क्रमांक | | दिनांक | |
| २ | व्यवहाराचा कालावधी | | | |
| ३ | ग्राहकाचा प्रकार* | *विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ विजेचा व्यापारी (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)* | | |

<*****वीज हस्तांतरणाच्या संदर्भात >

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ग्राहकाचे नाव | | | |
| ५ | नोंदणी संकेतांक | | पर्यंत वैध | |

**< वितरण परवानाधारकाकडून देण्यात आल्याप्रमाणे नोंदणी संकेतांक असेल >**

**(ब) < *वितरण परवानाधरकाने भरावयाची माहिती* >**

| | |
|---|---|
| अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक व वेळ | |

ठिकाण : स्वाक्षरी

(स्टॅम्पसह)

दिनांक : (नाव आणि पदनाम)

**वि. सू.: ही प्रति-पावती खोडून टाकावी व ग्राहकाला देण्यात यावी.**

**अल्प-कालीन प्रवेशासाठी नमुने**

**<u>नमुना - अ.का.२</u>**

**अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी मंजुरी**

***(वितरण परवानाधारकाने द्यावयाची )***

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **वितरण परवानाधारकाचा मंजुरी क्र.** | **/(सुधारणा-०)** | **दिनांक** | |

**<सुधारणा-० म्हणजे मूळ मंजुरी सुधारणा क्र.- शून्य सह>**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ग्राहक अर्ज क्रमांक | *(नमुना-अ.का. १ मध्ये ग्राहकाने दिल्याप्रमाणे)* | दिनांक | |
| २ | व्यवहाराचा कालावधी | | | |
| ३ | ग्राहकाचा प्रकार* | *विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ विजेचा व्यापारी (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)* | | |

<* *वीज हस्तांतरणाच्या संदर्भात*>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ग्राहकाचे नाव | | | |
| ५ | नोंदणी संकेतांक | | पर्यंत वैध | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | वितरण यंत्रणेशी व्यवहार करणाऱ्या विद्युत कंपनीचा तपशील | | |
| | | वीज अंतःक्षेपण करणारी कंपनी | वीज खेचणारी कंपनी |
| | विद्युत कंपनीचे नाव | | |
| | विद्युत कंपनीचा दर्जा * | | |
| | ज्या कंपनीत ती समाविष्ट आहेत ती विद्युत कंपनी | | |

<*मालकीच्या संदर्भात- राज्य कंपनी/स्व-वापरासाठीचा वीज निर्माता/स्वतंत्र वीज निर्माता/आंतरराज्य वीज निर्मिती केंद्रे (आय एस जी एस)/ वितरण कंपनी/ग्राहक/ अन्य कोणी असल्यास, विनिर्दिष्ट करणे >

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | वितरण यंत्रणेशी वीज अंतःक्षेपण/खेचणा-या जोडणीचा तपशील | | | |
| | | | वीज अंतःक्षेपण करणारी कंपनी | वीज खेचणारी कंपनी |
| | उप-केंद्राचे नाव | पारेषण | | |
| | | वितरण | | |
| | व्होल्टेजची पातळी | पारेषण | | |
| | | वितरण | | |
| | परवानाधारकाचे नाव (उप-केंद्राचा मालक) | | | |
| | मध्यस्थ राज्यांतर्गत परवानाधारक | | | |
| | मध्यस्थ आंतरराज्य परवानाधारक | | | |

< वितरण परवानाधारक, आवश्यकता असल्यास, इंटरफेस सीमा त्याच्या जोडणीयतेचे ठिकाण मानू शकेल >

| ८ | मुक्त प्रवेश मंजूर केलेला कालावधी (दि.---------- पासून ते दि.------------- पर्यंत) | | | | | सुधारणा क्र. | | ० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महिना | दिनांक | | तास | | क्षमता (मेगावॅटमध्ये) | | मेगावॅट तास |
| | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत | अर्जात मागितलेली | वाटप केलेली | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | एकूण मेगावॅट तास | | |

| ९ | बोलीचा तपशील *(फक्त बोली असल्यास)* | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | राज्यांतर्गत यंत्रणेचा तपशील | दिनांक | | तास | | लागू असलेला दर (रु./युनिट) |
| | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत | |
| | पारेषण यंत्रणा | | | | | |
| | वितरण यंत्रणा | | | | | |

१० वेळोवेळी सुधारणा केलेल्या आणि लागू असलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ आणि अशा अन्य कोणताही संबंधित विनियम / आदेश / संहितेमधील तरतुदींच्या अधीन सदर मंजुरी राहील < फक्त प्रकरण मंजूर केले असल्यास>

११ ------------------------------------------------------ मुळे प्रकरण नामंजूर करण्यात येत आहे.
*< फक्त प्रकरण नामंजूर केले असल्यास >*

< वितरण परवानाधारक मुक्त प्रवेश नामंजूर करण्यात आला असल्यास विशिष्ट कारण कळवेल आणि त्याच्या पुष्ट्यर्थ असलेली व प्रत्येक पानावर यथोचितपणे स्वाक्षरी केलेली कागदपत्रे सोबत जोडू शकेल>

---

ठिकाणः स्वाक्षरी (स्टॅम्पसह)

दिनांकः (नाव आणि पदनाम)

<u>जोडपत्रेः</u>

१) रकमा भरणा करण्याचे वेळापत्रक < फक्त प्रकरण मंजूर केले असल्यास>

२) अन्य, काही असल्यास

<u>जोडपत्रांसह प्रत रवाना</u>

१) ग्राहक

२) व्यवहाराशी संबंधित पारेषण उप केंद्राचे कार्यालयीन प्रमुख

३) व्यवहाराशी संबंधित वितरण उप केंद्राचे कार्यालयीन प्रमुख

४) संबंधित अन्य कोणीही

अल्पकालीन प्रवेशासाठी नमुने

नमुना - अ.का. २ चे जोडपत्र

## रकमा भरणा करण्याचे वेळापत्रक

*(वितरण परवानाधारकाने दर महिन्यास नमुना - अ.का. २ बरोबर जोडावयाचे)*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वितरण परवानाधारकाचा मंजुरी क्र. | /(सुधारणा-०) | दिनांक | |

< सुधारणा-० म्हणजे मूळ मंजुरी सुधारणा क्र.- शून्य सह>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ग्राहक अर्ज क्रमांक | *(नमुना-अ.का. १ मध्ये ग्राहकाने दिल्याप्रमाणे)* | दिनांक | |
| २ | व्यवहाराचा कालावधी | | | |
| ३ | ग्राहकाचा प्रकार* | *विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ विजेचा व्यापारी (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)* | | |

*<* वीज हस्तांतरणाच्या संदर्भात >*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ग्राहकाचे नाव | | | |
| ५ | नोंदणी संकेतांक | | पर्यंत वैध | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | अल्पकालीन तात्पुरत्या* मुक्त प्रवेश आकारांचा मासिक भरणा करावयाचे वेळपत्रक (कालावधीः *दि. पासून दि. पर्यंत*) | | महिना | |
| | खालील बाबींसाठी आकारणीयोग्य रक्कम | दर (रु./युनिट) | मेगावॅट तास | एकूण (रु.) |
| | १) राज्यांतर्गत जाळे | | | |
| | अ) पारेषण आकार | | | |
| | संबंधित पारेषण परवानाधारक | | | |
| | मध्यस्थ राज्यांतर्गत परवानाधारक (असल्यास) | | | |
| | | | | |
| | ब) वहन आकार | | | |
| | संबंधित वितरण परवानाधारक | | | |
| | मध्यस्थ राज्यांतर्गत परवानाधारक (असल्यास) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | क) अधिभार | | | |
| | संबंधित वितरण परवानाधारक | | | |
| | | | | |
| | ड) अतिरिक्त अधिभार | | | |
| | संबंधित वितरण परवानाधारक | | | |
| | | | | |
| | इ)राज्य भार प्रेषण केंद्र आकार | | | |
| | राज्य भार प्रेषण केंद्र | | | |
| | | | | |
| | २) आंतरराज्य जाळे | | | |
| | पारेषण आकार | | | |
| | मध्यस्थ आंतरराज्य परवानाधारक (असल्यास) | | | |
| | | | | |
| | भरणा करावयाची एकूण मासिक रक्कम (रु.) | | | |

ठिकाणः स्वाक्षरी

(स्टॅम्पसह)

दिनांकः (नाव आणि पदनाम)

* तात्पुरती रक्कम ही अर्जात उल्लेख केलेल्या मेगावॅट तासांच्या आधारे असेल, जी प्रत्यक्ष वापरानुसार बदलू शकेल.

<u>अल्पकालीन प्रवेशासाठी नमुने</u>

<u>नमुना - अ.का. ३</u>

## (विद्युत) अतिभाराची माहिती आणि बोलीसाठी आमंत्रण

*(राज्य भार प्रेषण केंद्राने पाठवावयाचे आमंत्रण )*

राज्य भार प्रेषण केंद्राचा बोली आमंत्रण क्र. --------- दिनांक ------

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ग्राहक अर्ज क्रमांक | *(नमुना- अ.का.१ मध्ये ग्राहकाने दिल्याप्रमाणे)* | दिनांक | |
| २ | व्यवहाराचा कालावधी | | | |
| ३ | ग्राहकाचा प्रकार* | *विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ विजेचा व्यापारी (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)* | | |

<* *वीज हस्तांतरणाच्या संदर्भात* >

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ग्राहकाचे नाव | | | |
| ५ | नोंदणी संकेतांक | | पर्यंत वैध | |

६ अपेक्षित अतिभार ( रोहित्र आणि विद्युत वाहिनी/लिंक) खालीलप्रमाणे आहे:--

| नेटवर्क कॉरिडॉर | | अतिभाराचा कालावधी | | | | उपलब्ध मार्जिन / क्षमता | सर्व ग्राहकांनी अर्जात मागणी केलेली एकूण क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उप केंद्र रोहित्राच्या क्षमतेसह | विद्युत वाहिनी/ लिंक क्षमतेसह | दिनांक | | तास | | | |
| | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत | मेगावॉट | मेगावॉट |
| राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| राज्यांतर्गत वितरण यंत्रणा | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| आंतरराज्य पारेषण यंत्रणा | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

७. उपरोल्लेखित बाबी विचारात घेऊन नमुना- अ.का. ४ मध्ये बोली सादर करावी. बोलीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) बोलीच्या आमंत्रणाचा दिनांक | | वेळ | |
| (ब) बोली सादर करण्याचा दिनांक | | वेळ | |
| (क) बोली उघडण्याचा दिनांक | | वेळ | |
| (ड) बोली कशासाठी मागविण्यात आली आहे | | | |

<table>
<tr><th colspan="2">राज्यांतर्गत नेटवर्क कॉरिडॉर</th><th colspan="4">अतिभाराचा कालावधी</th><th rowspan="2">बोलीसाठी उपलब्ध मार्जिन / क्षमता</th><th rowspan="2">किमान किंमत</th></tr>
<tr><th rowspan="2">उप-केंद्र</th><th rowspan="2">विद्युत वाहिनी/ लिंक</th><th colspan="2">दिनांक</th><th colspan="2">तास</th></tr>
<tr><th>पासून</th><th>पर्यंत</th><th>पासून</th><th>पर्यंत</th><th>मेगावॉट</th><th>रुपये/युनिट</th></tr>
<tr><td colspan="2">पारेषण यंत्रणेचे नाव</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="2">वितरण यंत्रणेचे नाव</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

८. जर बोली सादर करण्यात आली नाही तर, अर्ज मागे घेण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येणार नाही.

ठिकाणः स्वाक्षरी

(स्टॅम्प सह)

दिनांकः नाव आणि पदनाम

प्रतिः ग्राहक- (नमुना-अ.का. १ मधील अनु क्र. १ मध्ये ग्राहकांनी दिलेल्या) त्यांच्या संदर्भासह

*अल्पकालीन प्रवेशासाठी नमने*

<u>नमुना - अ.का. ४</u>

**बोलीसाठी प्रस्ताव**

(ग्राहकाने राज्य भार प्रेषण केंद्राला सादर करावयाचा)

**संदर्भः राज्य भार प्रेषण केंद्राचा बोली आमंत्रण क्र. दिनांक -**

**प्रतिः राज्य भार प्रेषण केंद्र,**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ग्राहक अर्ज क्रमांक | *<नमुना- अ.का.१ मध्ये ग्राहकाने दिल्याप्रमाणे>* | दिनांक | |
| २ | व्यवहाराचा कालावधी | | | |
| ३ | ग्राहकाचा प्रकार* | *< विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ विजेचा व्यापारी (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)* | | |

*<* वीज हस्तांतरणाच्या संदर्भात >*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ग्राहकाचे नाव | | | |
| ५ | नोंदणी संकेतांक | | पर्यंत वैध | |

६. वरील बोली आमंत्रणाच्या संदर्भात, मी माझी बोली खालीलप्रमाणे सादर करीत आहे :---

| | राज्य भार प्रेषण केंद्राने दिलेला बोलीचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्यांतर्गत नेटवर्क कॉरिडॉर | | अतिभाराचा कालावधी | | | | बोलीसाठी उपलब्ध मार्जिन / क्षमता | किमान किंमत | बोलीदाराने नमूद करावयाची किमान किंमत |
| उप-केंद्र | विद्युत वाहिनी / लिंक | दिनांक | | तास | | | | |
| | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत | मेगावॉट | पैसे/युनिट | पैसे/युनिट * |
| पारेषण यंत्रणेचे नाव | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| वितरण यंत्रणेचे नाव | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

< * बोलीदार किंमत ( पूर्णांक संख्येत) किमान किंमतीच्या संदर्भात नमूद करतील >

**७. मी याद्वारे मान्य करतो की, निश्चित केलेली बोलीची किंमत वहन आकार असतील.**

**ठिकाण :** **स्वाक्षरी**

**(स्टॅम्पसह)**

**दिनांक :** **(नाव आणि पदनाम)**

**जोडपत्र-४**

## दीर्घ-कालीन/मध्यम कालीन मुक्त प्रवेशासाठी नमुना अर्ज

**(मुक्त प्रवेश अर्जदाराने सादर करावयाचा)**

**अर्ज क्र.:** **दिनांक:**

**१ अर्जदाराचे नाव :**

**२ पत्रव्यवहाराचा पत्ता :**

**दूरध्वनी क्र. <  > फॅक्स क्र. <  > ई-मेल <  >**

**३ अर्जदाराचा प्रकारः (खरेदीदार/विक्रेता/व्यापारी/स्व-वापरासाठीचा निर्माता)**

**४ करार/एमओयु/संमती पत्राचा तपशीलः-**

| सह | संदर्भ क्र. | दिनांक | पर्यंत वैध | कमाल मागणी (मेगावॉट) |
|---|---|---|---|---|
| खरेदीदार | | | | |
| विक्रेता | | | | |

**५ समन्वयकाचा तपशील :-**

| | | |
|---|---|---|
| नाव | | |
| पदनाम | | |
| दूरध्वनी क्रमांक | (कार्या) : | (निवास) |
| | (फॅक्स) : | (मोबाईल) |
| | ई-मेल आयडीः | |

**६ मुक्त प्रवेशाचा प्रकारः (स्व-वापरासाठीचा वीज निर्माता किंवा अन्य पक्षकार)**

(स्वतःसाठी वीज वापर असल्यास, भांडवल रचनेचा तपशील आणि आणि विद्युत अधिनियम, २००३ सह विद्युत नियम, २००५ मधील आवश्यकतांची पूर्तता केली असल्याबाबत सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र देण्यात यावे )

**७ वीज हस्तांतरण गरजेचा तपशील**

१ पारेषण करावयाच्या विजेचे परिमाण (मेगावॉट)

२ हस्तांतरित करावयाचा सर्वोच्च भार (मेगावॉट)

३ हस्तांतरित करावयाचा सरासरी भार (मेगावॉट)

**८ मुक्त प्रवेश सुरू होण्याचा अपेक्षित दिनांकः**

**९ मुक्त प्रवेश हवा असलेला कालावधीः**

| कालावधी | | वेळ | | क्षमता (मेगावॉट) |
|---|---|---|---|---|
| दिनांकापासून | दिनांकापर्यंत | तासापासून | तासापर्यंत | |
| | | | | |
| | | | | |

**१० अंतःक्षेपणाच्या ठिकाणाचा तपशील:**

| | | |
|---|---|---|
| वीज अंतःक्षेपण करणा-या विद्युत कंपनी/व्यक्ती किंवा संस्था (पक्ष) /वीज निर्मिती केंद्राचे नांव | | |
| प्रकार आणि निर्मिती क्षमता | | |
| व्होल्टेज पातळी | | |
| वीज अंतःक्षेपणाचे ठिकाण (उप-केंद्राचे नाव – वितरण/पारेषण परवानाधारक) | | |
| ज्याच्या क्षेत्रात स्थित असेल त्या ठिकाणाचे आणि वितरण कंपनीचे नाव | | |
| मीटरींग व्यवस्था<br>मीटरचा तपशील | | |
| अ. | अचुकतेचा दर्जा | |
| ब. | दिवसातील (दोन) वेळांमधील मध्यावधी (टाईम ऑफ डे इंटरव्हल) | |
| क. | मापदंड | |
| एक | | |
| दोन | | |
| तीन | | |
| चार | | |

**११. वीज खेचण्याच्या ठिकाणाचा तपशील (वीज खेचणा-या कंपनी/ग्राहकाचा तपशील):**

| | |
|---|---|
| उपयोगकर्त्याचे नाव | |
| बहिर्गमनाचे ठिकाण | |
| व्होल्टेजची पातळी | |
| बहिर्गमनाच्या ठिकाणासाठी वीज पुरवठ्याचा स्रोत (उपकेंद्र-वितरण कंपनीचे नाव/ मविनिआ) | |
| ज्याच्या क्षेत्रात स्थित असेल त्या ठिकाणाचे आणि वितरण कंपनीचे नाव | |
| मीटरींग व्यवस्था<br>मीटरचा तपशील | |

| | | |
|---|---|---|
| अ. | अचुकतेचा दर्जा | |
| ब. | दिवसातील (दोन) वेळांमधील मध्यावधी- (टी डी इंटरव्हल) | |
| क. | मापदंड | |
| एक. | | |
| दोन. | | |
| तीन. | | |
| चार. | | |

**१२. बहिर्गमनाच्या ठिकाणचा ग्राहक वितरण परवानाधारकाचा विद्यमान ग्राहक आहे का? (होय किंवा नाही)**

(उत्तर होय असल्यास, ग्राहक क्रमांक, करार केलेली कमाल मागणी, वर्गवारी, मुक्त प्रवेश अंशतः भारासाठी किंवा पूर्ण भारासाठी आहे, याची माहिती देणे)

**१३. वीज खरेदीचा करार (पीपीए)/ कंत्राट आणि सामंजस्य करार (एम ओ यू) चा तपशील**

एक. अंतःक्षेपण करण्यासाठी लागणाऱ्या विजेकरिता

दोन. खेचण्यासाठी लागणाऱ्या विजेकरिता

तीन. संतुलन आणि तफावतीसाठी लागणाऱ्या विजेकरिता

चार. आंतरराज्य पारेषण मुक्त प्रवेशासाठी, असल्यास

पाच. वरील व्यवहारात वीज व्यापाऱ्याशी, केला असल्यास, कोणताही करार

**१४. निर्मिती केंद्रांच्या बाबतीत**

एक. प्रवर्तकाचे नाव :

दोन. निर्मिती क्षमता

तीन. निर्मिती संयंत्राचे ठिकाण

चार. संचांची संख्या आणि प्रत्येक संचाची क्षमता

पाच. इंधनाचा प्रकार

सहा. बेस भार केंद्र किंवा पीकींग भार केंद्र

सात. पीकींग भार असल्यास, अंदाजित प्रवाहाचे तास

आठ. जल विद्युत निर्मिती प्रकल्प असल्यास, तो नदीच्या वाहत्या पाण्यावर/ साठवलेल्या पाण्यावर (रिझव्हायर)/बहुउद्देशीय/पम्प स्टोअरेज वर आहे का,

जल विद्युत निर्मिती प्रकल्पाच्या बाबतीत एक वर्षातील निर्मिती-

(दशलक्ष युनिट्समध्ये)

नऊ. स्टेप-अप जनरेशन व्होल्टेज ४०० केव्ही किंवा २२० केव्ही किंवा अन्य कोणताही व्होल्टेज असल्यास, तो विनिर्दिष्ट करा.

दहा. जल विद्युत केंद्राच्या बाबतीत तो, केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने निश्चित केलेला प्रकल्प आहे का?

**१५ अर्जाच्या शुल्काचा तपशील (विना-परतावा):**

| | | |
|---|---|---|
| एक | बँकेचे नाव | |
| दोन | ड्राफ्ट क्र. आणि दिनांक | |
| तीन | रक्कम | |
| चार | ड्राफ्ट कोणत्या बँकेत देय असेल? | |

**१६ अन्य कोणतीही माहितीः**

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की,--

१. वेळोवेळी सुधारणा करण्यात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ आणि/किंवा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ मधील, जसे असेल तसे, तरतुदींचे पालन या व्यवहारातील (खरेदीदार, विक्रेता आणि वीज व्यापारी यासह) सर्व विद्युत कंपन्या करतील.

२. प्रस्तावित व्यवहारासाठी खरेदीदार आणि विक्रेता यांनी वाणिज्यिक करार केला आहे. दीर्घकालीन मुक्त प्रवेश आकार (अदा केले गेले नसल्यास) ते माझ्याकडून भरणा करण्यात येतील.

३. अर्जदार येथे मान्य करतो की, ----------------------------------------(वितरण परवानाधारकाचे नाव) यांना सर्व काळ नुकसानभरपाई देण्याची आणि त्याने मान्यता दिलेल्या व्यवहारांमधून उद्‌भवणारी किंवा परिणामस्वरुप कोणत्याही व्यक्तीला झालेली इजा किंवा मृत्यू किंवा मालमत्तेला झालेले नुकसान, मागण्या, वाद, परिव्यय व खर्चाची वसुली, न्यायालयीन खर्च, वकील फी आणि अन्य पक्षकारांची किंवा त्यांच्याप्रती सर्व दायित्वे यांच्या संबंधातील कोणतेही नुकसान, हानी, दावे आणि कारवाई यापासून त्याला नुकसानभरपाई देण्याची, बचाव आणि रक्षण करण्याची हमी देत आहे.

४. ----------------------------------------(वितरण परवानाधारकाचे नाव) यांच्याकडून मान्यताप्राप्त झाल्यानंतर, आम्ही तीस (३०) दिवसांच्या आत दीर्घकालीन मुक्त प्रवेश करार करू व असे न केल्यास, ------------------------------------------(वितरण परवानाधारकाचे नाव) यांना कोणतीही आणखी सूचना न देता मान्यता रद्द करण्याचा हक्क असेल.

५ मे. --------------------- (राज्यांतर्गत विजेचा व्यापारी असल्यास त्याचे येथे नाव लिहावे) यांच्याकडे राज्यांतर्गत विजेच्या व्यापारासाठी वैध परवाना (संदर्भ क्र.----------- ने -------------- यांनी दिलेला आणि ------- पर्यंत वैध असलेला) आहे आणि तो वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ चे पालन करेल.

६ मे. --------------------- (आंतरराज्य विजेचा व्यापारी असल्यास त्याचे येथे नाव लिहावे) यांच्याकडे आंतर-राज्य विजेच्या व्यापारासाठी वैध परवाना (संदर्भ क्र.----------- ने -------------- यांनी दिलेला आणि ------- पर्यंत

वैध असलेला) आहे आणि तो वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह केंद्रीय विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना मंजूर करण्यासाठीच्या अटी व शर्ती, कार्यपद्धती आणि अन्य संबंधित बाबी) विनियम, २००९ चे पालन करेल.

अर्जदाराची सही

ठिकाण नावः

दिनांक पदनामः

**अश्वनी कुमार,**

मुंबई, सचिव,

दिनांक २५ जून २०१४ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.